म. ग्रं. सं. ठाणे
विषय
क्र. नं.

# ... मल्हार जोशी

लेखक

रा. प्र. कानिटकर, एम्. ए.

REFBK-0004128

... ... अँन्ड को,
पुणें नं. २.

— प्रकाशक —

एन्. टी. भिडे, मॅनेजर, एन्. भिडे अॅन्ड को., ११६ नारायण, पुणे

( सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन आहेत. )

— मुद्रक —

स. रा. सरदेसाई, बी. ए., एलएल्. बी., नवीन समर्थ विद्यालयाचे

समर्थ भारत छापखाना, ५४७ सदाशिव, पुणे २.

( ‘ प्रभाकर आणि मंडळी ’ चें चौथें पुस्तक )

# वामन मल्हार जोशी

[संक्षिप्त चरित्र व साहित्यपरिचय]

REFBK-0004128

लेखक

राजाराम प्रल्हाद कानिटकर, एम्. ए.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र.

एन्. भिडे अँड कंपनी.

किंमत १२ आणे

## उन्नतीचा मार्ग

" व्यावहारिक किंवा नैतिक दृष्टीनें आपण कितीही खाला-वलेलों असलों तरी मनुष्यानें निराश होऊं नये. वाल्या कोळी हा तपश्चर्या करून वाल्मीकी झाला हें ध्यानांत ठेवावें. राष्ट्रानेंही कधीं निराश होऊं नये. आयर्लंडचें उदाहरण ध्यानांत ठेवावें. तपश्चर्येमुळें असाध्य गोष्टी देखील साध्य होतात हें तत्त्व प्रत्ये-कानें ध्यानांत धरावें व कितीही अडचणी किंवा आपत्ति आल्या तरी आपल्या उन्नतीचा मार्ग सोडूं नये."

वा. म. जोशी

# आशीर्वाद

रा. रा. रा. प्र. कानिटकर यांस—

सा. न. वि. वि.—

आपण माझें चरित्र लिहिलें आहे त्यांत आरंभीं छापण्याकरितां मजजवळ आपण संदेश मागितलात. मला संदेश कांहीं द्यावयाचा नाहीं. एक इच्छा मात्र प्रदर्शित करावयाची आहे आणि ती अशी कीं, आपण माझ्यामध्यें जे गुण दाखविले आहेत ते यथार्थत्वानें माझ्यामध्यें यावेत आणि जे दोष दाखविले आहेत त्यांचें पूर्णपणें निर्मूलन व्हावें. ही इच्छा सफल होवो आणि आपल्या ग्रंथालाही विशेष प्राप्ति होवो असें ह्मणण्यापेक्षां मी दुसरें काय चिंतणार? क. लो. वि.

आपला

**वा. म. जोशी.**

स्थळप्रत



वा. म. जोशी

## साहित्य-सन्यसाची श्री. न. चिं. केळकर, संपादक 'केसरी'–यांचा अभिप्राय.

रा. न. वि. वि.—

मडगांव येथील मराठी-साहित्य-संमेलनाचे अध्यक्ष माझे मित्र रा.वामनराव जोशी यांच्या चरित्राचे पुस्तक तुम्ही मजकडे पाठविले, ते वाचले. अशा वेगवेगळ्या प्रसंगानी अशी चरित्रे प्रसिद्ध झाल्यास ती लोक आस्थेने वाचतात. म्हणून या विषयाची माहिती गोळा करून तुम्ही जे अल्पसे चरित्र लिहिले आहे त्याबद्दल वाङ्मयकार्याच्या दृष्टीने मी तुमचे अभिनंदन करतो. माझ्या समजुतीप्रमाणे वामनरावजी संबंधाने ज्या दोन तीन गोष्टी लोकापुढे यावयास पाहिजेत त्या–(१) वामनराव यांची स्वार्थत्यागबुद्धी व सहज मिळत असताही त्यानी न स्वीकारता दूर लोटलेली सरकारी नोकरी, (२) प्रो. विजापूरकर यांची गाठ पडताच त्यानी आरंभिलेल्या राष्ट्रीय शिक्षणविषयक उद्योगाला स्वतःस वाहून घेण्याची वामनराव यानी दाखविलेली स्वयंस्फूर्ति आणि (३) वाङ्मयाची सेवा ग्रंथमालेच्या द्वारे करीत असता त्यांजवर आलेला तुरुंगवासाचा प्रसंग व त्यातून निभावून नेण्याचे त्यानी दाखविलेले धैर्य! या तिन्ही गोष्टी त्याना भूषणावह आहेत.

रा. वामनराव यांचा 'केसरी मराठा' ऑफीसशी संबंध मी या दोन्ही पत्रांचा संपादक असतानाच आलेला होता; म्हणून मला पृष्ठ ४७ वरील तुम्ही लिहिलेल्या काही वाक्याना हरकत घ्यावी

असे अवश्य वाटते. कारण त्यात तुम्ही लिहिलेली वस्तुस्थिति खरं नाही. सामाजिक मताच्या दृष्टीने वामनरावजी हे ' केसरी-मराठा संस्थेशी सर्वस्वी समरस होण्यासारखे नसले तरी त्यांचा या संस्थेशी संबंध तुटण्याचे निर्णयात्मक कारण त्यांची सामाजिक मते ही झाली नाहीत हे मी निश्चयात्मक सांगतो. व कदाचित वामनराव जोशी हे स्वत:ही ही गोष्ट मान्य करतील. केसरीच्या हल्लीच्या सामाजिक मता-संबंधाने तुम्ही केलेले विधानही बरोबर आहे असे मला वाटत नाहीं. परंतु दुसऱ्यासंबंधी मते वाटेल तशी बनवण्याचा प्रत्येकास नैसर्गिक हक्क आहे. व तुमचे मत प्रतिकूल असले तरी त्यापासून केसरी-पत्राची फारशी हानी नाही ही गोष्ट लक्षात घेऊन मी अधिक लिहीत नाही; बाकी केसरीसंबंधाने असे विधान करूनही तुमच्या पुस्तकावरील अभिप्रायाकरिता केसरीकर्त्याकडे आला ही गोष्ट तुमच्या निष्कपट-पणाची द्योतक आहे हे उघड आहे. कळावे.

न. चिं. केळकर.

# लेखकाचें वक्तव्य

एके दिवशीं सुमारें एक महिन्यापूर्वी गुरुवर्य प्रो. बापूसाहेब चापेकर यांजबरोबर बोलत असतां बोलण्याच्या ओघांत सहजगत्या असा विषय निघाला कीं मराठींत ‘ Who's Who ’ अर्थात् ‘ वाङ्मय-क्षितिजावरील तेज:पुंज तारे ’ अशा प्रकारचें ग्रंथकारांची माहिती देणारें एकादें पुस्तक नाहीं. असें पुस्तक झाल्यास फार उपयुक्त होईल.* त्यावर प्रो. चापेकर म्हणाले, कीं, सध्यां त्या पुस्तकापेक्षां प्रो. वामनराव जोशी यांच्या चरित्रग्रंथाची जरूरी आहे. तुम्ही लिहीत असलां तर लिहाच.' झालें. ह्या आग्रहाच्या सूचनेचा इष्ट तोच परिणाम झाला. लगेंच हिंगणें येथें जाऊन प्रो. वामनराव जोशी यांच्यापुढें ही मनीषा मांडली. त्यांनीं आणि प्रो. ना. म. पटवर्धन यांनीं जरूर ती माहिती पुरविली आणि पुस्तकास सुरवात झाली. पुस्तक अल्पावधींत तयार करावयाचें असल्यामुळें सिद्ध सामग्रीचा पुष्कळ उपयोग करून घ्यावा लागला, आणि इतरांच्या सहाय्याची व सहानुभूतीची अपेक्षा करावी लागली. काल-मर्यादेच्या बंधनामुळें हें पुस्तक सर्वांगपरिपूर्ण होऊं शकलें नाहीं, आणि पहिल्या व दुसऱ्या भागांतील प्रकरणांचा यदृच्छया संकोच व विस्तार झाला आहे याची लेखकास यथार्थ जाणीव आहे. दुसऱ्या भागांतील विषयविवेचनाचें कार्य प्रमाणबद्ध रीतीनें व सुव्यवस्थित तऱ्हेनें झालेलें नाहीं ही गोष्ट लेखकास शल्यरूप वाटत आहे. पुढील आवृत्तीच्या वेळीं हे दोष काढून टाकण्यांत येतील. एकान्तिक व निरुपाधिक साहित्योपासकांचीं चरित्रें लिहिण्याची नवीनच प्रथा पडत

*ह्या प्रकारचें पुस्तक प्रभाकर आणि मंडळीनें तयार करण्यास घेतलें आहे.

चालल्यामुळें प्रारंभीं अशी अपूर्णता नजरेस आल्यास वाचक त्याकडे क्षमाशील बुद्धीनें पहातील अशी आशा आहे.

प्रो. वामनराव जोशी यांनीं आपल्या स्वाभाविक प्रेमळपणानें आणि सौजन्यानें आपल्या जीवितकार्याचा चित्रपट माझ्यापुढें मांडला.—वृत्तसंयोजनाबद्दल अर्थातच मी जबाबदार आहें—त्यामुळें ह्या चरित्राचें सर्व श्रेय त्यांनाच आहे. त्याबद्दल त्यांचे मी अंतःकरणपूर्वक आभार मानतों. गुरुवर्य प्रो. चापेकर यांची प्रेरणा व आत्मीयता ह्या गोष्टींबद्दल लेखक त्यांचा उपकृत आहे. 'केसरी'कार श्री. न. चिं. केळकर यांनीं आपल्या अभिप्रायानें पुस्तक अलंकृत केलें त्याबद्दल त्यांचे सकृतज्ञ आभार मानण्यास मला विशेष आनंद वाटतो. शेवटीं ह्या पुस्तकाच्या प्रकाशनाचें व्यावहारिक कार्य श्री. भिडे यांनीं आपल्या शिरावर मोठ्या आनंदानें घेतलें आणि पुस्तक अजमासाबाहेर वाढलें तरी त्यांनीं आपल्या मनाची समतोलबुद्धि यत्किंचितही ढळूं दिली नाहीं, याबद्दल त्यांचे आभार मानावेत तेवढे थोडेच होणार आहेत.

प्रो. वामनराव जोशी यांचीं पुस्तकें वाचतांना जो 'ब्रम्हानंदसहोदर' असा आनंद उपभोगावयास सांपडला त्याचा येथें मुद्दाम निर्देश करावासा वाटतो.

पुणें,
२९।४।१९३०

रा. प्र. कानिटकर.

# भूमिका

" काव्यशास्त्रविनोदेन कालो गच्छति धीमताम् ।"

' तत्त्वजिज्ञासू कादंबरीकार ' (Philosopher-Novelist )अशा सार्थ व महनीय पदवीनें विभूषित झालेल्या एका असामान्य साहित्य-शिल्पकाराचा सामान्य परिचय आहेच. त्या ग्रंथकर्त्यांची अधिक ओळख करून देऊन कादंबरीकर्त्याच्या खाजगी, सार्वजनिक व वाङ्मयात्मक चरित्राची ही माहिती पुढील पानांत देण्यांत आली आहे. लेखकानें आपल्या ग्रंथांत प्रतिपादिलेल्या विचारांचा उद्गम कसा झाला, आणि ते विचार त्यानें वाचकांच्या पुढें केवळ मांडायचे म्हणून मांडले,— त्यांत त्याचा स्वतःचा कांहीं संबंध नाहीं, त्याची कृति आणि त्याचा स्वभाव यांत विसंगति आहे, किंवा त्यांत त्याच्या व्यक्तित्वाचें आविष्करण झालें आहे, त्याची कृति म्हणजे त्याचें कलात्मक आत्मचरित्र इत्यादि विसंवादि गोष्टींचा उलगडा त्याच्या खाजगी चरित्राचें अवलोकन केल्यास होण्यासारखा असतो; आणि त्याच्या साहित्यकलेंतील रहस्य आकलन करण्यास सुलभ पडतें. केवळ कादंबरीकार आणि साहित्य-शिल्पकार या दोन दृष्टींनीं आज आपण प्रो. वामनराव जोशी यांना पहात आहोंत. परंतु एका काळचा ज्वलज्जहाल वर्तमानपत्रकर्ता आणि पुढारलेला समाजसुधारक आज एका स्त्रीशिक्षण संस्थेंत अध्यापनाचें पवित्र कार्य करून वाङ्मयाचा व्यासंग अत्यंत आवडीनें व निरलस-पणें चालवीत आहे हें परिवर्तन साहित्यभक्तांना निःसंशय कादंबरी-मय वाटेल. पण कादंबरीकर्त्याच्या चरित्रांत कादंबरींत शोभण्यासारखे चमत्कृतिजनक प्रसंग आले तर त्यांत विस्मय वाटण्याचें मुळींच कारण कारण नाहीं.

## वामन मल्हार जोशी

तत्त्वज्ञानी कादंबरीकार झाला म्हणजे जगाकडे पहाण्याची त्याची दृष्टि अधिक सहानुभूतीची आणि अधिक आपलेपणाची होते. तो नुसत्या कल्पनातरंगांत रममाण न होतां आपल्या सभोंवतालच्या सत्यसृष्टीला विसरूं शकत नाहीं. व्यवहारसृष्टीची जाणीव त्याला पदोपदीं असते. त्यामुळें जगाशीं पूर्णपणें सबाह्यांतर अलिप्त असणारा कादंबरीकार तत्त्व-जिज्ञासू झाला कीं त्याला जगाच्या उन्नतीची चिंता वाटूं लागते. आणि कादंबरींत उल्लेखिलेल्या व वर्णिलेल्या गोष्टी जीवनक्रमांत प्रत्यक्ष कृतीच्या रूपानें उतरणें कितपत शक्य असतें याची त्याला तळमळ लागते. तत्त्वकुतूहलाचा असा हा ऐहिक जीवनाशीं निकट संबंध आहे. वाचकाला कादंबरी विमानाच्या साहाय्यानें एकदां कल्पनेच्या अंतरिक्षांत सोडून दिलें म्हणजे आपलें कर्तव्य संपलें. मग तो आकाशांत कसाही भ्रमण करो किंवा खडतर व्यवहाराच्या खडकावर कोलमडून पडो—त्याची त्याला मुळींच क्षिती नसते. व्यावहारिक जगाची किंवा सत्यसृष्टीची ओळख करून देऊन वाचकाला विचारचक्रांत भ्रमण करावयास लावणें हें कार्य तत्त्वज्ञानी कादंबरीकार करीत असतो. आपल्या व्यावहारिक जीवनासंबंधींचीं कांहीं अज्ञेय व अगम्य असलेलीं रहस्यें तो आपल्या मोहमयी लेखणीनें वाचकांच्या डोक्यांत भरवून त्यांचा उलगडा करण्यास मदत करण्याचा आव आणतो. मात्र तो जर पूर्णपणें उलगडा करील तर त्या कादंबरीकाराचें कौशल्य व कलाकल्पकता राहिली कोठें ? प्रो. वामनराव जोशी हे तत्त्वजिज्ञासू कादंबरीकार असून जीविताच्या उन्नतीचें तत्त्वज्ञान प्रतिपादन करणें व तदनुषंगानें वाचकासही जीवितकार्याविषयीं विचार करावयास लावणें हें त्यांचें मुख्य उद्दिष्ट आहे. ज्ञानप्राप्तीचे प्रयत्न मनुष्याच्या आयुष्यभर चालावयास पाहिजेतच, पण कर्माशिवाय त्या यत्नांची परिपूर्ति नाहीं असें त्यांचें तत्त्वज्ञान आहे.

तत्त्वज्ञानासारख्या रूक्ष आणि नीरस विषयाचें सदोदित चिंतन करणारा तत्त्वजिज्ञासू कल्पनारम्य आणि ललितरमणीय कादंबऱ्या लिहितो आणि तत्त्वज्ञानी ग्रंथकार हिंगण्यासारख्या एका कोपऱ्यांतल्या खेड्यांतील अनाथ बालिकाश्रमांत अध्यापकाचें कार्य करतो, ह्या गोष्टी सारख्याच कुतूहलजनक आहेत. जनसंमर्दापासून अलिप्त असणाऱ्या आणि साधारणपणें विजनवासांत कालक्रमणा करणाऱ्या या असामान्य ग्रंथकर्त्याच्या खऱ्या योग्यतेची जाणीव सामान्य जनांना होणें दुर्घट आहे. दिवसभर कामांत व्यग्र असल्यामुळें प्रहर रात्रीनंतर आपलें लेखनाचें कार्य सुरू करणाऱ्या या ग्रंथकाराच्या उत्कट साहित्यभक्तीबद्दल कोणास आदर वाटणार नाहीं ? राष्ट्राच्या चळवळींत सर्वस्वानें भाग घेऊं इच्छिणाऱ्या अंतर्हृदयाची तळमळ प्राप्त कर्तव्यापुढें मान वांकवून किती प्रयासानें संयमित करावी लागत आहे, याची जाणीव प्रो. वामनरावांशिवाय इतरांस कोणास आहे ? " आपलें ध्येय फक्त कर्तव्यरत होण्याचें आहे; देव, नियति इत्यादि अज्ञेय गोष्टींबद्दल आपणांस चर्चा करण्याचें विशेष कारण नाहीं; अव्यक्त व्यक्त स्वरूपांत कधींही येऊं शकत नाहीं, कारण शब्द अपर्याप्त आहेत; त्या अतर्क्य आणि रहस्यमय देवाचा विचार करण्याची तरी आवश्यकता काय ? तो असला आणि नसला काय सारखाच; कारण आपली मर्यादित बुद्धि त्याचें आकलन करूं शकत नाहीं; आपली पुढची पिढी हाच आपला देव, त्या पिढीला आतांपासूनच उन्नत्तिमार्गास लावल्यास ती पूर्णतेला पोहोंचेल; म्हणजे खरा देव निर्माण करणें आपल्या हातांत आहे, कारण पूर्णता म्हणजेच देव; आपलीं बरींचशीं सामाजिक बंधनें कृत्रिम आहेत. समाजसत्तावादाची किंवा विश्वकुटुंबवृत्तीची आज आपणांस अत्यंत जरूर आहे; अनुरूप व प्रिय असलेल्या स्त्रीशीं विवाह करावा किंवा न पटल्यास सोडचिठ्ठी द्यावी;—कारण

आपल्याला ह्या जगांत अत्यंत प्रेमानें आणि परस्पर सलोख्यानें रहावयाचें आहे; अनुरूप पतीशीं पुनर्विवाह केल्यास पावित्र्यभंग होतो या गोष्टीबद्दल अकांडतांडव करण्यांत मुळींच अर्थ नाहीं; काल्पनिक पातिव्रत्याचेंही स्तोम माजविण्याचें कारण नाहीं; नीति-अनीति वगैरे गोष्टी केवळ सापेक्ष व परिस्थितीवर अवलंबून असणाऱ्या आहेत; नीति म्हणजे लौकिक स्वास्थ्य, व्यवस्था व अभ्युदय यांकरितां ठरविलेला नियम यापलीकडे तिचें महत्त्व वाढविण्याचें कारण नाहीं; साधी रहाणी आणि उच्च विचारसरणी यांपलीकडे सर्वांना समजेल व उपयुक्त होईल असें दुसरें मानवी जीविताचें ध्येय नाहीं; कर्तव्यकर्म हाच आपला धर्म; ' ज्यानें त्यानें आपआपला प्रकृतिधर्म ओळखून आसक्तिरहित आणि अहंकार सोडून स्वकर्तव्य करीत रहावें आणि सर्व भवितव्य भविष्यतेवर सोंपवावें; '---परस्परांशीं प्रेमानें वागून काव्य-शास्त्रविनोदांत आणि ज्ञानार्जनांत आनंदानें काळ घालवावा, यापलीकडे आपली इतिकर्तव्यता नाहीं; व या पलीकडच्या अज्ञात व अज्ञेय गोष्टींबद्दल काथ्याकूट करण्यांत विशेष स्वारस्य नाहीं. ''---नीतिशास्त्र-विशारद प्रो. वामनराव जोशी यांच्या क्रांतिकारक विचारसरणीचा आशय येणेंप्रमाणें आहे. केवळ साहित्याचार्य या दृष्टीनें त्यांच्या चरित्राकडे पाहून चालणार नाहीं. नीतिशास्त्रपारंगत अशा या तत्त्व-ज्ञानी ग्रंथकर्त्यांच्या मतांची ओळख वाचकांस होणें जरूर आहे. त्यांचीं नीतिविषयक मतें व विचार नीतिशास्त्रप्रवेश, सुशिलेचा देव, नलिनी व रागिणी या ग्रंथांतून प्रकट झाले आहेत. कादंबरीकार जोशी यांच्या पाठीमागें नीतिशास्त्रज्ञ जोशांची अंधुक आकृति उभी आहे; आणि ती त्यांना त्यांचा हात धरून स्वत:च्या इच्छेप्रमाणें लिहावयास लावीत आहे. हें रहस्यमय दृश्य फारच थोड्या वाचकांच्या दृष्टिपथांत आलें असेल ! जगताचा ऐहिक आणि आध्यात्मिक दृष्टीनें

विचार करून जीं तत्त्वरत्नें सांपडलीं तीं आपल्या सर्व कादंबऱ्यांतून आणि लेखांतून त्यांनीं विखरून दिलीं आहेत. गूढ असलेल्या व गूढ असणाऱ्या गोष्टींची जिज्ञासा धरून उपयोग काय? त्यांतून जर कांहींच निष्पन्न होण्यासारखें नाहीं तर त्यावर आपलें डोकें निष्कारण शिणवा कां? बुद्धिमत्तेला आकलन न होणाऱ्या व अनुभवानेंही न उलगडणाऱ्या रहस्यांचा विचार करण्यांत त्यांचें तत्त्वजिज्ञासू मन फार वेळ दवडीत नाहीं. ऐहिक आणि प्रत्यक्ष दिसणाऱ्या गोष्टींच्या मननांत तासच्या तास खर्च केले तरी हरकत नाहीं; परंतु सृष्टीच्या आद्यतत्त्वासारख्या गूढतम प्रमेयांवर वाटल्यास फुरसदीच्या वेळीं विचार करावा असें त्यांच्या तत्त्वप्रवण मनाला वाटतें. विवेकवादी तत्त्वज्ञान (Rationalistic Philosophy) त्यांना अलीकडे अधिकाधिक प्रिय व सयुक्तिक वाटत असल्यामुळें गूढवादामध्यें ( Mysticism ) कांहीं अर्थ नाहीं असें त्यांचें मत असल्यास त्यांत नवल वाटण्याचें कारण नाहीं. कारण कोणत्याही गूढ रहस्याबद्दल तार्किक बुद्धीचें समाधान होत नाहीं. आरंभीं आरंभीं त्यांना बुध्यतींत गूढ मार्गाविषयीं विशेष आस्था वाटत होती. परंतु अलीकडे त्यांचें बुद्धिगम्य ज्ञानानें समाधान होतें आणि त्यावरच त्यांची विशेष श्रद्धा व भिस्त आहे. असो.

केवळ लोकांचें मनोरंजन करावें आणि ललित भाषासौंदर्यानें त्यांचें चित्त आकर्षून घ्यावें असा त्यांचा कादंबऱ्या लिहिण्याचा हेतु नाहीं. त्यांच्या कादंबऱ्या विशिष्ट हेतु डोळ्यांपुढें ठेवल्यामुळें ध्येयदर्शी झाल्या आहेत, हें वर आलेंच आहे. टीकाकार या दृष्टीनें त्यांची योग्यता बरीच मोठी आहे. टीकाविषयक पुस्तकाचें समतोल, मार्मिक व निःपक्षपाती परीक्षण लिहिण्यांत त्यांची चतुरस्र बुद्धिमत्ता आणि मर्मज्ञता स्पष्ट निदर्शनास येतात. त्यांच्या यशस्विनी आणि कलावती लेखणीचें जर एखादें मर्म असेल तर त्यांची हृदयाल्हादक मार्मिकता

हेंच होय, असें म्हणण्यास हरकत नाहीं. मार्मिकतेचा अखंड झरा त्यांच्या लेखांतून अविरतपणें वहात असतो. ' सौंदर्याभिज्ञ मार्मिक कलाकोविद ' असें त्यांचें थोडक्यांत वर्णन करतां येईल.

चहूं बाजूंस पडलेल्या पुस्तकांच्या आणि वर्तमानपत्रांच्या पसाऱ्यांत एका लहानशा खोलींत हे तत्त्वज्ञानी ग्रंथकार आपल्या चिंतनांत निमग्न असतात. अगदीं साधी रहाणी, बाहेरच्या पाहुण्यांचें अंत:करण-पूर्वक स्वागत व आदरातिथ्य, स्वाभाविक सौजन्य व हृदयाचा प्रेमळ-पणा यांमुळें ते सर्वांना हवेहवेसे वाटतात. आणि वाङ्मयासारख्या उदात्त आणि उच्चतर वातावरणांत विहार करण्यामुळेंच कीं काय ते अजातशत्रु आहेत. त्यांची वृत्ति आणि त्यांचा स्वभावच असा आहे कीं, त्यांना कोणी शत्रू उत्पन्नच होऊं नये.

प्रो. वामनराव जोशी 'ध्येय आणि वस्तुस्थिति, भविष्य आणि वर्त-मान यांचा मेळ घालूं पहाणारे आहेत. वस्तुस्थितिरूपी शिलेंतून ध्येयमूर्ति हळुहळू उत्पन्न करणें ' हें जसें त्यांचें ध्येय आहे, तसेंच त्यांचें वर्तनही आहे.

अशा या असामान्य तत्त्वज्ञाच्या खाजगी चरित्राची, वाङ्मयकृतींची व सामाजिक कार्याची अधिक माहिती दिल्यास उत्कंठित वाचकांना ती उपयुक्त आणि उद्बोधक होईल अशा हेतूनें पुढील प्रकरणें लिहिलीं आहेत.

---

# प्रकरण पहिलें

## कुलवृत्तांत

प्रो. वामन मल्हार जोशी यांचें घराणें मूळ कोंकणांतलें. कुलाबा जिल्ह्यांतील माणगांव तालुक्यांत गोरेगांव म्हणून एक खेडें आहे तें त्यांचें मूळ गांव. ते मूळचे कोंकणांत रहाणारे असून सुद्धां कोंकणस्थ नाहींत ही गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. ते ऋग्वदी देशस्थ ब्राम्हण; पण त्यांच्या एकंदर रहाणीवरून ते कोंकणस्थ असावेत अशी पुष्कळांची समजूत होते. आणि यांत आश्चर्य वाटण्याचें मुळींच कारण नाहीं. कांहीं झालें तरी ते मूळचे कोंकणचेच. जन्मग्रामाचे संस्कार पिढ्यान्‌पिढ्या लुप्त होत नाहींत याचें हें एक उत्तम उदाहरण आहे. त्यांचे खापरपणजे प्रथम गोरेगांवीं आले व त्यांना त्या गांवची जोशी-पणाची वृत्ति मिळाली. आणि त्या वृत्तीवरच प्रो. जोशी त्यांच्या वडिलां-पर्यंतच्या सर्व पूर्वजांनीं निर्वाह करून आपला संसार चालविला. त्यांच्या कुळांत अद्यापही ही जोशीपणाची वृत्ति चालू आहे. प्रो. वामनराव ऊर्फ तात्यासाहेब यांचा जन्म जानेवारी १८८२ मध्यें माणगांव तालुक्यांतील तळें ह्या गांवीं त्यांच्या आजोळीं झाला. वयाच्या दहाव्या वर्षापर्यंत त्यांचे वडिलांनीं संगोपन करून त्यांनीं वामनरावांना त्यांच्या थोरल्या बंधूंच्या—म्हणजे प्रो. महादेव मल्हार जोशी यांच्या—स्वाधीन केलें व स्वतःला निश्चिंत समजून त्यांनीं परलोकीं प्रयाण केलें. वामनरावांचें प्राथमिक शिक्षण त्यांच्या गोरेगांवींच झालें. मराठी पांच ईयत्ता झाल्यानंतर ते पुण्यास आपल्या ज्येष्ठ बंधूंकडे आले. वामनरावांचे वासुदेवराव म्हणून एक सर्वांत ज्येष्ठ सावत्र बंधू होते. परंतु ते विभक्त असल्यामुळें त्यांच्याशीं वामनरावांचा कांहींच संबंध आला नाहीं.

## विद्यार्थीदशा

पुण्यास आल्यावर अर्थातच इंग्रजी शिक्षणाला प्रारंभ झाला. त्यांनीं 'न्यू प्रिपरेटरी' क्लासेस् मध्यें आपलें नांव दाखल केलें आणि तेथें त्यांचें शिक्षण इंग्रजी सहावीपर्यंत झालें. त्यांच्या वेळीं शंकर गणेश लवाटे, सदाशिव श्रीधर करंदीकर, लक्ष्मण रामचंद्र पांगारकर इत्यादि मंडळी तेथें अध्यापकवर्गांत होती; त्यांच्या शीलसंवर्धक व संस्कृतिदायक शिक्षणाचा त्यांस लाभ मिळाला. सहावी इयत्ता झाल्यावर त्यांचे ज्येष्ठ बंधु सुप्रसिद्ध गीर्वाणपंडित प्रो. महादेवराव यांना अहमदनगर हायस्कूलमध्यें हेडमास्तरची जागा मिळाल्यामुळें, वामनरावांना पुढील शिक्षणासाठीं नगरला आपल्या बंधूंकडे जावें लागलें. नगर हायस्कुलांत त्यांना तीन वर्षें निष्कारण घालवावीं लागलीं. एक वर्ष केवळ आजारीपणांतच फुकट गेलें. दुसऱ्या वर्षीं ते मॅट्रिकला बसले, त्यांनीं इंग्रजी निबंध लिहिण्यांत सर्व वेळ खर्च केल्यामुळें ते त्या वर्षीं उत्तीर्ण होऊं शकले नाहींत. वामनरावांचें इंग्रजी भाषेवर विशेष प्रभुत्व असून उत्तम इंग्रजी निबंध लिहिण्यांत त्यांची आणि त्यांच्या सहाध्यायांची अहमहमिका चाले. त्या वेळीं त्यांच्या सहाध्यायी मित्रवर्गांत डॉ. गुणे, पांडुरंग महादेव बापट वगैरे मंडळी होती. नगर हायस्कूलमधून वामनराव १९०० सालीं मॅट्रिक पास झाले आणि नंतर पुढील उच्च शिक्षणासाठीं ते पुण्यास येऊन डेक्कन कॉलेजमध्यें दाखल झाले.

## डेक्कन कॉलेज

डेक्कन कॉलेज आजच्याप्रमाणें त्या वेळींही 'निसर्गरमणीय कलाकमनीय, अतएव शिष्यस्पृहणीय' असल्यामुळें वामनरावांचे त्या वेळचे दिवस अतिशय आनंदांत आणि मौजेंत गेले यांत नवल नाहीं. ते कॉलेजमध्यें आले त्या वेळीं प्रो. पेंडसे, ज. वि. ओक, गोविंद चिंतामण भट, डॉ. बेलवलकर, प्रल्हाद धोंडो कानिटकर, प्रो. गो. वि.

तुळपुळे वगैरे मंडळी त्यांची कमी अधिक प्रमाणानें समकालीन होती. ते चवथ्या इंदूर क्लबांत जेवीत असत. लोकमान्य टिळकही पूर्वी त्याच क्लबाचे सभासद होते. हा क्लब विशेषतः सरदारांचा म्हणून प्रसिद्ध होता. वामनरावांच्या वेळीं पूर्वींचें सोंवळ्याओंवळ्यांचें बंड बहुतेक नष्टप्राय झालें होतें. तथापि 'लोकशिक्षण'कर्ते ओक, पेंडसे, एस्. बी. जोशी वगैरे लोक मधूनमधून सोंवळें नेसत असत. परंतु एकंदर मनोवृत्तींत पुष्कळ परिवर्तन झालें होतें आणि पूर्वींचा मनु पालटला होता. प्रीव्हियसपासून बी. ए. पर्यंत वामनराव कॉलेज स्कॉलर होते. ते एम्. ए. सुद्धां प्रत्येक परीक्षा सेकंड क्लासमध्यें उत्तीर्ण होत गेले. परंतु त्यांना फर्स्ट क्लास मिळू शकला नाहीं. याचें कारण त्यांचा सर्व वेळ टेनिस खेळण्यांत खर्च होत असे हें होय. त्यांना टेनिसचें इतकें वेड होतें कीं, दिवसच्या दिवस अभ्यास सोडून देऊन ते टेनिस-मध्यें रममाण होत. ही त्यांचीं क्रीडासक्ति फर्स्ट क्लास मिळविण्याच्या कामीं प्रतिबंधरूप झाली ही गोष्ट निश्चित आहे, नौकाविहार (बोटिंग), क्रिकेट इत्यादि इतर खेळांकडे त्यांचें मुळींच लक्ष गेलें नाहीं. टेनिस खेळणारे त्यांचे विशेष जोडीदार म्हणजे ठाणेदार, जी. के. खोत, रणदिवे, रणसिंग, दास्ताने होत. त्यांनीं कॉलेजमध्यें Tennis Championship मिळवून आपलें क्रीडानैपुण्य प्रकट केलें होतें. इंटरमध्यें असतांना फर्ग्युसन कॉलेजच्या गदॅरिंगच्या वेळीं तिथेंही त्यांनीं चँपियनशिप मिळविली. त्या समारंभाहून परत आल्यावर प्रि. शार्प यांनीं वामनरावांना समारंभाची हकीगत विचारली. प्रि. शार्प यांचे वामनराव हे विशेष आवडते विद्यार्थी होते. समारंभाची हकीगत सांगतां सांगतां 'फर्ग्युसन कॉलेजांतील प्रोफेसर विद्यार्थ्यांत आपलेपणानें मिसळतात, तसे येथील मिसळत नाहींत. येथले युरोपियन प्रोफेसर कांहीं झालें तरी परकेच. त्यांना हिंदी विद्यार्थ्यांविषयीं स्नेहभाव व

आत्मीयता कोठून वाटणार ? इंग्रजांच्या राज्यामुळें हिंदुस्थानचा मुळींच फायदा झालेला नाहीं. एक वेळ अराजकता पत्करेल, पण ब्रिटिश राजवटींतील ही शांतता आणि सुव्यवस्था नको.' असे उद्गार वामनरावांनीं निर्भयपणें आणि स्पष्टोक्तिपूर्वक काढले. वामनरावांच्या कादंबऱ्यांतून त्यांच्या आत्मचरित्राचे कांहीं कांहीं त्रुटित धागे आढळतात. प्रस्तुत संवादाच्या स्वरूपाचे संवाद त्यांच्या 'सुशिलेचा देव' (पान ४०) व 'नलिनी' (पान १५९) या पानांतून दृष्टीस पडतात. 'सुशिलेचा देव' ह्या कादंबरींतील खालील उतारा त्यांच्या आत्मचरित्रावर प्रकाश पाडणारा असल्यामुळें मुद्दाम दिला आहे.

**एक उतारा**

"त्या वेळेस डेक्कन कॉलेजमध्यें बेनसाहेब प्रिन्सिपॉल होते. प्रिन्सिपॉलसाहेबांचा व मुलांचा संबंध वर्गाच्या बाहेर फारच थोडा होई. पण वर्गांत बेनसाहेबांचा 'अवर' म्हणजे केवळ स्वर्गीय आनंद. डेक्कन कॉलेजमधला दुसरा स्वर्गीय आनंद म्हणजे नदीवर 'बोटिंग' करण्याचा. तेथील डिबेटिंग वगैरे गोष्टी इतर कॉलेजप्रमाणेंच आहेत. फरक असला तर एवढाच कीं, डेक्कन कॉलेजमध्यें भाषणस्वातंत्र्य अधिक. एक दिवस सुनंदानें प्रिन्सिपॉलसाहेबांच्या समक्ष 'इंग्लिश लोकांनीं लबाडीनें राज्य मिळविलें आहे, त्यांच्याविरुद्ध बंड करणें शक्य नाहीं म्हणून इष्ट नाहीं; परंतु शक्य करतां आल्यास इष्ट होईल.' अशा प्रकारचीं विधानें केलीं. पण तींही तेथें पचलीं. इतरत्र पचणें कठीण असें वाटतें. बेननें सुनंदाची हंसत हंसत टीका करून चांगली हजेरी घेतली व इंग्रजांशिवाय दुसऱ्या एखाद्याचें राज्य असतें तर त्याला या भाषणाबद्दल फांशी दिलें असतें असें सांगितलें. व या राजद्रोहात्मक भाषणाबद्दल प्रायश्चित्त म्हणून 'यानें हिंदुस्थानचा इतिहास, या विषयाचा अधिक मार्मिक अभ्यास करावा

अशी मी शिक्षा फर्मावतों' असें विनोदी रीतीनें सांगून प्रकरण तेथल्या तेथेंच जिरवलें अशी दंतकथा आहे." (पान ४१) ह्यांतील आशयच फक्त सूज्ञ वाचकांनीं ध्यानांत घ्यावा. कारण कांहीं झालें तरी काल्पनिक कादंबरींतील ही एक दंतकथा. सुनंदा म्हणजे वामनराव नव्हेत हें सांगण्याचें तरी कारण काय?

प्रि. शार्प वामनरावांच्या निर्भीड भाषणावर कांहींच बोलले नाहींत. परंतु त्यांनीं वामनरावांना त्या संध्याकाळीं आपल्या बंगल्यावर बोलाविलें, आणि म्हणाले कीं, "राजकीय वादांत मी कधीं पडत नाहीं, पण बोलतां बोलतां न कळत आपण त्या प्रवाहांत सापडलों, तेव्हां झाल्या गोष्टी विसरून जा. Let us both forget and forgive." ('नलिनी'–पान १६० पहा) एवढें म्हणून त्यांनीं मोठ्या प्रेमळपणानें आणि सौजन्यानें वामनरावांना निरोप दिला. वामनरावांच्या धृष्टतेचें त्यांना मोठें कौतुक वाटलें आणि त्यांनीं त्यांचें म्हणणें मनांत मुळींच ठेवलें नाहीं. उलट एम्. ए. झाल्यावर वामनरावांना सरकारी नोकरी मिळण्याबद्दल त्यांनीं आपणहून खटपट केली. तिचा तात्काळ उपयोग झाला नाहीं ही गोष्ट निराळी. असो.

वामनरावांच्या लेखनास सुरुवात त्यांच्या विद्यार्थीदशेंतच झाली होती. डेक्कन कॉलेज मॅगेझिनमध्यें 'वामन' ह्या सहीनें त्यांनीं पुष्कळ इंग्रजी व मराठी छोटे छोटे लेख लिहिले. 'बायकांना उजव्या डोळ्यानें दिसत नाहीं!' ही चतुर कल्पकता व रसिक कविकल्पना यांचें दिग्दर्शन करणारी एक अभिनव गोष्ट त्यांनीं लिहिली. ही गोष्ट 'नवपुष्पकरंडक' या त्यांच्या लघुकथासंग्रहांत समाविष्ट केली आहे. या गोष्टीची उभारणी 'वामाक्षी' या एका शब्दावर आहे. बी. ए. मध्यें असतांना वामनरावांनीं उत्कृष्ट इंग्रजी निबंधाबद्दल शंभर रुपयांचें 'हॅवलॉक प्राईझ' मिळविलें.

## अकृत्रिम बंधुप्रेम

वामनरावांचें कॉलेजमध्यें शिक्षण चालू असतांनाच इंटरमध्यें त्यांचा १९०२ मध्यें विवाह झाला. त्यांचें लग्न जुन्या पद्धतीप्रमाणें झालें. लग्न ठरविणें, वधू निश्चित करणें वगैरे गोष्टी त्यांनीं आपल्या ज्येष्ठ बंधूंवर सोंपविल्या होत्या. वामनरावांचीं विवाहविषयक मतें आतां अतिशयच बदललीं आहेत. त्यांत इतकी मोठी क्रांति झाली आहे कीं, त्यांचें त्यांनाच आश्चर्य वाटतें. त्यांच्या ज्येष्ठ बंधूंनीं—महादेवरावांनीं—त्यांच्यासाठीं पहिल्यापासूनच अतिशय श्रम घेतले. त्यांचें डेक्कन कॉलेजचें शिक्षण, विवाह वगैरे गोष्टींत कोणत्याही प्रकारचें न्यून न ठेवतां त्यांनीं त्या गोष्टी अपत्यनिर्विशेष प्रेमानें केल्या. ह्या सगळ्या गोष्टींमुळें ते आपल्या ज्येष्ठ बंधूंबद्दल अत्यंत कृतज्ञ आहेत. प्रो. महादेव मल्हार जोशी हे जुनागड येथील 'बहुद्दिन' कॉलेजांत आमरणान्त संस्कृतचे अध्यापक होते. त्यांचा मराठीचा आणि संस्कृतचा व्यासंग बराच होता. त्यांचे लेख निरनिराळ्या मासिकांतून प्रसिद्ध झाले आहेत. त्यांचें 'आधुनिक सुशिक्षिताचा वेदांत' हें छोटें पण मननीय आणि विचारप्रवर्तक पुस्तक सुप्रसिद्ध आहे. त्यांचें देहावसान गेल्या वर्षीं झालें. त्यांच्या मृत्यूमुळें वामनरावांचा एक बंधुप्रेमाधार गेला, आणि त्यांना विशेष धक्का बसला.

वामनरावांचे मधले बंधू म्हणजे प्रो. महादेवराव यांच्या पाठचे श्री. नारायणराव जोशी हे आज मजुरांचे पुढारी म्हणून सर्वप्रसिद्ध आहेत.

या तिघां कर्तृत्ववान् भावंडांनीं डेक्कन कॉलेजांत १८९४ सालापासून १९०६ पर्यंत एकंदर एक तप लागोपाठ घालविलें. प्रो. महादेवराव व प्रो. वामनराव हे दोघे आपापल्या वेळीं कॉलेजमध्यें फेलो

म्हणून निवडून आले होते. तिघांनींही आपापल्यापरी स्वतंत्रपणें नांव मिळवून आपली अद्वितीयता प्रस्थापित केली ही गोष्ट विशेष गौरवास्पद व भूषणास्पद आहे. ह्या बुद्धिवान् व कर्तृत्ववान् अशा 'त्रयाणां बंधूनाम्' अलौकिकता सामान्य जनांना लोकविलक्षण वाटल्याशिवाय रहाणार नाहीं.

## कॉलेजमधील वातावरण

वामनराव वर्गांत शार्प किंवा सेल्बी या प्रिन्सिपॉलांना प्रश्न विचारण्यांत विशेष तत्पर असत. इतकेंच नव्हे तर बुद्धिसंघर्षक कूटप्रश्न काढण्यांत त्यांचा मोठा हातखंडा होता. सॉक्रेटीसची प्रश्नोत्तररूपानें शिक्षण देण्याची पद्धति त्यांना अतिशय प्रिय आहे. मात्र कॉलेजमध्यें असतांना त्यांनी ती समजून घेतल्यानंतर तिचा अवलंब केला असें मुळींच नव्हे. त्यांचे विशेष आवडते विषय तत्त्वज्ञान, इंग्रजी, संस्कृत व गणित हे जरी होते तरी इतिहास, भाषाशास्त्र, पदार्थविज्ञान इत्यादि विषयांचाहि त्यांचा कमीअधिक प्रमाणांत व्यासंग होता. त्यांना कोणताहि विषय नावडता होता असें मुळींच नाहीं. जो विषय ते हातीं घेत त्यांत ते अगदीं रंगून जात असत. क्लबांत सामाजिक विषयावर वाटेल तितका वादविवाद होई, पण त्या मानानें राजकीय विषयांवर तितकी अभिनिवेशपूर्वक चर्चा होत नसे. कारण तत्कालीन राजकारणांत विद्यार्थ्यांना विशेष आकृष्ट करून घेण्याचे गुण थोडेच होते, असें म्हटल्यास हरकत नाहीं. लोकमान्य टिळक यांच्याबद्दल बहुतेकांची पूज्यबुद्धि होती. परंतु राजकीय विषयांकडे एकंदर लक्षच कमी. प्रो. सोवनी हे वामनरावांच्या मित्रमंडळांत सर्वांचे विशेष आवडते होते. त्यांच्या रसिकतेवरून त्यांना 'शास्त्रीबोवा' हें टोपण नांव पडलें होतें. के. एफ्. नरिमन हे वामनरावांचे समकालीन असून ते त्या वेळींही इंग्रजींत चांगलें भाषण करणारे एक होतकरू वक्ते म्हणून प्रसिद्ध होते.

वामनराव १९०४ सालीं दुसऱ्या वर्गांत बी. ए. पास झाले. आणि कॉलेजमध्यें पहिल्या तीन विद्यार्थ्यांत त्यांचा नंबर आल्यामुळें त्यांना दक्षिणा फेलोशिप मिळाली. दोन वर्षे ते फेलो होते. पहिल्या वर्षी त्यांच्या क्रमानुसार त्यांच्याकडे कॉलेज जिमखान्याची जनरल सेक्रेटरीशिप आली. फेलो असतांनाही त्यांचा पुष्कळसा वेळ टेनिस आणि गप्पा यांत खर्च होत असे. त्यामुळें त्यांच्या अभ्यासाला खो बसून ते स्वत: त्या वेळीं अस्वस्थचित्त होत असत. परंतु टेनिसच्या मोहानें त्यांच्यावर आपला एवढा प्रभाव गाजविला होता कीं, ते एक वेळ हातांत घेतलेलें पुस्तक बाजूस सारून टेनिसकोर्टावर धांवत जात. टेनिसच्या भलत्याच नादामुळें त्यांचा मनासारखा अभ्यास होत नसे. शिवाय इच्छेला येतील तीं पुस्तकें वाचण्यांत त्यांचा एका दृष्टीनें अमूल्य वेळ खर्च होत असे. मात्र त्या वेळीं वाचन भरपूर झालें. व जें झालें तें भावी वाङ्मयव्यवसायास उपकारक असेंच झालें. ह्याप्रमाणें वामनरावांच्या कॉलेजांतील जीवनक्रमाची हकीगत आहे.

## सिंहावलोकन

आपल्या शिक्षणविषयक जीवनक्रमाचें सहजगत्या सिंहावलोकन करतांना कॉलेजमध्यें टेनिस व गप्पा यांत महत्त्वाचा वेळ निष्कारण खर्च झाला आणि त्यामुळें फर्स्ट क्लास कोठेंही मिळू शकला नाहीं याबद्दल वामनरावांना थोडा पश्चात्ताप वाटतो. पण नुसत्या क्लासावर जीवितसाफल्य अवलंबून नाहीं असें मनांत आणून त्यांचें तत्त्वबोधातुर मन लगेंच स्थिरही होतें. अशीं आंदोलनें इतरांना मनोरंजक वाटून त्यांना मनांतल्या मनांत हसूंही येतें. कारण त्यांच्या मतें यशस्वी जीवित झाल्यानंतरही असल्या आठवणी काढून तत्त्वज्ञानीसुद्धां मनाला हळहळ वाटून घेतो ही गोष्ट नवलाची नाहीं काय? आणि विद्यार्थीदशेंतील ह्या

दुर्ललितवृत्तीचा त्यांच्या जीवितक्रमावर कांहीं अनिष्ट परिणाम झाला आहे असेंहि म्हणतां येत नाहीं असो.

वामनराव १९०६ सालीं तत्त्वज्ञान घेऊन सेकंड क्लासमध्यें एम. ए. ची परीक्षा उत्तीर्ण झाले. आणि त्याचबरोबर आपल्या विद्यार्थी-दशेंतूनही निर्मुक्त होऊन ' पुढें काय ' ह्या प्रश्नचिन्हांकितांच्या मालिकेंत समाविष्ट झाले. आणि भावी आयुष्यक्रमाचा विचार ठरविण्याच्या जबाबदारीनें बांधले गेले.

---

# प्रकरण दुसरें

## पुढें काय ?

एम्. ए. झाल्यानंतर पुढें काय करावें या प्रश्नाचा विचार साहजिकच वामनरावांच्या डोळ्यांपुढें उभा राहिला. त्या वेळीं एम्. ए. ह्या प्राविण्य-पदवीस विशेष मानसन्मान असल्यामुळें एम्. ए. म्हणजे प्रोफेसर अशी जणूं एक स्वयंसिद्ध व्याख्याच ठरून गेली होती. कारण कॉलेजांच्या संख्येच्या मानानें प्रोफेसरांची संख्याहि अमर्याद झाली नसल्यामुळें साधारणपणें एम्. ए. झाल्यावर कोणासही प्रोफेसरीची जागा मिळण्यास सहसा अडचण पडत नसे. एम्. ए. चें विधिलिखित केवळ शाळा मास्तरकी अशी त्या वेळची परिस्थिति नव्हती. ज्यांना शिक्षणाच्या व्यासंगाची विशेष आवड आहे तेवढेच निवडक लोक एम्. ए. होत असत. वामनराव डेक्कन कॉलेजांत फेलोच असल्यामुळें त्यांना एम्. ए. ला बसणें भागच होतें. शिवाय तत्त्वज्ञान हा त्यांचा विशेष आवडता विषय असल्यामुळें एम्. ए. च्या परीक्षेला बसण्यास त्यांच्या बाबतींत बाह्य नेटाची अथवा निर्बंधाची मुळींच आवश्यकता नव्हती. अध्यापनाचें ध्येय डोळ्यापुढें ठेवून ते एम्. ए. झाले नाहींत ही गोष्ट पुन्हां सांगण्याचें कारण नाहीं. असो.

## पोस्टल सुपरिंटेंडंट ?

एम्. ए. झाल्यानंतर ते प्रिन्सिपॉल सेल्बी यांजकडे पुढील आयुष्यक्रमासंबंधींचा विचार घेण्यासाठीं गेले. ‘ तुमची इच्छा असेल तर मी तुम्हांस पोष्टखात्यांत सुपरिंटेंडंटची जागा मिळेल अशी तजवीज करतों, ’ असें प्रिन्सिपॉल यांनीं स्वतः सांगितलें. मोठ्या पगाराची नोकरी आपोआप आणि विनापरिश्रम घरीं चालून येत आहे असें पाहूनही

वामनरावांचें चित्त द्रव्यमोहानें विचलित झालें नाहीं. आणि तसल्या नोकरीच्या आमिषानें त्यांचें मुळींच समाधान झालें नाहीं. त्यांनीं ती नोकरी आभारपूर्वक नाकारली, आणि ते म्हणाले कीं " तत्त्वज्ञानाच्या प्रोफेसराची एखादी जागा मिळण्यासारखी असेल तर आपण मला त्या बाबतींत आवश्यक ती मदत करावी अशी आपणांस विनंति आहे. तुम्ही आपणहून माझ्यासाठीं इतके परिश्रम घेत आहां म्हणून तरी आपली स्वतःची इच्छा आपणांपुढें मी प्रांजळपणें मांडींत आहें." त्यावर 'अशी जागा सध्यां तरी कोठेंहि रिकामी नसल्यामुळें माझा नाइलाज आहे. मात्र मी तुमच्यासाठीं प्रयत्न करण्याचें आनंदानें आश्वासन देतों. तुम्हांला पुन्हां सांगतों कीं, पोस्टल सुपरिंटेंडंटची जागा माझ्या हातांत आहे. पुन्हां नीट विचार करून केव्हांहि या. मी सर्वतोपरी साह्य देऊं शकेन.' एवढें संभाषण झाल्यावर ही मुलाखत संपली. विद्यासेवक वामनरावांना पोष्टासारख्या खात्यांत हमाली करणें पसंत पडलें नाहीं, हें स्वाभाविक आहे. केवळ अधिक पगाराच्या लोभास्तव साधारण बुद्धिमत्तेचा माणूस ती नोकरी पत्करण्यास एका पायावर तयार झाला असता. पण तत्त्वज्ञ व ध्येयनिष्ठ वामनरावांना वित्तेषणेपेक्षां लोकसेवा प्रियतर असल्यामुळें त्यांनीं आपल्या जीविताचें सुकाणूं दुसरीकडे वळविलें. डेक्कन कॉलेजांतील त्या वेळचे कितीतरी फेलो प्रि. सेल्बींच्या शिफारसीनें पोस्टल सुपरिंटेंडंटच्या हुद्दयावर विराजमान झाले होते. आणि आजही ते मोठमोठ्या जागा अलंकृत करतांना दिसत आहेत. असो.

पुढें काय करावें या प्रश्नाचा अजूनही निकाल लागला नव्हता. डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या फर्ग्युसन कॉलेजांत शिरण्याबद्दल त्यांच्या वडील बंधूंच्यामुळें खटपटही झाली होती. त्याप्रमाणें फर्ग्युसन कॉलेजमध्यें जाण्याचें जवळजवळ ठरलेंही होतें. परंतु कांहीं अकल्पित कारणांमुळें तो विचार पुढें रहित झाला.

विद्यार्थी' म्हणून समर्थ विद्यालयांत होते. समर्थ विद्यालयाची एकंदर आणि समग्र हकीगत रा. रा. गो. कानडे व रा. गं. दे. खानोलकर यांच्या विजापूरकरचरित्रद्वयांत विस्तृतपणें आलेली आहे, ती जिज्ञासूंनीं पहावी.

**विश्ववृत्त**

'प्रो. विजापूरकरांनीं काढलेली 'ग्रंथमाला' १८९४ सालापासून १९०६ पर्यंत—एक तप चालली होती. ग्रंथमाला बहुतेक वाङ्मयविषयांनाच वाहिलेली असून तिच्यांत स्वतंत्र प्रकरणें व स्वतंत्र ग्रंथ देण्यांत येत असत. ग्रंथमालेची १२ वर्षांची तपस्या संपल्यावर राजकारणाशीं संलग्न असें एक मासिक काढून तद्द्वारां प्रचलित विषयांची माहिती लोकांना करून द्यावी असें विजापूरकरांना वाटूं लागलें. इंग्रजींतील Nineteenth Century, Quarterly Reiew, East & West वगैरे मासिकांच्या धर्तीवर आपणही एक मासिक काढावें ही कल्पना त्यांच्या मनांत घोळूं लागली. सरतेशेवटीं ग्रंथ मालेनंतर "विश्ववृत्त" नांवाचें मासिक काढण्याचें ठरलें. यासाठीं लो. टिळक, ना. गोखले, ग. ज. आगाशे, गो. वां. कानिटकर, पं. सातवळेकर इत्यादि अनेक विद्वान् लेखकांचें साहाय्य मिळविलें, चित्रशाळेचे वासुकाका जोशी यांच्यातर्फे खटपट करून त्यांनीं लोकमान्यांचा 'आशेची निराशा व निराशेची आशा' हा लेख मिळविला व तो पहिल्याच अंकांत प्रसिद्ध केला. —'( कानडेकृत 'विजापूरकर चरित्र')

प्रारंभीं प्रो. विजापूरकर हे विश्ववृत्ताचे संपादक असून त्यासंबंधींचें सर्व काम ते एकटेच पहात असत. परंतु त्यांना विद्यालयासाठीं प्रचारकाचें कार्य करावयाचें असल्यामुळें पहिले २१ अंक प्रसिद्ध झाल्यावर १९०८ सालीं त्यांनी आपले सहकारी प्रो. वामनराव जोशी यांच्याकडे विश्ववृत्ताचें संपादकत्व सोंपविलें. विश्ववृत्ताच्या मुखपृष्ठावर मात्र विजापूरकरांचेंच नांव मुख्य संपादक म्हणून कायमच होतें. वामनरावांचें नांव मात्र

सहसंपादक म्हणून घालण्यांत आलें. तथापि सर्व व्यवस्था वामनरावांनींच कुलमुखत्यारीनें पहावी असें दोघांत ठरलें होतें. मासिकांत इतर लेखांशिवाय संपादकीय स्फुटें म्हणून प्रचलित विषयांवर टीकात्मक अशीं लहान लहान टिपणें असत. त्यांतील बहुतेक वामनरावांच्याच हातचीं असत. ह्या स्फुटांशिवाय विश्ववृत्तांत वामनरावांचे इतरही कांहीं थोडेसे लेख प्रसिद्ध झाले आहेत.

हें मासिक नियमितपणें व व्यवस्थित रीतीनें चालूं लागलें होतें. पण तें कित्येक विघ्नसंतोषी लोकांना व सरकारला पाहवलें नाहीं. म्हणूनच कीं काय त्याच्यावर गंडांतर आलें. त्या मोठ्या गंडांतरांतून त्याची मुक्तता न होतां त्यास कायमचीच जलसमाधि मिळाली. सत्ताधारी सरकारनें वाङ्मयासारख्या निरुपद्रवी विषयाला वाहिलेल्या मासिकाला आपल्या वज्रप्रहारानें कायमचें नेस्तनाबूद केलें !

## विश्ववृत्ताची आहुति !

“ सबंध हिंदुस्थानांत त्या वेळीं जें होमकुंड पेटलें होतें त्यांतच विश्ववृत्ताची आहुति पडली असेंच म्हणणें अधिक रास्त होईल. याच वेळीं बंगाल्यांत बॉंब गोळ्यांचा स्फोट झाल्यामुळें त्याचा जोराचा धक्का महाराष्ट्रासही बसल्यावांचून राहिला नाहीं. एकदम कलकत्त्याचें बाँब गोळाप्रकरण चोहोंकडे पेटलें ! क्षणार्धांत त्याच्या ज्वाळा महाराष्ट्रांतही भडकल्या. सरकारला त्या वेळीं कांहीं सुचेनासें झालें ! चोहोंकडे ‘ राजद्रोह, राजद्रोह,’ अशी एकच हाकाटी माजून राहिली! आणि सरकारच्या संशयपिशाच्चांनीं सर्व हिंदुस्थानभर थैमान करून अगदीं निरुपद्रवी लोकांना केवळ संशयामुळें गांजिलें असें म्हणतात. त्या वेळीं ब्रिटिशसरकारनें प्रेस ॲक्ट, १८१८ चा कायदा वगैरे जुनीं नवीं सर्व गंजलेलीं हत्यारें बाहेर काढलीं व केसरी, मराठा, भाला, राष्ट्रमत वगैरे सारख्या राष्ट्रीय पक्षाच्या वर्तमानपत्रांची मुस्कटदाबी केली.

## कलकत्ता काँग्रेस

१९०६च्या डिसेंबरमध्यें काँग्रेसचें बाविसावें अधिवेशन कलकत्ता येथें भरलें होतें. त्या प्रसंगीं केवळ काँग्रेस पहाण्याच्या हेतूनेंच वामनराव कलकत्त्यास गेले. परंतु विधिघटना निराळीच होती. त्यांच्या आयुष्यांत परिवर्तन घडवून आणण्याचें आणि त्याला नवीन वळण देण्याचें कार्य ह्या कलकत्त्याच्या प्रवासानें अभावितपणें आणि अकल्पित रीतीनें घडवून आणलें. पुढील आयुष्याची रूपरेखा अद्याप त्यांनीं आंखली नव्हती. ती रूपरेखा कलकत्त्यासारख्या दूर ठिकाणीं निश्चित होईल अशी त्यांना स्वप्नांतही कल्पना आली नसेल ! वामनरावांचें कलकत्त्यास जाणें झालें नसतें तर त्यांच्या आयुष्यचक्रास कशी गती मिळाली असती कोणास ठाऊक ! त्यांच्या भावी यशोमंदिराचा पाया कलकत्त्यास घातला गेला असें आपणांस म्हणतां येईल काय ? किंवा त्यांच्या जीवितास कांहींतरी भलतेंच वळण लागलें असें म्हणण्याचा प्रसंग आपणांवर ओढवेल काय ? ह्या प्रश्नांबद्दल वाटाघाट करण्यांत कांहीं तात्पर्य नाहीं. म्हणून हे प्रश्न तसेच अनुत्तरित सोडून देऊन खुद्द तेथें घडलेल्या अकल्पित योगायोगाचीच हकीगत निवेदन करणें अधिक श्रेयस्कर होईल.

## समर्थविद्यालय

कलकत्ता येथें वामनरावांची प्रो. विष्णु गोविंद विजापूरकर यांच्याशीं गांठ पडली. प्रो. विजापूरकर हे राष्ट्रीय शिक्षणाचे कट्टे पुरस्कर्ते असून त्यांनीं कोल्हापूरला समर्थविद्यालय नांवाची एक राष्ट्रीय शाळा काढली होती. त्यांत अध्यापकाचें काम करून राष्ट्रीय शिक्षणाच्या कार्याला येऊन मिळण्यासाठीं त्यांनीं वामनरावांना बोलाविलें. वामनरावांना ही राष्ट्रीय शिक्षणाची कल्पना ताबडतोब पटलीच.

शिवाय मातृभाषेंतूनच शिक्षण देण्यांत यावें, शिक्षणाचें माध्यम मातृभाषा असावें अशीं त्यांचीं स्वतःचीं निश्चयात्मक मतें असल्यामुळें आणि ह्या राष्ट्रीय शाळेंत त्याच पद्धतीनें शिक्षण देण्यांत येत असल्यामुळें त्यांनीं विजापूरकरांच्या निमंत्रणाला तात्काल संमति दिली. आणि १९०६ सालीं ते त्याप्रमाणें समर्थविद्यालयाला येऊन मिळाले.

हें राष्ट्रीय विद्यालय १ जून १९०६ सालीं कोल्हापूरला प्रो. विजापूरकरांनीं स्थापन केलें होतें. सुरवातीस अवघे १८ विद्यार्थी होते, परंतु सहा महिन्यांतच विद्यार्थ्यांची संख्या ७५ वर गेली ! अशांत जनार्दन सखाराम करंदीकर, वामन मल्हार जोशी, नरहर बाळकृष्ण जोशी वगैरे मंडळी येऊन मिळाली. याशिवाय रा. दा. देसाई, ज. वि. ओक, पेणचे करंदीकर, मोडक, कोतवाल वगैरे मंडळीही अध्यापक वर्गांत होती. अशा रीतीनें समर्थविद्यालयाची भरभराट झपाट्यानें चालू झाली. पुढें १९०७ चे श्रावण महिन्यांत कोल्हापूरला प्लेग सुरू झाल्यामुळें चालकांना समर्थ विद्यालय मिरज येथें कृष्णाकाठीं एका प्रशस्त वाड्यांत न्यावें लागलें. पुढें कोल्हापूरच्या आपटे नांवाच्या एका गृहस्थांनीं आपली तळेगांवजवळची ६४ एकर जमीन विद्यालयाला कांहीं सवलतीनें खरेदी दिली. १९०७ च्या नोव्हेंबरांत दिवाळीच्या सुट्टीनंतर विद्यालय तळेगांव येथें आपल्या स्वतःच्या जागेंत येण्याचें ठरलें. तत्पूर्वी विद्यालयानें एका शुभ दिवशीं मिरजला प्रस्थान ठेवलें होतें. तळेगांवाला प्रथम विद्यार्थी व शिक्षक यांच्यासाठीं साध्या झोंपड्या उभारण्यांत आल्या. आणि नंतर क्रमाक्रमानें पक्क्या इमारती तयार कारण्यांत आल्या. येथें आल्या वर विद्यार्थ्यांची संख्याही वाढूं लागली. ह्याप्रमाणें विद्यालयाचा उत्तम रीतीनें जम बसल्यावर प्रो. विजापूरकर विद्यालयाला मदत मिळविण्यासाठीं आणि राष्ट्रीय शिक्षणाचा प्रचार करण्यासाठीं निघूं लागले. महादेवशास्त्री दिवेकर व दिनकरशास्त्री कानडे हे त्या वेळीं प्रबुद्ध

असो. केसरीवर खटला होऊन लोकमान्य तुरुंगांत गेले. तेव्हां राजकीय वातावरण थोडें शांत झालें व सरकारला थोडें बरें वाटलें. तरी राष्ट्रीय शिक्षणाची चळवळ करण्यासाठीं हातीं कंकण बांधून निघालेले प्रो. विजापूरकर मोकळे रहातात ही गोष्ट त्या वेळच्या अधिकाऱ्यांना मात्र बरी वाटली नाहीं असें दिसलें. लागलींच 'विश्ववृत्तां'त श्री. दा. सातवळेकर यांचा 'वैदिक प्रार्थनांची तेजस्विता' हा लेख याच सुमारास आला, आणि त्याच अंकाच्या शेवटीं बॉंबगोळ्यासंबंधीं एक स्फूट प्रो. विजापूरकरांनीं लिहिलें होतें. त्याचा फायदा घेऊन कोल्हापुरकरांनीं प्रो. विजापूरकर व त्यांचे सहकारी प्रो. वामनराव जोशी यांच्यावर खटला भरला." (कानडेकृत 'विजापूरकर चरित्र')

विश्ववृत्ताच्या दुसऱ्या वर्षाच्या नवव्या अंकांत हा सातवळेकरांचा लेख प्रसिद्ध झाला आहे. त्या लेखांत 'जे क्षत्रिय शत्रूंच्या सैन्याचा दुनियेंतील गुलामीचा बीमोड करीत नाहींत त्यांच्या छत्रपतित्वाचा, समशेरबहादरत्वाचा त्यांच्या राष्ट्राला काय उपयोग आहे?' असें एक वाक्य होतें. या वाक्यांतील 'छत्रपति' हा शब्द कोल्हापूरच्या महाराजांस उद्देशून लिहिला असून तो त्यांची बेअब्रू करणारा आहे, इतकेंच नव्हे तर सबंध लेखच राजद्रोहात्मक व खुनास उत्तेजन देणारा आहे, असा आक्षेप घेण्यांत आला.

प्रो. वामनराव जोशी यांनीं या लेखाबद्दल आपल्या जबानींत खालील उद्गार काढले होते:—

'आक्षिप्त स्फुटें मी लिहिलेलीं नाहींत. तीं कोणीं लिहिलीं हें 'संपादकाची गुप्त गोष्ट' म्हणून मी सांगूं शकत नाहीं. आरोपित लेख फक्त विद्वान् लोकच वाचतील अशी माझी समजूत होती. या लेखानें खुनास चिथावणी होते असें फक्त मूर्ख असेल त्यालाच वाटेल. आपल्या शत्रूंशीं नम्रपणानें व कितीही नुकसान सोसावें लागलें

तरी तें सोसून त्यास क्षमा करीत रहावयाचें, असें कोणी वागूं नये, एवढाच या लेखाचा अर्थ आहे. '–" ( खानोलकरकृत 'विजापूरकर–चरित्र ' )

ह्या विश्ववृत्ताच्या राजद्रोहाच्या खटल्याची सार्वंत हकीगत प्रो. विजापूरकर यांच्या चरित्रद्वयांत आलेलीच आहे. आपला प्रो. वामनराव जोशी यांच्या चरित्राशीं संबंध असल्यामुळें येथें अधिक विस्तार करण्याची जरूरी नाहीं. खटल्याची समग्र माहिती, तत्कालीन परिस्थिति, दरबारसंबंधाचा पत्रव्यवहार वगैरे हकीकत येथें अप्रस्तुत होईल. वामनरावांनीं स्वतः ह्या खटल्यासंबंधीं जी हकीगत दिली आहे तेवढीच येथें उद्धृत केल्यास वाचकांना ह्या प्रकरणाचें इत्थंभूत स्वरूप समजेल, अशा समजुतीनें त्यांतील जरूरीपुरता भाग खालीं दिला आहे.

## विश्ववृत्तासंबंधीं खटला

" आपण आतां ' विश्ववृत्ता 'संबंधीं जो खटला झाला व ज्यांत त्यांना तीन वर्षांची सजा झाली त्यांत किती न्याय होता तें पाहूं. आधीं मुख्य आक्षेपविषयक लेख श्रीपाद दामोदर सातवळेकरांनीं लिहिलेला. ते कधीं राजकारणांत पडले नव्हते. विषय " वैदिक प्रार्थनांची तेजस्विता. " वेदाचा प्रचलित राजकारणाशीं संबंध काय ? बरें, प्रतिपादनांत राजकारण भरलें होतें काय ? फक्त एक वाक्य प्रचलित राजकारणाशीं साक्षात् रीतीनें संबद्ध असें खुद्द फिर्यादीपक्षाचें म्हणणें. न्यायाधीश आपल्या जजमेंटमध्येंच कबूल करतात कीं, हा लेख या काळीं या विशिष्ट परिस्थितींत, या राजकीय चळवळीच्या प्रसंगीं लिहिला गेला म्हणून दूषणीय; इतर परिस्थितींत लिहिला गेला असता तर त्यांत दूषणीय कांहीं नाहीं. म्हणजे राजकीय वातावरण खवळलेलें असल्यामुळें अनाक्षेपनीय लेख आक्षेपार्ह झाला !

राजकीय वातावरण खवळविण्याचें पाप लेखकानें किंवा विश्ववृत्ताच्या संपादकांनीं केलें होतें काय ? नाहीं. सौम्य शुद्ध लेख कां असेना. तो भलत्या वेळीं प्रसिद्ध केला हा एवढा फार तर गुन्हा. बरें, अशा परिस्थितींतच लख मुद्दाम प्रसिद्ध करावा असा लेखकाचा किंवा संपादकाचा हेतु होता काय ? दुष्ट बुद्धीनें ही गोष्ट झाली होती काय ? नाहीं, फिर्यादीतर्फे पुरावा या बाबत मुळींच नाहीं. उलट अण्णा विजापूरकरांनीं हा लेख पाहिलाही नव्हता. हें वामनराव जोशी यांच्या कबुलीजबाबावरून स्पष्ट झालेलें. मग अमक्या वेळींच, अमक्या दुष्ट-बुद्धीनें तो प्रसिद्ध करावा अशी अण्णांची इच्छा होती या म्हणण्यांत अर्थ काय ? आतां, कायदेशीर रीतीनें ते जबाबदार होते व चुकून कां होईना, न कळतां कां होईना, शुद्ध स्वरूपाचा लेख भलत्या वेळीं त्यांच्या मासिकांत प्रसिद्ध झाला, याबद्दल ते कायदेशीर रीत्या जबाब-दार धरले पाहिजेत. 'कायदा' असा आहे हें कबूल. पण "The law is an ass" असें जें म्हणण्यांत येतें तेंच येथें म्हणावेंसें वाटतें. आणि भलत्या काळीं प्रसिद्ध झाला याविषयीं सुद्धा असें म्हणावेंसें वाटतें कीं, बाबानों, 'भलत्या काळीं' प्रसिद्ध झाला हें तुमचें म्हणणें अक्षरशः खरें आहे—कारण त्या तशाच काळीं अशा शुद्ध स्वरूपाच्या "वैदिक" लेखाबद्दल तीन वर्षांची सजा मिळणें शक्य होतें!

## खुनास मदत ? कोणाचा खून ?

"माझ्यावर व विनायकराव जोशीराव यांचेवर 'खुनास मदत' कर-ण्याचा आरोप होता. आम्हांला या आरोपाची बातमी प्रथम तळेगांवा-सच वर्तमानपत्रांच्या द्वारें लागली. 'खुनाला मदत ? कोणाचा खून ? कोणी केव्हां कशी मदत दिली ?' आम्हांला कोणाला कांहींच अर्थ कळेना. कांहींतरी कोणी कुभांड रचलें असावें असें मला वाटलें व मी थोडासा घाबरून गेलों, पण क्षणभरानें माझें मलाच हसूं आलें.

कोणाचा खून करण्याचें स्वप्नांत देखील नाहीं. आणि हा असला आरोप तर ठेवलेला, तेव्हां आतां जगाच्या मूर्खत्वाकडे व दैवाच्या विचित्र लीलांकडे पाहून हंसावयाचें नाहीं तर काय करावयाचें ? अस्तु. आम्ही कोल्हापुरास गेलों, तेथें रीतसर खटला सुरू झाला. त्या वेळेस मॅजिस्ट्रेट भास्करराव जाधव यांच्यापुढें कमिट होण्याकरितां साक्षीपुरावा चालला असतां आमच्या वकिलानें ( आपट्यांनीं ) कोल्हापूर सरकारतर्फेचे वकील रा. कदम यांस आरोप काय आहे, तो निश्चित स्वरूपांत सांगण्यास विनंति केली. ते अर्धवट अडखळत व अस्पष्ट स्वरांत म्हणाले,

" कोल्हापूर सरकारच्या खुनास .......मदत........" " काय ? " आमचे वकील म्हणाले, " कोल्हापूर सरकारच्या ? गव्हर्नमेंटचा खून ? सरकारचा कसा खून करणार ? बरें असो. मला शब्द लिहून घेऊं द्या. काय म्हणालेत— कोल्हापूर सरकारचा खून ....... "

" हें पहा. हे वकील आम्हांला मध्येंच अडवितात. " अशा आशयाचें कांहीं म्हणून कदम यांनीं आपलीं वाक्यें सुधारून घेऊन बोलण्यास सुरुवात केली.

हाच मुद्दा स्पेशल सेशन्स जज्ज मि. किंकेड यांनीं आपण होऊनच पुढें काढला. त्यांनीं कोल्हापूर सरकारतर्फेच्या बॅरिस्टरांना—ब्रॅन्सन यांना—विचारलें कीं, तुमचें म्हणणें घटकाभर सगळ खर धरल, तरी कोणाचा खून झालेला नाहीं. इतकेंच नव्हे तर खून करण्याचा प्रयत्नही झाला नाहीं, तेव्हां ' खुनाला मदत ' देण्याचा आरोप कसा लागू पडणार ? खून न होतां, किंवा प्रयत्नही नसतां, खुनाच्या उत्तेजनाचें कलम कसें लावावयाचें ? यावर बॅरिस्टर ब्रॅन्सन यांनीं अशी कोटी लढविली, " समजा कीं एकादा मनुष्य एकाद्या जनसमूहावर गोळीबार करण्याची इच्छा करतो आहे. तो अर्थात समूहांतील कोणाला तरी गोळी लागावी

अशी करणार. अमक्या मनुष्यालाच लागावी असा त्याचा हेतु असेलच असें नाहीं. कोणाचें नांवगांवही त्याला ठाऊक नसेल. पोलिसांनाही कदाचित् नांवगांव मिळणार नाहीं. त्या मनुष्याची गोळी कोणास लागणार नाहीं. किंवा गोळी उडालीच नाहीं किंवा त्यानें बंदूक झाड-लीच नाहीं. तथापि खुनाची इच्छा सिद्ध झाल्यास तो गुन्हेगार होईल. तसेंच त्या मनुष्याला मदत करणाराही गुन्हेगार होईल—मग खून होवो किंवा न होवो, कोणाचा खून करावयाचा हें ठाऊक असो वा नसो—"

किंकेडसाहेबांना हा बॅरिस्टरी दाखला पटला किंवा नाहीं हें समजण्यास मार्ग नाहीं. एवढें मात्र मला म्हणतां येईल कीं तेही चांगले डोकेबाज आहेत. कारण मूळ लेख वैदिक प्रार्थनांविषयींचा असून त्याचाच तेवढा विचार केला तर तो सोंवळा आहे हें त्यांनीं जरी आपल्या निकालांत कबूल केलें तथापि "हा असा लेख विशिष्ट परिस्थितींत छापला हा दोषच समजला पाहिजे." अशा आशयाचा शेरा त्यांनीं मारलाच !

+ + +

"झालें. शिक्षा झाली. अण्णांना तीन वर्षें साधी, मला तीन वर्षें सक्तमजूरी, विनायकरावांना दीडवर्षें सक्तमजूरी. प्रथम आम्ही दोन एक महिने कोल्हापूर जेलमध्यें होतों. नंतर आम्हांस पन्हाळ्यास पाठविण्यांत आलें. तेथें कांहीं दिवस पुस्तकें वगैरे वाचावयास मिळालीं, व इतरही कांहीं सवलती मिळाल्या. पण पोलिटिकल एजंटाच्या सांगी-वरून म्हणा किंवा दुसऱ्या कांहीं कारणास्तव आमच्या सगळ्या सवलती एके दिवशीं काढून घेण्यांत आल्या व आम्हांला मिलिटरी (फौजी) पहाऱ्यांत ठेवण्यांत येऊन अत्यंत कडक शिस्तींत ठेवण्यांत आलें. अण्णा एका खोलींत व आम्ही दोघे एका खोलींत अशी

व्यवस्था होती. अण्णांची खोली आमच्या खोलीला लागून होती. पहारेकरी आम्हांला अण्णांशीं बोलूं देत नसत. तेव्हां आम्हांला अशी भीती पडली कीं हें काय प्रकरण आहे आणि कोठल्या थरास जात आहे कोणास ठाऊक ? आम्ही दोघेजण एका खोलींत होतों तेव्हां आमचा वेळ कसा तरी जात असे. पण अण्णांना फारच त्रास झाला असला पाहिजे. विनायकरावांच्या कां माझ्या डोक्यांत विचार आला कीं अगदीं शेजारीं असून एकमेकांशीं विचारविनिमय करतां येऊं नये हें कांहीं बरें नव्हे, कांहींतरी युक्ति शोधून काढलीच पाहिजे. भिंतीवर टिचक्या मारून अण्णांच्या खोलींत तार ऑफिसांतल्या यंत्राप्रमाणें आवाज उत्पन्न करून त्यांच्याशीं बोलतां येईल अशी आमच्या दोघांत शक्कल निघाली. पण आमच्या खोलींतल्या भिंतीवर हळूच टिचकी मारून अण्णांच्या खोलींत आवाज उत्पन्न होईल किंवा नाहीं ही शंका डोकावूं लागली. तेव्हां प्रयोग लागलाच रात्रीं ९चे सुमारास झाला. अण्णांच्या कानावर टिचक्यांचा आवाज गेला, पण हा आवाज अर्थात् आपले सोबती करताहेत हें ओळखून त्यांनीं स्वस्थ बसावयाचें तें न करतां ते मोठयानें म्हणाले, "कोण टिचक्या वाजवतंय् तें ! पहारेकरीबुवा, भिंतीवर कोण काय वाजवतंय् पहा!" या प्रकारामुळें आम्ही दोघे भांबावून गेलों. डोकीवरून घोंगडी घेऊन व झोंपेचें सोंग घेऊन आम्ही ती वेळ कशी तरी निभावून नेली. आमचा मूर्खपणाच होता सगळा, कारण अण्णांना आम्हांला गुप्त रीतीनें असें काय सांगावयाचें होतें कीं याकरितां आम्ही अशी युक्ति योजून ठेवावी ? रिकामा न्हावी कुठेंतरी तुंबड्या लावतो त्यांतलाच खुळा प्रकार होता तो. पण अण्णांचा भोळेपणा किती तो पहा. भिंतीवर टिचक्या मारणारे आमच्याहून कोणी शक्य नाहीं हें त्यांच्या ध्यानांत आलेंच नाहीं! असल्या त्या भोळ्या ब्राह्मणास 'खुनास उत्तेजन' ह्या

आरोपावरून तीन वर्षांची शिक्षा होते, तेव्हां सरकारच्या लीला अगाध म्हणाव्यात का दैवाच्या लीला विचित्र म्हणाव्यात ?

**इयं सा जातिः परित्यक्ता ।**

"पन्हाळ्याहून आम्हांला पुन्हां कोल्हापुरास आणिलें तेव्हां अण्णांना कांहीं दिवस अशा खोलींत रहावें लागत होतें कीं, तेथें जिकडे तिकडे ओलच ओल होऊन गेली होती, निजण्यापुरती देखील पुरतीशी कोरडी जागा नव्हती ! मानसिक त्रासहि कमी नव्हता. शिक्षेच्या न्याय्यान्याय्यतेचा विचार सोडून दिला तरी दुसऱ्या किती तरी जाचक गोष्टी त्यांच्या मनाला शीण आणीत होत्या. उदाहरणार्थ, एके दिवशीं आमची तिघांची झडती झाल्यावर "तीं जानवीं काढून ठेवा" असें शिपाई आम्हांला सांगूं लागले. आम्ही पुष्कळ हुजत घातली पण ते शिपाई ऐकेनात. अखेर कंटाळून व वैतागून विनायकरावांनीं व मी विचार केला कीं, पुढें काय प्रायश्चित्त घ्यावयाचें तें घेऊं, आतां या मूर्खांच्या अंगावर जानवें फेकून द्यावें झालें ! असा विचार करून आम्ही दोघांनीं तर वेणीसंहारांतील अश्वत्थाम्यानें "इयं सा जातिः परित्यक्ता" असें म्हणून जसें जानवें फेकून दिलें तशाच प्रकारें केवळ नाहीं तरी पण तशाच थोडयाबहुत आविर्भावानें जानवीं काढून टाकलीं. पण अण्णांनीं दोनचार घटकाच नव्हे तर दोनचार तास त्या अडाण्यांशीं वाद घातला. 'जेल-मॅन्युअलमध्यें अमुक नियम आहे, तुम्ही आपल्या वरिष्ठांना विचारून या, ते तुम्हांवर रागवणार नाहींत' इत्यादि प्रकारचा वेदांत ते त्या मूर्खांना हरतऱ्हेनें सांगूं लागले. पण त्यांचें एकच सडेतोड व उद्धटपणाचें उत्तर होतें "हम् ए कुच जानता नहि." गाढवांपुढें गीता वाचण्याचा हा प्रकार इतका वेळ चालला कीं, शेवटीं अण्णांना आम्ही दोघांनीं सांगितलें कीं, "अण्णा, यांच्या नादीं लागण्यांत अर्थ नाहीं. आपण मागाहून प्राय-

श्चित्त घेऊं. उगाच हे अडाणी लोक अंगाला हात लावतील व आपली भलतीच शोभा करतील " वगैरे वगैरे. अखेर अण्णांनीं जानवें काढून दिलें. पण देतांना त्यांना जें वाईट वाटलें तें वर्णन करून सांगतां येणार नाहीं. हल्लींच्या माझ्या दृष्टीनें जानव्याबद्दल इतका आग्रह मला आवश्यक वाटत नाहीं. पण मी कितीहि 'सुधारक' झालों तरी अण्णासारख्यांच्या प्रामाणिक श्रद्धेंतील व आग्रहांतील दिव्यत्व मला केव्हांहि आदरणीयच वाटणार. अस्तु. अशा या सात्त्विक ब्राह्मणावर 'खुनाचा' आरोप ठेवणारानें ठेविला कसा व जज्जानें तो आरोप सिद्ध मानला कसा हें गूढच आहे. अथवा गूढ तरी कसलें? जगांत असले विपरीत प्रकार काय थोडे होत आहेत? सॉक्रेटीस, येशूख्रिस्त, महात्मा गांधी, इत्यादिकांवर नाहीं नाहीं ते आरोप जर येतात व ते 'सिद्ध' होतात, तर प्रो. विजापूरकरांना तरी अपवादकोटींत कोण कां घालणार? जगांत भौतिक वादळानें किती तरी झाडें फळामुळां-सुद्धां उन्मळून खालीं पडतात, त्यांतलाच हा मानवी जगांतील प्रकार मानावा झालें."

## कारागृहवासांतील हकीगती

पन्हाळगडाहून कोल्हापूरला वामनरावांना परत आणल्यावर महा-राजांनीं त्यांना दशकुमारचरिताचें मराठी भाषांतर करण्याचें काम दिलें. वामनरावांनीं ह्या पुस्तकापेक्षां दुसरें एकादें चांगलें पुस्तक भाषांतरा-साठीं देण्यांत यावें असें उत्तर पाठविलें. परंतु महाराजांनीं ह्या राज-बंद्याचें म्हणणें मान्य न करतां तें भाषांतर ताबडतोब करण्याबद्दल आज्ञा फर्मावली. वामनराव त्या वेळेस स्वतंत्र नव्हते, त्यामुळें त्यांना महाराजांचा हुकूम निमूटपणें अमलांत आणणें भाग पडलें. वामनरावांनीं दशकुमाराचें अर्ध्याच्यावर भाषांतर केलें. परंतु तेंही अर्धेमुर्धे भाषांतर कुठें कालो-दरांत गडप झालें त्याचा पत्ता नाहीं. भाषांतराला मदत-पुस्तकें व

संदर्भ-ग्रंथ म्हणून ते इतर पुस्तकें मागवीत असत आणि त्यांच्या मागणीप्रमाणें तीं तीं पुस्तकें त्यांना ताबडतोब मिळत. मग त्या पुस्तकांचा भाषांतराशीं अर्थाअर्थी संबंध असो वा नसो. ह्याप्रमाणें त्यांनीं ह्या सवलतींचा व सैल बंधनाचा फायदा घेऊन इच्छेला येतील तीं पुस्तकें आणवून वाचून काढलीं.

**एक प्रसंग**

१९०९ जानेवारी ते १९११ ऑक्टोबरपर्यंत वामनरावांना सक्त मजुरीची शिक्षा भोगावी लागली. शिक्षा झाल्यावर पहिले २ महिने कोल्हापूर, नंतर दोन महिने पन्हाळा, पुन्हां कोल्हापूर आणि शेवटीं राहिलेलीं २। वर्षे सिंध-हैद्राबाद याप्रमाणें निरनिराळ्या ठिकाणीं वामनरावांना आपले खडतर दिवस काढावे लागले. कोल्हापुराहून हैद्राबादेस जात असतां वाटेंत एक संस्मरणीय प्रसंग घडला. रेल्वेंतून जात असतां त्यांच्याबरोबरच्या शिपायांनीं स्वतःची माणुसकी आणि औदार्यबुध्दि प्रकट केली. ह्या गोष्टीचें वामनरावांना मोठें कौतुक तर वाटलेंच पण त्याबद्दल गहिंवर आला. प्रवासांत कैद्यांना रोजीं दोन आणे भत्ता देत असत. दोन आण्यांत कैद्यांना कसें जेवण मिळणार असा चिंताजनक व भूतदयाप्रेरक विचार शिपायांच्या डोक्यांत आला आणि त्यांनीं स्वतःच्या खर्चानें त्यांना जेवण देण्याचें ठरविलें. वामनरावांनीं त्यांचें म्हणणें कृतज्ञतेनें नाकारलें आणि मिळणाऱ्या भत्त्यांतच जें येईल तें खाण्याचें ठरविलें. इतक्यांत—अत्यंत अनपेक्षित योगायोगानें त्या स्टेशनावर वामरावांचा कोणी एक स्नेही भेटला आणि त्यानें सर्वांच्या खाण्यापिण्याची उत्तम व्यवस्था केली. हैद्राबादसारख्या दूरच्या ठिकाणीं आणि अशा चमत्कारिक परिस्थितींत हा स्नेही भेटावा याचें वामनरावांना अत्यंत आश्चर्य वाटलें आणि हा योगायोग अमानुष स्वरूपाचा असावा अशी त्यांची दृढ समजूत झाली. त्या

गृहस्थाला उघडपणें ह्या राजबंद्यांना मदत करण्याची चोरी असल्यामुळें त्यानें अत्यंत गुप्तपणें आणि मोठ्या चातुर्यानें त्यांना मदत पोहोंचविली. आणि त्या शिपायांच्या कृतज्ञतेच्या उपकारांत ऋणबद्ध होण्यापासून त्यांची मुक्तता केली. ही गोष्ट वामनरावांच्या मनांत इतकी खोल जाऊन बसली आहे कीं, त्यांना ह्या अकल्पित योगायोगाचें पुनः पुनः आश्चर्य वाटल्यावांचून रहात नाहीं. असो.

वामनरावांना हैद्राबादेस नेल्यानंतरची हकीगत प्रस्तुत लेखकाच्या शब्दांत न देतां त्यांनीं आपल्या " तुरुंगांतील आठवणी " म्हणून जे अनुभव प्रसिद्ध केले आहेत त्यांतीलच उतारे देऊं, म्हणजे अधिक उचित आणि श्रेयस्कर होईल.

## माझ्या तुरुंगांतील आठवणी

"अण्णासाहेब, रस्त्यावर शेण पडलें आहे, तें आणा आंत." प्रो. अण्णासाहेब विजापूरकर यांना रस्त्यावरचें शेण आणावयास सांगणारा कोण तर गोविंद नांवाचा पन्हाळा जेलखात्यांतला शिपाई ! विनायकराव•जोशीराव आणि मी त्या वेळीं त्याच खोलींत कैद्यांच्या वेषांत स्वयंपाक करण्यांत गुंतलों होतों. प्रो. विजापूरकर हे कैदी होते, पण साध्या वेषांत उभे होते. गोविंदा शिपायाच्या आम्ही ताब्यांत. अर्थात् 'गोविंदराव' ( आम्ही कैदी असल्यामुळें त्या वेळीं त्याला गोविंदराव म्हणत होतों. ) प्रो. विजापूरकरांना देखील रस्त्यावरचें शेण आणावयास सांगणार ! शेण आमच्या उपयोगाकरितांच होतें आणि खरें सांगावयाचें म्हणजे 'गोविंदरावां'चा हेतु कांहीं वाईट नव्हता. पण आमच्या विनायकराव जोशीरावांना त्याचे ते शब्द चमत्कारिक वाटले आणि मलाही ते तसेच वाटले. कडू कारल्याला गोड करून घेऊन वागावयाचे ते दिवस होते. आणि आमची वृत्तीही अनुरूप होती. त्यामुळें विनायकराव मला म्हणाले, " वामनराव, ऐकलेत का शब्द ?

एकाद्या लहानशा गोष्टीचा आरंभ करायला किती चांगले आहेत ? कैदेंतून सुटल्यावर हे शब्द घेऊन गोष्टीचा आरंभ करा. ''

मी म्हटलें, '' विनायकराव, लहान गोष्टी माझ्यापेक्षां तुम्हींच चांगल्या लिहिता; तर तुम्हीच एखादी लिहिली पाहिजे. ''

झालें, ठरलें आमचें. पण विनायकरावांनीं योजिलेली गोष्ट त्यांनीं लिहिली नसावी; निदान ती माझ्या पहाण्यांत नाहीं. म्हणून मींच त्या शब्दांनीं आरंभ करून, गोष्ट नव्हे तर अनेक गोष्टींना थोडीबहुत सामग्री मिळेल अशा कांहीं तुरुंगांतल्या आठवणी लिहितों:—

प्रोफेसर विजापूरकर, विनायकराव जोशीराव व मी यांचे ते दिवस—दु:खाचे ते दिवस—गेले ! तें '' विश्ववृत्त '' मासिक बुडालें,—' विश्ववृत्ता 'वरचा तो १९०८ मधला खटला आतां एकाद्या वेळेसच आठवतो. कोल्हापूर, पन्हाळा व शेवटीं सिंध-हैद्राबाद येथील तुरुंगवास संपला, ते कष्टाचे काळजीचे दिवस गेले. त्याच्या नंतरचेही बरेवाईट दिवस आले आणि गेले, आणि आतांचेही बरेवाईट दिवस आहेत ते जातील ! पण जोंपर्यंत स्मरणशक्ति धड• आहे तोंपर्यंत तुरुंगाची आठवण बुजणें शक्य नाहीं.

हालअपेष्टांच्या किंवा अपमानांच्या आठवणीसंबंधानें मी हें म्हटलेलें नाहीं. तर तुरुंगांतल्याच मौजेच्या पण जिवाला चटका लावून सोडणाऱ्या गोष्टींविषयीं मी बोलतों आहें. हालअपेष्टा आणि अपमान यांनीं एके काळीं निखाऱ्याप्रमाणें भाजलें असलें किंवा सुयांप्रमाणें टोचलें असलें तरी ते चटके, ते फोड, ती सूज, त्या जखमा, सगळें कांहीं गेलें आहे. सिनेमांतल्या आगीच्या देखाव्याप्रमाणें किंवा कादंबऱ्यांतल्या नायिकेवरच्या कठीण प्रसंगांप्रमाणें पूर्वीचे ते अनुभवच स्मृतींत जागृत केले असतां दु:खगर्भ असें रमणीय सुख देतात. पण या आठवणी मी आतां जागृत करूं इच्छित नाहीं. तुरुंगांतल्या पण सात्त्विक हृदय-

स्पर्शी पण कोमल कडू पण गमतीच्या अशाच गोष्टी डोळ्यांपुढें आणा-ण्यात असें मी योजलें आहे.

हे खरोखर घडविलेले देखावे दाखवितांना वाईट एवढेंच झालें आहे कीं, हे देखावे पाहण्याकरितां वाचकांना माझ्याबरोबर सिंधहैद्राबाद येथील तुरुंगांत यावें लागणार. पण ही शिक्षा घटका दीड घटकाच टिकणारी आहे, ही त्यांतल्या त्यांत समाधानाची गोष्ट आहे.

\+ + +

" वामन, तुम हिंदु. तुम् नहि इधर...."

" मी, इथेंच अंघोळ करणार. "

" कैदी असून मग्रूरी ? "

" गोमल, मग्रूरी नाहीं. पण ही जागा त्यांतल्या त्यांत स्वच्छ आहे, म्हणून इथें मी अंघोळ करतों आहें. "

" पण मला मागाहून अंघोळ करावयाची आहे, मी कुठें करूं ?

" तूंही इथेंच कर. "

" पण तूं हिंदु आहेस; मी मुसलमान तिथें कसा अंघोळ करूं ? ती जागा विटाळते तूं अंघोळ केलीस म्हणजे. "

" अरे मी ब्राम्हण आहें. ........ "

" ब्राम्हण, ब्राम्हण क्या है ?........ "

" गोमल, मी अंघोळ केल्यावर तूं मग ती जागा धुवून शुद्ध करून घे म्हणजे झालें......."

" वामन, तुम् बडा खराब आदमी है. हम् पगडीवाला तुमारे उपर है. तुम् कैदी तुम उधर जाव....... "

" नहि-हम् नहि जाएंगे. "

वरील संवादांत 'गोमल' नांवाच्या Convict Overseer म्हणजे कैदी असून हलूहळू 'पगडीवाला' मुकादम झालेल्या पठाणाच्या व माझ्या तोंडीं जी भाषा आहे ती वस्तुस्थितीला धरून असल्यास केवळ भावार्थानेंच आहे. कारण गोमलला पंचवीस तीस शब्दांहून अधिक हिंदी शब्द येत नव्हते. माझीही बहुतेक तशीच गोष्ट. गोमल याला खुनाबद्दल शिक्षा मिळाली होती, पण हिंदी व्याकरणाचे खून त्यानें आणि मी जितके केले तेवढ्याबद्दल एखाद्या वैय्याकरणानें दोघांना जर फांशीची शिक्षा दिली असती तर ती रास्त झाली असती! अस्तु. त्याची भाषा (पुश्तु) मला समजावयाची नाहीं; दोघांनाही सिंधी येत नव्हतें; हिंदीची अवस्था तर आतांच सांगितली! अशा स्थितींत हातवारे, चेहऱ्यावरील आविर्भाव, कृति आणि उद्गारात्मक मोडकीतोडकी हिंदी यावर आमचा कारभार चाले. मनुष्याचें विचार किंवा विकार किंवा भावभावना कळण्याला जिव्हेच्या भाषेपेक्षां हृदयाची भाषा अधिक समर्थ हें गोमलशीं मला महिना दोन महिने एकांतांत रहावें लागलें, त्या वेळीं चांगलें समजलें त्याला माझ्या 'मस्करीचा राग यावयाचा, पण मनानें तो फार चांगला असल्यामुळें तो ती मस्करी चालूं द्यावयाचा. आणि मी तरी त्याचें हृदय ओळखून होतों म्हणूनच थोडीबहुत मस्करी करावयाचा! तो अडाणी, बावळट, भोळसट, धर्मवेडा असून देखील मला आदरणीय वाटत असे; कारण त्याचें धर्मवेड प्रामाणिकपणाचें होतें आणि त्याचें हृदय अतिशय कोमल होतें. हिंदु जेथें अंघोळ करीत तेथें वीस पंचवीस टमरेलें ओतून हातांनीं जी जागा स्वच्छ करून घेतल्याशिवाय तो अंघोळ करावयाचा नाहीं. पण मी कैदी व तो माझ्यावरचा मुकादम असून देखील तो ही तकलीफ सोशी, हा त्याचा केवढा थोरपणा! त्यांतून पुन: अंघोळ करण्याचा मला वास्तविक अधिकारच नव्हता. कारण सिंध-हैद्राबाद जेलमध्यें थंडीच्या दिवसांत आठ आठ दिवसांनीं

अंघोळ करावयाची ! मी अंघोळ करी ती चोरून करी, आणि त्यांत पुनः मुकादमाशीं 'मग्रूरी ' ! पण जो गोमल मला चक्की पिसतांना (दळण दळतांना) नियमांना झुगारून मदत करी, जो गोमल "कोणी कोणाला आपल्या भत्त्यापैकीं कांहीं देऊं नये " असा जेलखान्याचा नियम असतां मला आपल्या पोळींतली अर्धी पोळी 'पगडी' जाण्याची भीति असतां देखील देई तो गोमल मी नियम मोडून आंघोळ केली तर हा लाडिकपणा चालवील अशी माझी खात्री होती, आणि याच जोरावर त्याच्या आवडत्या स्वच्छ जागेवर आंघोळ करण्याची लाडिकपणाची मग्रूरी मी करीत असें. मी हिंदु होतों, पण ' चक्की पिसून' झाल्यावर "चक्की है, हिंदु मर गया, हिंदु मर गया " असें भत्तेवाल्यांना सांगून तो मला अधिक डाळ (मुगाची घट्ट आमटी) देववीत असे. मी साहेबाशीं इंग्रजी बोलत असें, म्हणून त्याला " हा बडा इलमवाला आहे " असें वाटावयाचें व कांहीं कां असेना, आमचें दोघांचें एकमेकांवर प्रेम होतें. त्याच्या धर्माबद्दल, त्याच्या नमाजाबद्दल त्याच्या ' अल्लाह इल् अल्लाह'बद्दल, त्याच्या तसबी(जपमाळ)बद्दल मला एका अर्थी अनादर होता; पण ह्याची ती खरी भक्ति पाहून मला एका अर्थी त्या मध्येंहि पुष्कळ अर्थ आहे असें वाटावयाचें. त्याला माझ्या धर्माबद्दल तिरस्कार वाटावयाचा. हिंदु धर्म म्हणजे खरोखरच घाणेरडा, असें त्याला वाटावयाचें. पण माझ्याबद्दल मात्र त्याला आदर आणि प्रेम असे.

हिंदी येत नव्हती कोणालाच, पण धर्माबद्दल आमचे हिंदींत वादविवाद व्हावयाचे, हें कोणाला खरें देखील वाटणार नाहीं. एक दिवस संध्याकाळीं भत्ता खाऊन आल्यावर गोमल तसबी ( जपमाळ ) घेऊन " ला अल्लाह इल् अल्लाह "चा जप करीत असतां मला म्हणाला, " बामन, तुमारा कलिमा क्या है ? " मी म्हटलें " कलिमा

का मायना क्या है ? " तो म्हणाला, " ला अल्लाह इल अल्लाह, ए कलिमा है. तुमारा ऐसा कलिमा नाहीं ? "

मी म्हटलें, " नाहीं, आमच्या हिंदु लोकांत एकच असा कलिमा नाहीं. त्याला तें खरें वाटेना. कलिमा नाहीं, असा धर्म कसा असेल ? अशी त्याची कल्पना ! तो मला ह्यापुढें वारंवार " तुमच्या हिंदूंचा कलिमा काय ? " असें विचारी व मी 'आमचा कलिमा नाहीं.' असें म्हटलें कीं, हिंदूंबद्दल त्याला अनादर उत्पन्न होई व थोडेसें असेंही वाटे कीं, 'हा हिंदु खोटें बोलतो आहे. तो कलिमा मुद्दाम सांगत नाहीं.' पुष्कळ दिवस आमची तींच तींच प्रश्नोत्तरें झालीं; पण शेवटीं एक दिवस माझ्या डोक्यांत कल्पना आली कीं, 'याची जरा गंमत करूं या. याला आपल्या धर्माबद्दल उगीचच्या उगीच अनादर वाटूं लागला आहे, तर तोही कमी करूं या.' कल्पना आल्यावर संधिही लवकरच मिळाली. त्यानें कलिमा काय म्हणून विचारलें, तेव्हां गायित्री मंत्र वगैरे या अडाण्याला कांहीं समजावयाचें नाहीं, रामाचा एकादा श्लोक म्हणावा म्हणजे त्याला कांहीं तरी समजेल, असा विचार करून,

'रामो राजमणिः सदा विजयते रामं रमेशं भजे ।'

हा श्लोक म्हणावयास मी आरंभ केला. दुसरा चरण म्हटला असेल नसेल तोंच तो उद्गारला, " ऐसा कैसा कलिमा ? 'राम' 'राम' क्यों है ? "

मी दुष्ट विनोदबुद्धीनें म्हटलें, " तुमारा अल्ला क्या है?" तो म्हणाला " अल्ला क्या है ? अल्ला जानता नहि तुम् ? " मी म्हटलें, " राम हमारा अल्ला है. "

त्याला हें न खपून त्यानें रामाला भलतीच शिवी दिली. माझ्या तोंडांतूनही तिचाच बहुतेक प्रतिध्वनी उमटला ! पण त्याच्या अल्लाबद्दल

मी अनादरपूर्वक उल्लेख केला, याबद्दल त्याला इतकें वाईट वाटलें आणि माझा इतका राग आला कीं, त्यानें एक दोन दिवस माझ्याशीं अबोला धरल्यासारखें केलें, पण जीभ बोलली नाहीं म्हणून हृदयाची भाषा थोडीच थांबते आहे ? आमचीं हृदयें वाचेच्या पलीकडील व वाचेला अगम्य अशी कोमल व रसप्रचुर भाषा बोलत होतींच आणि त्या हृदयांना जिव्हेच्या द्वारेंही लवकरच वाचा फुटून 'कैसा हिंदु मग्रूरी' 'दास्त हिंदवान' ( असे हे हिंदु लोक ? ) इत्यादि प्रकारचे राग व प्रेम यांनीं युक्त असलेले उद्गार बाहेर पडूं लागले.

हैद्राबादेस माझ्याकडे पहिल्या प्रथम चरक्यावर लोंकर काढणें हें काम होतें. नंतर दोन तिनदां चक्की येऊन अखेर सुतळीचे, बुटाचे तळ करणें हें काम माझ्याकडे आलें व शेवटपर्यंत तेंच राहिलें. दोन दिवसांत एक जोडी इतरांना करावी लागते, पण माझे तळ उत्तम होत, निदान असें अधिकारी म्हणत, म्हणून चार दिवसांत एक जोड मी केला तरी चालत असे. सुई, सुतळी, रवी, आर वगैरे सामान मिळण्यास उशीर झाल्यास मी एकादे वेळेस पांचवा दिवस लावीत असे. पण तेही पचत असे. एक दिवस तर एका जोडीला मी सहा दिवस लावले ती हकीगत मौजेची आहे. माझें काम चौथ्या दिवशींच बरेंचसें संपलें होतें. अर्थात् पांचव्या दिवशीं दुपारच्या भत्त्याच्या आधींच तें संपून गेलें. पण रिकामा बसलेला मला कोणी पाहिलें असतें तर अधिक काम मिळालें असतें आणि बायबल किंवा शेक्सपिअर वाच्या-वयास सांपडला नसता ( शेक्सपिअर हक्कानें व बायबल मेहेरबानी म्हणून देण्यांत आलें होतें ) म्हणून मी तळाचे शेवटले एक दोन टाके ठेवून दिले होते व सर्व साहित्यासह तो तळ समोर ठेवून पुस्तक वाचीत बसलों होतों. कोणी अधिकारी येतो आहेसें दिसलें कीं, पुस्तक बाजूला ठेवून उगाच कांहींतरी सुई ओंवण्याचें वगैरे

काम काढून कामामध्यें मी चूर आहें असें दाखवीत असें. संध्याकाळीं चार वाजतां जेलमधलीं कामें बंद व्हावयाचीं. पण ३॥ वाजले तरी माझ्या तळाचे शेवटले दोन टाके राहिलेच होते. अगदीं शेवटच्या पांच मिनिटांत ते टाके मारून मी काम संपविणार होतों इतक्यांत एक कैदी मुकादम ( Convict Overseer ) आला व आनंदानें "बादशहा मर गया, अबी बडी माफी आजायेंगी, अज ठेका बंद." असें म्हणून माझें काम ओढून घेऊं लागला. एक दोन टाके राहिले आहेत, ते मारून देतों असें मी म्हणूं लागलों; पण बादशहा मेल्याच्या आनंदानें ( ! ) म्हणजे अर्थात् माफी मिळेल या आशेच्या आनंदानें— तो इतका बेहोष झाला होता कीं, "अरे कुच परवा नहीं ! अबी ठेका बंद. पुरा कल करो." असें म्हणून त्यानें माझें सर्व साहित्य अर्धवट गुंडाळलेंच. ( होय, आतां आठवण झाली, कीं हा मुकादम बुटाचे तळ करण्याच्या कामांतला माझा आद्य गुरु होता. त्याचें नांव मात्र आतां आठवत नाहीं. ) "तुला काय करावयाचें आहे ? उद्यां वाटलं तर हे दोन टाकेच मारण्याकरितां संबंध दिवस घे." अशा प्रकारचा उपदेश करून स्वारी निघून गेल्यावर बादशहाच्या मरणामुळें शोक व्हावयाच्या ऐवजीं जेलखान्यांत आनंदोत्सव झालेला पाहून माझ्या मनांत जी विचारपरंपरा सुरू झाली ती देण्यासारखी आहे. पण ती देऊं लागल्यास गमतीच्या गोष्टी सांगण्याचें जें मी वचन दिलें आहे तें मोडल्यासारखें होईल. म्हणून त्या भानगडींत मी पडत नाहीं. सांगावयास नकोच कीं, माझ्या कामाचें सामान दुसऱ्या दिवशीं सकाळीं आठ वाजतां जरी मिळालें तरी शेवटले दोन टाके दुपारीं पावणेचारानंतरच लागले !

असले कांहीं प्रकार सोडले तरी एकंदरींत जेलमध्यें माझें वर्तन Exemplary ( आदर्शभूत ) होतें. असें अधिकाऱ्यांचे शेरे पाहिले

असतां दिसून येईल. जेलमध्यें आंघोळ चोरून करणें, लघवीला ठराविक वेळां सोडून जाणें, भाजी घाणेरडी असली तरी टाकण्याची परवानगी नाहीं म्हणून ती पुरणें, टाला (कुलपें) पाहण्याकरितां आलेल्या मुकादमाशीं किंवा शिपायाशीं एक दोन शब्द बोलणें किंवा वर सांगितल्याप्रमाणें कामचुकारपणा करणें असल्या प्रकारच्या बदमाषीशिवाय दुसरी बदमाषी माझ्या हातून घडली नाहीं. माझें काम चोख असें. माझ्याविरुद्ध कोणाची तक्रार नसे, मलाही कोणाविरुद्ध तक्रार करण्याचा प्रसंग आला नाहीं. अशा रीतीनें सुपरिंटेंडंट व जेलर यांचें माझ्याविषयीं मत फार चांगलें होतें. याला प्रत्यन्तर पुरावा म्हणजे असा कीं, जेलर व सुपरिंटेंडंट हे मला आपल्या जवाबदारीवर स्वत:ची खाजगी पुस्तकें एखाद्या वेळेस वाचावयास देत. वास्तविक कैद्याला जेलमधील गैरवर्तनाबद्दल शिक्षा न होतां तीन महिने जातील तेव्हां तेथील लायब्ररींतील एकादें पुस्तक वाचावयास मिळावयाचें. पण मला मोठ्या टाइपाचें बायबल हें एक धार्मिक पुस्तक म्हणून मेहेरबानीखातर देण्यांत आलें होतें. व दुसरें जें पुस्तक असें तें वाचून झाल्यावर सुपरिंटेंडेंट आपल्या घरचें पुस्तक एखाद्या वेळेस देत असे. तेथल्या लायब्ररींत Grim's Fairy Tales सारखीं चार पांच पुस्तकें व शेक्सपिअर एवढींच इंग्रजी पुस्तकें होतीं. शेक्सपियर बरेच दिवस पुरण्यासारखा होता. पण बाकीचीं पुस्तकें दोन तीन दिवसांत वाचून व्हावयाचीं. पण हें सांगण्याची चोरी. कारण तसें सांगितलें तर या कैद्याला काम पुरेसें मिळत नाहीं, याला वाचायला एवढी फुरसत सांपडते कशी? अशा प्रकारचें प्रश्न उपस्थित होऊन भलतेंसलतेंच कांहीं तरी व्हावयाचें! जेलमधील पुस्तक वाचून झालें, तरी बरेच दिवस स्वस्थ बसून सुपरिंटेंडेंट किंवा जेलरजवळ गोष्ट काढली तर ते मला एखादें पुस्तक देत. हे दोघेही यूरोपियन फार सज्जच होते, व त्यांच्या

सौजन्यामुळेंच माझा जेलमध्यें निभाव लागला. हें येथें कृतज्ञतेनें सांगितलें पाहिजे. या दोघांनीं राज्यारोहणासंबंधीं जी कैद्यांना कांहीं महिन्यांची माफी देण्यांत येते ती मला देण्यासंबंधीं चांगली शिफारस कोल्हापूरदरबाराकडे केली होती. पण त्या दरबारनें या शिफारशीला कांहींच महत्त्व दिलें नाहीं. सुपरिंटेंडंटला हा अन्याय झाला असें वाटलें आणि त्याला विशेष वाईट वाटण्याचें कारण असें झालें, कीं त्याच जेलमध्यें एक गुजराथी राजकीय कैदी होते, त्यांचें वर्तन (जेलच्या अधिकाऱ्यांच्या दृष्टीनें) गैर होतें. त्यांच्या कामाबद्दल वगैरे तक्रारी असत. त्यांना जेलमधल्या अनेक शिक्षाही झाल्या होत्या. तथापि त्यांना राज्यारोहणाची तीन महिन्यांची माफी मिळाली, आणि माझें वर्तन जेलच्या अधिकाऱ्यांच्या दृष्टीनें जरी फार चांगलें होतें तरी मला एक दिवसाची देखील माफी नाहीं! सुपरिंटेंडंटला हा अन्याय खपला नाहीं. त्यानें लगेच वरिष्ठ अधिकाऱ्यापुढें अन्याय कसा होतो आहे हें लिहिलें. वरिष्ठ अधिकाऱ्यांनीं न्याय दिला तो असा कीं, गुजराथी राजकीय कैद्याला जी तीन महिन्यांची सूट मंजूर झाली आहे, ती रद्द करून दोघां कैद्यांना एकच माप देण्याचें समाधान मानावें. सुपरिंटेंडंट करावयाला गेला माझी तरफदारी पण ती भोंवली बिचाऱ्या त्या गुजराथ्याला। जगांतलीं चक्रें हीं अशीं फिरताहेत!

जेलमधून सुटण्याच्या वेळची आतां एक आठवण द्यावयाची. ती झाली कीं, मग जेलमधून बाहेर पडूं. पण बाहेर पडण्याचें काम सोपें नाहीं. सुटण्याची वेळ झाली तरी अनेक अकल्पित विघ्नें येतात. मला ज्या दिवशीं सोडावयाचें त्याच्या आधीं कांहीं दिवस विष्णुशास्त्री बापट यांच्याकडून (हे त्या वेळेस पुण्यास आलेले नव्हते, हैदराबादेच्या एका पाठशाळेवर होते) कपडे आलेले होते. ज्या दिवशीं मला सोडावयाचे त्या दिवशीं सकाळीं मला ऑफिसांत नेण्यांत आलें. तेथें जेलचे कपडे

उतरून बापटशास्त्री यांच्याकडून आलेले कपडे मी घातले व मला भेटण्याकरितां हैद्राबाद येथें कांहीं दाक्षिणी लोक होते त्यांपैकीं कांहीं आले होते, त्यांना पहाण्याकरितां व बाहेरच्या स्वतंत्र वातावरणांत जाण्याकरितां मी उत्सुक झालों होतों. आठ वाजले. सुपरिंटेंडंट-साहेब आले. ( हे पूर्वीचे सुपरिंटेंडंट नव्हेत, एक आय्. एम्. एस्. मधील पारशी सद्गृहस्थ होते. ) त्यांच्यापुढें मला नेण्यांत आलें. माझे कपडे काढावयास लावून ऑफिसच्या दप्तरांतील कागदांत लिहिलेल्या शरीरावरच्या खाणाखुणा माझ्या आंगावर लिहिलेल्याप्रमाणें आहेत किंवा नाहींत. हें ते तपासूं लागले. भलताच कैदी भलत्याच्या नांवानें सुटून जाऊं नये म्हणून ही सावधगिरी ठेविलेली असते. पण हा विधि बहुधा औपचारिकच असतो आणि दोन तीन मिनिटांतच आटपतो. पण दैव असें चमत्कारिक कीं, त्या पारशी सुपरिंटेंडंटला एक दोन खाणाखुणा जमत नाहींत असें दिसून आलें! "अमक्या ठिकाणीं तीळ आहे म्हणून लिहिलेलें आहे तो तीळ तेथें नाहीं, तसेंच अमक्या ठिकाणीं वण आहे म्हणून लिहिलें आहे तो दुसरीकडेच आहे; अर्थात् हा वामन मल्हार जोशीच नाहीं, मी याला सोडणार नाहीं" असें तो म्हणाला! आतां काय करतां? मीच वामन मल्हार जोशी हें मी सिद्ध कसें करावयाचें? आणि जेलरनें शिपायांनीं, वगैरे सगळ्यांनीं सांगितलें तरी कागद बोलतात तें खोटें कसें मानावयाचें! सारें जग जरी माझ्या बाजूला आलें असतें, तरी कागद जोंपर्यंत विरुद्ध आहेत तोंपर्यंत सुपरिंटेंडंट मला सोडावयास तयार नव्हता. मला वाटतें तो अशा अर्थाचें कांहींतरी बोलला सुद्धां! मीच काय, जेलर शिपाई, वगैरेसुद्धां फिकिरींत पडले. आतां या कैद्याचें करावयाचें काय? सोडण्याचा तर अधिकार नाहीं. बरें न सोडावें, तर केवढा बरें बिचाऱ्यावर अन्याय होतो आहे, असें त्यांना वाटूं लागलें. मला तर कसें-

सेंच होऊं लागलें. पण त्या वेळीं देखील एखाद्या गोष्टीची विनोदात्मक बाजू पाहण्याची माझी प्रवृत्ति मला सोडून गेली नाहीं. मला काळजी वाटली, दुःख झालें, पण मनांत थोडेसें हंसूंही आलें !

हंसू येण्याचें कारण असें कीं, दप्तरांतल्या कागदानें कांहीं म्हटलें तरी हाच वामन मल्हार जोशी हे आतां नाहीं, दोन चार घटकांनीं सुपरिटेंडंटला कबूल करावें लागेलच. त्यानें किती जरी आव आणला तरी त्याचें महत्त्व पण तेवढेंच, असें मी समजत होतों. पण दोन तास झाले तरी तो जेव्हां सोडीना तेव्हां मात्र मी मनांत थोडासा चरकलों. पुनः जेलचे कपडे घालण्याचें नशिबांत आलें म्हणावयाचें ! बरें, जेलचे कपडे तरी मला मिळणार आहेत का? नाहीं. कारण मी सुटणार म्हणून ते दुसऱ्या कैद्यांना देऊन त्यांचे घाणेरडे कपडे ऑफिसांत देण्यापुरते मी घालून आलों होतों. टिनपॉट, थाळी (वाडगा) हीं माझीं भांडीं देखील मी लोकांना देऊन टाकलीं होतीं. कारण तीं चांगलीं होतीं. आणि एकानें सुटावयाच्या आधींच दोन तीन महिने त्यांची मागणी करून ठेविली होती. त्याला मी तीं सुटण्याच्या आदल्या दिवशीं देऊन टाकलीं होतीं. आणि त्याचीं घाणेरडीं भांडीं ऑफिसांत देण्याकरितां घेतलीं होतीं. "मग काय? वामना, तुझ्या नशिबीं पुनः जेलचे कपडे आणि ते पुनः घाणेरडे घालण्याचें येणार, आणि पुनः टिनपॉट आणि थाळी घासून त्यांतून पाणी पिण्याचें आणि भत्ता खाण्याचें काम करावें लागणार ! दैवच फिरलेलें दिसताहे, तेव्हां तुझ्या नशिबीं काय काय आहे कोणास ठाऊक? आई वारल्याचें दोन महिन्यापूर्वीं ऐकलेंस, सुटण्याच्या दिवशीं हा असा प्रकार. तेव्हां तुझ्या नशिबीं काय आहे तें दिसतच आहे!"

अशा प्रकारचे विविध विचार मनांत येऊन मन उद्विग्न झालें. काय

करावें, काय बोलावें हें सुचेना. इतक्यांत एक कारकून कोल्हापूर जेलकडून आलेले मूळचे कागद घेऊन आला. या कागदांची नक्कल करतांना कोणा तरी कारकूनानें चूक केली होती. आणि म्हणून कागदांत लिहिलेल्या व माझ्या आंगावरच्या खाणाखुणा जमत नव्हत्या. कोल्हापुराहून आलेले अस्सल कागद सांपडल्यावर सगळा उलगडा झाला. आणि दहापांच मिनिटांच्या आंतच जेलच्या मोठया दरवाजांतून मी बाहेर पडलों. बाहेर पडल्यावर हैद्राबादेहून निघतांना पुनः चार घटका जी ट्रॅजेडी झाली व नंतर लगेच पुनः जी कॉमेडी झाली तिची हकीकत सांगण्यासारखी आहे. पण ती आतां नको. तसेंच पाहूं गेलों तर माझें काय किंवा दुसऱ्या कोणाचें काय, सर्वत्र आयुष्य मुळीं शोक, हास्य, शृंगार, वीर, करुण इत्यादि रसांनीं भरलेलें आहे, तेव्हां वर्णन करण्यासारखे प्रसंग प्रत्येकाच्या आयुष्यांत पुष्कळच असतात त्या सर्वांचें वर्णन आलेंच पाहिजे असें कोठें आहे ? ”

## सुटकेनंतरचा एक प्रसंग

वामनरावांच्या सुटकेच्या वेळीं हैद्राबादची बापटशास्त्री वगैरे मंडळी आली होती. आणि त्यांनीं त्यांचा हारतुरे व फोटो इत्यादि गोष्टींनीं यथोचित सन्मान केला. ह्या परस्थ मंडळींच्या सन्मानानें वामनरावांचें हृदय भरून आलें आणि त्यांचे कसे आभार मानावेत ह्याबद्दल ( कृतज्ञतेच्या भरांत) ते गोंधळून गेले. एक दिवस बापटशास्त्री यांचेकडे राहिल्यावर ते दुसरे दिवशीं निघाले. यांना नियमाप्रमाणें तुरुंगावरील अधिकाऱ्यातर्फे कोल्हापूरचें तिकीट काढून देण्यांत आलें होतें. तिकिटाबरोबर एक पोलीसही देण्यांत आला. पण तो पोलीस त्यांना पुढें जाऊं देईना. तो म्हणे कीं, मला तुमच्यावर नेमलें आहे. तुम्हांला कोठें जायची परवानगी नाहीं. त्यावर वामनराव म्हणत कीं, मी आतां तुझें काय लागतो ? अखेर बरीच हमरीतुमरी झाल्यावर त्यानें आपल्या साथी-

दारांस बोलाविलें आणि वामनरावांना एका खोलींत कोंडून यथेच्छ मार दिला. तो मार देत असतां वामनराव त्याला म्हणत 'थांबलास कां? चालूं दे.' आपण इतके प्रहार केले तरी हा राजबंदी आपल्याला अधिकाधिक उत्तेजनच देत आहे असें पाहून हा निराळ्या प्रकारचा विलक्षण माणूस असावा असें त्याच्या मनानें घेतलें, आणि वामन-रावांच्या मनोधैर्याबद्दल आणि आत्मशक्तीबद्दल त्याला आदर वाटून त्यानें मारण्याचें अमानुष काम बंद केलें. अखेर एका पोलिस अधिकाऱ्याच्या मध्यस्तीमुळें त्यांची मुक्तता झाली. हैद्राबादच्या लोकांनीं त्यांना त्या वेळीं फिर्याद करावयास उत्तेजन दिलें. परंतु ह्या भानगडींत व याता-यातींत कशाला निष्कारण पडा असा पोक्त आणि समंजसपणाचा विचार करून वामनरावांनीं तेथून प्रयाण केलें. आणि कोल्हापुरास जाण्याचें कांहींच प्रयोजन नसल्यामुळें ते पुण्यास येऊन दाखल झाले.

ह्याप्रमाणें वामनरावांच्या कारागृहवासाचा वृत्तांत आहे. वास्तविक स्वत:वर कोणत्याही प्रकारचा राजद्रोहाचा आरोप नसतांना केवळ प्रो. विजापूरकरांना वांचविण्यासाठीं ते कोल्हापूरला गेले, परंतु विजापूरकर तर सुटले नाहींतच उलट त्यांनाच कारागृहाचा अनुभव घेण्याचा प्रसंग आला. ह्या स्वयंसंपादित आपत्तीमुळें वामरावांना ऐहिक जीवनांतील खडतर प्रसंग कसे असूं शकतात हे प्रत्यक्ष अनुभवण्यास सांपडलें, आणि ह्या एकंदर परिस्थितीमुळें आणि चमत्कृतिपूर्ण प्रसंगांमुळें त्यांच्या कल्पक बुद्धीला एक प्रकारें नवीन प्रांतांत आक्रमण करण्यास चालना मिळाली. मात्र त्यांच्या जीवनप्रवाहाला ह्या कारागृहवासामुळें निराळें वळण लागलें आणि संकल्पित गोष्टींची अंशत: परिपूर्ती करण्याची एक प्रकारें संधिही मिळाली, असें म्हणण्यास हरकत नाहीं.

---

# प्रकरण तिसरें

## पुन्हां ' पुढें काय ? '

ह्याप्रमाणें समर्थविद्यालयांतील कार्य आणि तन्निमित्तक कारागृहवास यांची परिसमाप्ति झाली. समर्थविद्यालय ही संस्था सरकारनें 'बेकायदेशीर मंडळी' ( Unlawful Assembly ) ठरविल्यामुळें तिचें अस्तित्वच संपुष्टांत आलें. आणि वामनराव जोशी, ज. स. करंदीकर वगैरे मंडळींनीं समर्थविद्यालयाला जो रामराम ठोकला तो कायमचाच. पुनरुज्जीवित समर्थविद्यालयाला ते पुन्हा येऊन मिळाले नाहींत. प्रो. विजापूरकर त्यांच्या राष्ट्रीय शिक्षणाच्या अविश्रांत खटपटीनें आणि अत्युत्कट तळमळीनें समर्थविद्यालयाचा पुनर्जन्म झाला आणि त्याला ' नवीन समर्थविद्यालय ' हें नामाभिधान देण्यांत आलें. परंतु एकंदरींत त्या विद्यालयाचें पूर्वीचें उज्ज्वल स्वरूप लोपलें असें एकपरी वाटतें. नवीन विद्यालयाला पूर्वीची शिक्षक मंडळी आणि पूर्वीचें तेजोवैभव लाभलें नाहीं, हें खरें. राष्ट्रीय शिक्षणासाठीं तनमनधन सर्वस्वानें अर्पण करणाऱ्या आणि राष्ट्रीय शिक्षणासाठीं आपलें सर्व आयुष्य वेंचणाऱ्या प्रो. विजापूरकरांसारखे प्रो. वामनराव कट्टर राष्ट्रीय-शिक्षण-प्रेमी नव्हते. कांहींतरी राष्ट्रकार्य करण्याची त्यांची प्रबळ इच्छा असल्यामुळें ते विजापूरकरांना जाऊन मिळाले होते. ह्या विद्यालयांत असतांना त्यांना निष्कारण झळ लागली—झळ लागली असें म्हणण्यापेक्षां त्यांनीं स्वेच्छापूर्वक स्वतःवर काराग्रहापत्ति ओढवून घेतली असेंच म्हणणें अधिक इष्ट होईल—आणि त्यामुळें जुनें समर्थविद्यालय बुडाल्यावर साहाजिकच त्यांना आपला विद्यालयाशीं असलेला पूर्वापार संबंध सोडावा लागला आणि कारागृहांतून मुक्तता झाल्यावर पुण्यास प्रयाण करणें भाग पडलें. असो.

## संपादक मंडळांत

पुण्यास आल्यावर पुन्हां 'पुढें काय' हा प्रश्न दत्त म्हणून त्यांच्या पुढें उभा राहिला. आर्यभूषण छापखान्यांत त्या वेळीं एक इंग्रजी शब्दांचा मराठींत व इंग्रजींत अर्थ देणारा असा कोश सर्व्हंटस् ऑफ इंडिया सोसायटीचे वझे त्यांच्या नेतृत्वाखालीं चालू होता. त्या कार्याला वामनराव जाऊन मिळाले. त्या कोशाचीं ३१४ अक्षरें छापून झालीं; परंतु पुढील भाग तसाच राहिला. हें काम पुढें तसेंच अपूर्ण राहिल्यामुळें वामनरावांनीं स्वत:साठीं नवीन उद्योग निश्चित केला. तो म्हणजे वर्तमानपत्राचा धंदा ( Journalism ) हा होय.

## 'मराठा' कचेरींत

समर्थविद्यालयांत असल्यामुळें आणि तदनंतर राजद्रोहाच्या खटल्यामुळें वामनराव राष्ट्रीय पक्षाच्या लोकांना विशेष परिचित झाले होते. आणि पहिल्यापासून राष्ट्रीय पक्षाकडे ओढा असल्यामुळें ते 'मराठा' ह्या इंग्रजी वृत्तपत्रास जाऊन मिळाले आणि वृत्तपत्र हेंच आपलें कार्यक्षेत्र असें त्यांनीं ठरविलें. मराठापत्रांत त्यांनीं दोन वर्षें सहसंपादकाचें काम केलें. त्या अवधींत १९१५ सालीं त्यांनीं केसरींत 'पक्षभेद आणि पक्षद्वेष' ही विचारप्रवर्तक लेखमाला लिहिली. प्रचलित राजकारणांत प्रत्यक्ष पडण्यापेक्षां प्रचलित राजकारणाची तटस्थ वृत्तीनें तात्त्विक व नि:पक्षपाती चर्चा करणें अधिक श्रेयस्कर अशी त्यांची मनोवृत्ति त्या लेखांत दिसून येते. वामनरावांनीं तत्कालीन वर्तमानपत्रांतून विशेष ज्वलज्जहाल लेख लिहिले नाहींत, यांचें कारण त्यांची स्वभाविक तत्त्वप्रवण आणि चिकित्सक वृति, हें होय. केसरी-मराठा संस्थेचा त्यांना पुढें लवकरच जो संबंध सोडावा लागला, त्याचें खाजगी कारण काय झालें आहे हें आम्हांस ठाऊक आहे. त्याचें सार्वजनिक कारण त्या वर्तमानपत्रांच्या धोरणाशीं वामनरावांच्या स्वाभाविक मनोवृत्तींचा

विरोध हें असावें असा प्रस्तुत लेखकाला संशय येतो. कारण केसरी-मराठा पत्रें जरी पुढारलेल्या जहाल राजकारणाचा पुरस्कार करीत होतीं, तरी समाजिक बाबतींतलीं त्या पत्रांचीं मतें अगदींच स्थितिप्रिय व पुराणाभिमानी होतीं. एका बाजूनें प्रगति तर दुसऱ्या बाजूनें पिछेहाट असें त्या पत्रांचें त्या वेळीं जें स्वरूप होतें तें आजही थोडेंबहुत कायम आहे असें म्हटल्यास हरकत नाहीं. समाजिक बाबतींतला मतभेद वामनरावांचा मराठ्यांशीं संबंध सुटण्याला कारणीभूत झाला असला पाहिजे, असा तर्क करण्यास पुष्कळ जागा आहे. कारण वामनरावांचीं मतें राजकीय आणि सामाजिक अशा दोन्ही बाबतींत अत्यंत प्रगतिपर आणि जहाल आहेत. केसरी-मराठा संस्थेशीं त्यांचा संबंध जडल्यामुळें त्यांच्या तत्कालीन राजकीय मतांची सहजच ओळख होते. सामाजिक बाबतींत ते प्रागतिकांइतके सुधारणावादी आहेत. मिश्रविवाह, सहभोजन, अस्पृश्योद्धार, अस्पश्यांचा मंदीरप्रवेश, विधवा-विवाह वगैरे बाबतींत त्यांचीं मतें पूर्ण अनुकूल आहेत. राजकीय बाबतींत प्रागतिकांशीं मतभेद, आणि सामाजिक बाबतींत जहालांशीं मतभेद यामुळें वर्तमानपत्राच्या धंद्यांत वामनरावांचें त्या वेळीं बस्तान बसणें जरा कठीणच होतें. वामनरावांची अशी सर्वांगीण प्रगतिपर मनोवृत्ति असल्यामुळें त्यांना कोणत्याही पक्षाशीं पूर्ण समरस होता आलें नाहीं हें स्वाभाविकच दिसतें.

‘मराठा’ वर्तमानपत्राचा संबंध संपल्यावर वामनराव मुंबईस आले आणि त्यांनीं अच्युत बळवंत कोल्हटकर यांच्या “Message” ह्या इंग्रजी दैनिकांत सहसंपादक म्हणून काम करण्यास सुरवात केली. ते एक दीड वर्ष ह्या वर्तमानपत्रांत लिहीत होते. पुढें त्यांच्या पगारासंबंधीं कांहीं भानगड उपस्थित झाली, आणि त्यांचा राहिलेला पगार त्यांना कोर्टमार्फत मिळाला. हा उद्वेगजनक प्रकार वास्तविक व्हावयास नको होता. परंतु वामनरावांना न्यायालयाचा निरुपायानें अवलंब करावा लागला. असो.

ह्याप्रमाणें वामनरावांच्या वर्तमानपत्राच्या धंद्याची इतिश्री झाली. आणि पुन्हां नवीन व्यवसायाचें संशोधन करण्याचा त्यांच्यावर प्रसंग ओढवला. Journalism हा त्यांचा अत्यंत आवडीचा असा व्यासंग नसावा. पण केवळ'परिस्थितीमुळें त्यांना त्या प्रवाहांत पडावें लागलें. तथापि त्यांना त्या व्यवसायाचा त्यांच्या भावी आयुष्यांत पुष्कळ उपयोग झाला, हें सांगणें आवश्यक आहे.

---

# प्रकरण चवथें

## अध्यापनाचें ध्येय

वर्तमानपत्राचा व्यवसाय सुटल्यावर वामनरावांच्या आयुष्याचें सुकाणूं आतां कायमचेंच बदललें, आणि आतांपर्यंत परिस्थितीमुळें जीवनाच्या प्रवाहांत कुठें तरी इकडून तिकडे वहात जाण्याचा त्यांच्यावर जो प्रसंग आला होता तो थांबून त्याला एक स्थिर व अचल अशी दिशा लागली. त्यांनीं महिलाविद्यापीठासारख्या स्त्रीशिक्षणसंस्थेंत आजन्म अध्यापनव्रत अंगिकारलें, हें त्यांच्या स्वभावाच्या दृष्टीनें समुचित आणि स्पृहणीय झालें. अध्यापन हें त्यांचें पहिल्यापासूनच ध्येय होतें, परंतु या ध्येयाला स्त्रीशिक्षणाचा जो मार्ग मिळाला तो थोडासा आकस्मिक रीतीनें मिळाला. श्री. श्री. कृ. कोल्हटकर यांनीं त्यांच्या व्यवसायासंबंधीं जे उद्गार काढले आहेत ते येथें उद्धृत करण्यासारखे आहेत. ते म्हणतात:—

" रा. वामनराव जोशी तत्त्वज्ञानाचे अध्यापक होण्यास पूर्णपणें योग्य आहेत यांत संशय नाहीं. परंतु त्यांचीं राजकीय मतें अध्यापकाच्या जागेस पाहिजेत तितकीं नेमस्तपणाचीं नसल्यामुळें त्यांस त्या जागेचा मान आजपर्यंत मिळाला नाहीं. अध्यापकाच्या खालोखाल अशी त्यांस योग्य जागा म्हटली म्हणजे संपादकाची. पण वामनरावजींचीं मतें राजकीय व सामाजिक बाबतींत सारखींच जहाल असल्यामुळें व नियतकालिकांच्या चालकांमध्यें त्यांच्या मताचे पुरुष विरळा असल्यामुळें संपादकीय खुर्चीवरही त्यांचें आसन स्थिर होण्याचा रंग दिसेना. अशा स्थितींत त्यांचें लक्ष कादंबरीलेखनाकडे वळावें यांत नवल नाहीं. त्यांची बुद्धी सृष्टींतील गूढतत्त्वशोधनाच्या कामीं जितकी

तीव्र आहे तितकीच त्यांची कल्पनाशक्तीही, नूतन सृष्टी निर्माण करण्याच्या कामीं कुशल असल्यामुळें त्यांस या नवीन व्यवसायांतही चांगलें यश मिळालें आहे. ''

परंतु वामनरावांनीं ग्रंथलेखन हा एकच एक व्यवसाय पत्करला नाहीं. कारण व्यवहारत: उपजीविकेच्या दृष्टीनें तो फलप्रद नाहीं. " सामान्य माणसांसंबंधीं बोलावयाचें म्हणजे ग्रंथकर्त्यानें आधीं उपजीविकेचें दुसरें एकादें साधन हातीं ठेवून मग वाङ्मयाच्या नादीं लागावें." असें त्याचें मत असल्यामुळें त्यांनीं वाङ्मयव्यवसायावरच भिस्त न ठेवतां दुसऱ्या व्यवसायांत पडण्याचें ठरविलें हें व्यवहाराच्या दृष्टीनें ठीकच झालें.

## अनाथबालिकाश्रम

वामनराव स. १९१८ जूनमध्यें प्रो. धोंडो केशव कर्वे यांच्या अनाथबालिकाश्रमास येऊन मिळाले. कर्वे यांचें महिलाविद्यापीठ (Women's University) त्या वेळीं नुकतेंच निघालेलें असल्यामुळें त्या विद्यापीठासाठीं स्वार्थत्यागी आणि विद्वान् अध्यापकाची आवश्यकता होती. वामनरावांनाही त्या वेळीं कांहींतरी उद्योगाची जरुरी असल्यामुळें हा योग जमून आला. प्रो. कर्वे यांनीं आपल्या आत्मचरित्रांत प्रो. वामनराव यांच्याबद्दल खालील उल्लेख केला आहे :—

"१९१८ सालीं श्री. वामन मल्हार जोशी यांचें सहाय्य आम्हांस मिळालें. त्यांच्याबद्दल आश्रमाच्या रिपोर्टांत पुढील उल्लेख आहे.

' महाराष्ट्र गद्यलेखकांत रा. वामनराव जोशी आज बरेच वर्षांपासून प्रसिद्ध आहेत. त्यांच्या काव्यशास्त्रविनोदात्मक 'रागिणी'नें मराठी कादंबऱ्यांत उच्च स्थान पटकाविलें आहे व त्यांच्या ' नीतिशास्त्रप्रवेशा'च्या द्वारें अनेक विद्यार्थ्यांनीं नीतिशास्त्रासारख्या अगम्य विषयांत सहज प्रवेश केला आहे. मराठी भाषेचे असले मार्मिक लेखक रा.

१२

जोशी प्रथम येथील कॉलेजांत प्रोफेसर म्हणून आले व दोन वर्षे येथील अनुभव घेतल्यावर आपलें पुढील आयुष्य याच कार्यांत घालविण्याचा निश्चय करून हे आश्रमाचे आजन्मसेवक झाले. त्यांच्या योगानें आजन्मसेवक मंडळींच्या कार्यक्षमतेंत केवढी भर पडली आहे, हें सांगत बसण्याचें कारणच नाहीं. '

त्यांनीं मराठी विषय आपल्या ताब्यांत घेतला व आरंभीं इंग्रजीच्या कामींही त्यांची मदत झाली. "

## अध्यापन

१९१८ जूनमध्यें वामनराव महिलाविद्यापीठांत दाखल झाले आणि दोन वर्षांनीं १९२० सालीं ते संस्थेचे आजन्म सभासद ( Life-member ) झाले. प्रथम ते तत्त्वज्ञान व मराठीचे अध्यापक होते. तदनंतर मानसशास्त्र, इंग्रजी व मराठी हे विषय घेऊं लागले. विद्यार्थिनींच्या हायस्कूलमध्येंही अलीकडे इंग्रजी विषयाचे ते तास घेतात. सध्यां ते अनाथबालिकाश्रमाचे सुपरिंटेंडेंट आहेत. प्रश्नोत्तररूपानें शिक्षण देण्याची त्यांची विशेष पद्धत आहे. मुलींना विचारलेल्या प्रश्नांचीं उत्तरें अध्यापकानें स्वत: न सांगतां प्रश्न विचारून त्यांच्याकडूनच काढून घेणें ही त्यांची शिक्षणपद्धति आहे. या योगानें विद्यार्थिनींचा खरा अभ्यास होतो. वामनरावांचें विशेष लक्ष शिस्त, टापटीप व नीटनेटकेपणा यांवर आहे. ते मुलींच्याकडून पुष्कळशीं सुभाषितें पाठ करून घेतात. आणि प्रत्येक मुलीजवळ सुभाषितांची वही असलीच पाहिजे अशी त्यांची सक्ती आहे. त्यांचें अध्यापन मुलींना मुळींच कंटाळवाणें होत नाहीं. उलट मधून मधून विनोदाचे हास्यतरंग उडत असल्यामुळें तें सुखकर व आल्हाददायक होतें. ते एखाद्या वेळीं एखाद्या मुलीवर रागावतात व त्या भरांत ते तिला बोलतातही. पण लागलीच त्यांचें कोमल हृदय त्याबद्दल व्यथित होतें, मग ते

स्वत:च आनंदी वृत्ति धारण करतात आणि त्यामुळें सगळीकडे प्रफुल्लता वास करूं लागते. त्यांच्या अध्यापनाची मुख्य गुरुकिल्ली ही आहे कीं, ते मुलींचा अभ्यास त्यांच्याकडूनच हंसतखेळत करून घेतात आणि त्यांच्यावर घरीं अभ्यास करण्याचें ओझें टाकीत नाहींत. यामुळें विद्यार्थिनीवर्गांत वामनराव प्रिय आहेत. अध्यापन हाच त्यांच्या आवडीचा व्यासंग दिसतो. त्यांत ते इतके रममाण होतात कीं, त्यांना बाह्य जगाची मुळींच आठवण रहात नाहीं. याप्रमाणें वामनरावांच्या महिलाविद्यापीठांतील कार्याचें येथें अत्यंत संक्षेपानें दिग्दर्शन केलें आहे.

## स्त्रीशिक्षणासंबंधीं मतें

स्त्रीशिक्षणाच्या बाबतींतलीं त्यांचीं मतें मात्र ह्या संस्थेच्या दृष्टीनें विरोधक आहेत. कारण, निराळें कांहीं शिक्षण नसेल तर स्त्रियांचें स्वतंत्र विद्यालय नसावें अशा मताचे ते असून सहशिक्षणाचे पुरस्कर्ते आहेत. स्त्रीशिक्षणाचें ध्येय अमुकच एक विशिष्ट प्रकारचें असावें अशा मताला त्यांचा आत्यंतिक विरोध आहे. पुरुषांप्रमाणें स्त्रियांच्याहि बाबतींत व्यापक दृष्टी ठेवली पाहिजे. सुसंस्कृतता (Culture) हेंच दोघांच्याही शिक्षणाचें ध्येय असावें. स्त्रियांचें ध्येय मर्यादित करण्यांत पुरुषांचीच पक्षपाती व आकुंचित दृष्टी दिसून येते. विवाहाच्या बाबतींतही परस्परांना परस्परांची ओळख करून देऊन मग त्यांच्या विवाहाला पालकांनीं संमति द्यावी हें अलीकडच्या काळांत अधिक श्रेयस्कर आहे; प्रेमविवाह हाच विवाहाचा उच्चतम प्रकार आहे. स्त्रीपुरुषांना विवाहस्वातंत्र्य दिल्यास आजकाल दृष्टोत्पत्तीस येणारीं बरींचशीं दु:खें कमी होतील. मात्र स्त्रीपुरुषांनीं एकमेकांची निवड करण्यांत त्यांच्या पालकांनीं त्यांना सर्वतोपरी साहाय्य केलें पाहिजे. एका दृष्टीनें त्यांच्या निवडीचें क्षेत्र ठरविलें पाहिजे. स्त्रीपुरुषांत अधिकाधिक संमिश्रण होणें सामाजिक स्वास्थ्याच्या दृष्टीनें अहितकारक न होतां हितावहच होईल.

स्वतःची उन्नति हेंच शिक्षणाचें अंतिम ध्येय असल्यामुळें त्यायोगें विवाहविषयक बाबतींत बहुधा अनर्थ उत्पन्न होण्याचा संभव नाहीं. याप्रमाणें वामनरावांची स्त्रीशिक्षण आणि विवाह या विषयासंबंधींचीं कांहीं मतें आहेत. ते ज्या स्त्रीशिक्षणसंस्थेंत आहेत तेथील घटना जरी त्यांच्या मनाविरुद्ध असली तरी ते शिस्तीचे भोक्ते असल्यामुळें ते आपल्या मताचें घोडें पुढें दामटीत नाहींत "King's government must continue" हें एक त्यांचें आवडतें सूत्रवाक्य आहे. आपल्याला संस्था चालवावयाची आहे, तेव्हां त्यांत वैयक्तिक मताचा अभिनिवेश जर क्षणोक्षणीं प्रकट होऊं लागेल तर संस्थेचें अस्तित्व डळमळण्यास उशीर लागणार नाहीं, असें त्यांना वाटत असल्यामुळें ते आपलीं मतें व्यावहारिक दृष्टीनें आणि संस्थेच्या हितसंबंधाच्या दृष्टीनें बाजूला ठेवतात. कुठल्याही बाबतींत वागण्याची त्यांची हीच मनोवृत्ति आहे. असो.

## वाङ्मयविषयक माहिती

वामनरावांचीं 'नीतिशास्त्रप्रवेश', 'साक्रेटिसाचे संवाद' व 'रागिणी' हीं पुस्तकें मुंबई विश्वविद्यालयानें बी. ए. आणि एम्. ए. ह्या परीक्षांस नेमिलीं आहेत. तसेंच त्यांची छोटी कादंबरी 'आश्रमहरिणी' ही महिला विद्यालयांतील उच्च परीक्षांसाठीं लाविली आहे. त्यांचें 'फुलांचा ताटवा अथवा 'मराठी गद्याचे नमुने' हें पुस्तक १९२८ च्या मॅट्रिकच्या परीक्षेस लाविलें होतें.

वामनरावांचीं नीतिशास्त्रप्रवेश, साक्रेटिसाचे संवाद व विचारविलास हीं पुस्तकें श्रीमंत सरकार होळकर-पुस्तक-मालेंतून प्रसिद्ध झालीं असून त्यांना त्याबद्दल अनुक्रमें रु. ५००, २५०, २०० अशीं पारितोषिकें मिळालीं आहेत. रागिणी कादंबरी मनोरंजन मासिकानें छापून प्रसिद्ध केली. त्यांच्या रागिणी कादंबरीचीं हिंदी व गुजराथी भाषांतून

भाषांतरें झालेलीं असून आश्रमहरिणीनेंही गुजराथी पेहराव धारण केला आहे.

वामनराव मुंबई विश्वविद्यालयाच्या मॅट्रिक व बी. ए. या परीक्षांचे मराठी परीक्षक होते व आहेत. तसेंच नागपूर विश्वविद्यालयाची ज्यूनियर एम्. ए. व बनारस विद्यापीठाची बी. ए. या परीक्षांचे ते मराठी विषयाचे परीक्षक आहेत.

## कौटुंबिक माहिती

वामनराव विधुरावस्थेंत काळ कंठीत असून यांच्याजवळ सध्यां त्यांची एक कन्या शकुंतला ही असते. त्यांना एकंदर चार अपत्यें आहेत. ज्येष्ठ कन्या विवाहित असून ती रा. दत्तात्रय केशव केळकर यांना दिलेली आहे. काव्यसमीक्षक व उत्कृष्ट लेखक या दृष्टीनें साहित्यभक्तांस केळकरांचा परिचय आहेच. ते पांचगणी हिंदु हायस्कूलमध्यें अध्यापक आहेत. वामनरावांचे दोन्ही मुलगे मुंबईस नारायणराव यांचे येथें शिकावयास असतात. थोरला मॅट्रिकच्या वर्गांत असून धाकटा पांचव्या इयत्तेंत आहे. हिंगण्यास मुलांच्या शिक्षणाची सोय नसल्यामुळें त्यांना मुलें दूर ठेवावीं लागतात. त्यांची धाकटी मुलगी हिंगण्याच्या विद्यालयांत पांचव्या इयत्तेंत शिकत आहे.

वामनरावांचा मित्रपरिवार बराच मोठा आहे. त्यांच्या विश्वकुटुंबी वृत्तीमुळें त्यांच्याबद्दल प्रेमादर बाळगणारीं अनेक माणसें आहेत. त्यांच्या मित्रवर्गांत त्यांच्या शिक्षणसंस्थेंतील प्रो. मायदेव, प्रो. पटवर्धन, प्रो. आठवले, प्रो. दिवेकर वगैरे मंडळी असून त्यांशिवाय प्रो. श्री. नी. चापेकर, गो. चिं. भट, पेंडसे, करंदीकर इत्यादि गृहस्थ त्यांचे स्नेही आहेत.

ह्याप्रमाणें वामनरावांच्या जीवनचरित्राचा संक्षिप्त वृत्तांत आहे.

## स्वभावचित्र

वामनरावांच्या कादंबऱ्यांवरून किंवा त्यांच्या ग्रंथांत प्रतिपादिलेल्या तत्त्वांवरून कोणी त्यांचे स्वभावविशेष जाणून घेण्याच्या दृष्टीनें त्यांचें निरीक्षण करूं लागेल तर त्याचीं बरींचशीं अनुमानें वस्तुस्थितीहून अगदीं भिन्न व चुकीचीं ठरतील. म्हणजे स्वतःच्या ग्रंथांत प्रतिपादिलेल्या तत्त्वांशीं त्यांचा स्वभाव विसंगत आहे, किंवा ' पुराणांतलीं वांगीं पुराणांत ' या न्यायानें ग्रंथांतील सिद्धांतांशीं त्यांची व्यवहारांतील वर्तणूक सर्वथा विरुद्ध आहे अशा दृष्टीनें ह्या विधानाचा अर्थ घ्यावयाचा नाहीं. कारण त्यांचा जरी कोणत्याही वादग्रस्त बाबतींत इतरांशीं मिळतें व जुळतें घेण्याचा व कोणत्याही परिस्थितीशीं समरस होण्याचा स्वभाव आहे, तरी ग्रंथद्वारें मांडण्यांत आलेलीं उच्च ध्येयें यथाशक्य प्रत्यक्ष वस्तुस्थितींत व व्यवहारांत मूर्तस्वरूपानें आणण्याचा प्रयत्न करीत असावें असें त्यांचें धोरण आहे. आणि त्याप्रमाणें ते आपल्याकडून त्या बाबतींत शिकस्त करीत असतात. त्यांच्या अंतःकरणांत ध्येय-व्यवहाराचा झगडा अबाधित चालूं असतो. आणि त्यांचा स्वभाव जरी अधिक तार्किक, आणि तत्त्वजिज्ञासु आहे—[ते स्वतःला ' आजन्म तत्त्वजिज्ञासु ' म्हणवितात]—तर्ककर्कश मात्र नव्हे—तरी ह्या मानसिक द्वंद्वयुद्धांत त्यांच्या बुद्धिवादपूर्ण विवेकाचा नेहमींच जय होतो असें नाहीं. कारण त्यांचें मन जात्याच अतिशय कोमल, हळुवार आणि सात्त्विक आहे. दुसऱ्यास यत्किंचित् शारीरिक किंवा मानसिक अपाय करणें किंवा एकाद्याचें मन दुखविणें त्यांच्या अतिशय जिवावर येतें. आणि असल्या गोष्टी टाळण्यासाठीं ते आपल्या तत्त्वांचा त्याग करतात, व स्वतःच्या भावना व मतें क्षणभर बाजूला ठेवून आपल्या कोमल मनोविकारांना वश होतात. त्यांच्या स्वभावांत भावना आणि बुद्धी यांचा असा चमत्कृतिजनक संयोग झालेला आहे

कीं, कधीं भावना बुद्धिवादावर विजय मिळविते, तर कधीं बुद्धी भावनेस अंकित करते. एका क्षणीं भावनावश होऊन ते एकाद्याला त्याच्या अपराधाबद्दल बोलतात, आणि दुसऱ्याच क्षणीं बोलल्याबद्दल त्यांच्या मनाला तळमळ लागून रहाते. एका दिशेनें वृत्ति उत्कट झाली असल्यामुळें क्रिया प्रतिक्रियेच्या रूपानें दुसऱ्या दिशेनें होऊं लागते. त्यांची वृत्ति प्रसंगविशेषीं उत्कट व क्षुब्ध होते, परंतु विवेकयुक्त आत्मनिरीक्षण करण्याच्या संवयीमुळें ती लागलीच पूर्ववत् शांत व समाधानी होऊं शकते. त्यांचें मन सद्यःक्षोभी वृत्तीचें आहे असें म्हटल्यास हरकत नाहीं.

ते शिस्तीचे अतिशय भोक्ते असले तरी अरेरावी अधिकारी वृत्तीनें अथवा शिस्त अमलांत आणण्याच्या उत्साहभरांत लोकांच्या मनोभावना दुखविणें किंवा एकाद्या बाबतींत आपलाच हेका चालविणें हें मात्र त्यांस असमंजस व कठोर वाटतें. प्रेमळ व प्रांजळ वर्तन आणि गुणग्रहणतत्पर विचारी वृत्ति हें त्यांच्या स्वभावाचें मर्म आहे.

उदार अंतःकरण, थोर हृदय आणि विश्वकुटुंबी वृत्ति यांमुळें त्यांची सर्वप्रियता वाढली असल्यास नवल नाहीं. स्वतःविषयीं बेफिकिरी आणि निःसंग वृत्ति—कोणी कांहीं मागो, जवळ असलेलें दिल्याखेरीज ते राहावयाचे नाहींत. त्यांच्या बेफिकिरी वृत्तीला विसराळूपणानें मदत केली असल्यामुळें व्यवहारांत त्यांच्यावर प्रसंग आल्याशिवाय रहात नाहींत. पुस्तकांच्या बाबतींत त्यांचा उदारपणा इतक्या पराकोटीला गेला आहे कीं, एकाद्यानें एकादें पुस्तक खुशाल उचलून न्यावें आणि वाटल्यास परत करावें किंवा करूं नये, तरी त्यांना त्याचें कांहींच सुखदुःख नाहीं. त्यांचा एवढा मोठा ग्रंथसंग्रह असाच पहातां पहातां त्यांच्या उदारपणामुळें ओसरत चालला आहे. त्यांचें असें एक तत्त्व आहे कीं, पुस्तकें हीं वाचण्याकरितां आहेत, ज्याला खरी वाचनाची आणि ज्ञानाची

लालसा आहे, त्यानें पुस्तकें नेल्यास त्यांबद्दल वाईट कां वाटावें, आणि राग तरी कां यावा? व्यावहारिक आणि आर्थिक बाबतींत सुद्धां त्यांचा उदारपणा असाच अस्थानीं झालेला आहे. त्यांच्या वर निर्दिष्ट केलेल्या स्वाभाविक वृत्ति आणि अनुनभव या दोहोंच्या संयोगामुळें त्यांच्या बुद्धिनिर्मित कामगिरीचा आर्थिक दृष्ट्या जितका फायदा व्हावयास पाहिजे तितका तो त्यांस झालेला नाहीं. त्यांच्या कादंबऱ्या आणि ग्रंथ यांच्या मालकीहक्कासाठीं म्हणून जे पैसे मिळावयास पाहिजे होते त्या बाबतींतही त्यांनीं सर्वच उदारपणें प्रकाशकांवर सोंपविल्यामुळें त्यांना पुष्कळच तोशीस सोसावी लागली आणि त्यांना त्यांचा योग्य मोबदला मिळाला नाहीं. त्यांच्या ह्या उदारपणामुळें पुष्कळांनीं त्यांना अतिशय बुडविलें आहे. हा त्यांचा व्यवहाराच्या बाबतींतला सैलपणा आणि बेफिकीरपणा यांमुळें त्यांचें पुष्कळ आर्थिक नुकसान झालें आहे.

ते जितक्या उत्कटपणें आणि अंतःकरणाच्या तळमळीनें सुधारणांचा पुरस्कार करण्याचा प्रयत्न करितात तितका उत्कट अभिनिवेश मात्र त्यांच्या वर्तनांत दिसून येत नाहीं. कारण साधारणपणें सुवर्णमध्य राखण्याची त्यांच्या मनाची तयारी असल्यामुळें ते आपल्या तीव्र आकांक्षा शक्य तों प्रबळ होऊं देत नाहींत. प्राप्त परिस्थितींत समाधान आणि सुख शोधण्याची तयारी—निर्वाहः प्रतिपन्नवस्तुषु—असल्यामुळें त्यांचें जीवन सुखावह होतें.

सहसा कोणाला असंतुष्ट करावयाचें नाहीं आणि कोणाचें मन दुखवावयाचें नाहीं, अशा लोकसंग्राहक बुद्धींतच त्यांच्या सर्वप्रियतेचें यशोरहस्य सांठविलेलें आहे.

## आवडीनिवडी

"मला अमका विषय आवडतो व तमका आवडत नाहीं असें फारसें नाहीं. सर्वच विषय आवडतात. गणित, इतिहास व पुराणवस्तु-

संशोधन यांची मात्र फारशी आवड नाहीं. इतर विषयांसंबंधीं एखादें चांगलें पुस्तक असल्यास त्यांत मी तन्मय होऊं शकतों. वर्तमानपत्रांत माझा फार वेळ जातो; याचें कारण तरी हेंच कीं, त्यांतल्या तरतऱ्हेच्या गोष्टी मला मनोरंजक वाटतात, यामुळें ज्ञानांत बहुविधता येते. पण एकच विषयाचा नाद असला म्हणजे त्यांत जसें प्रात्रिण्य मिळतें तसें कोणत्याही विषयांत प्राविण्य मिळविणें कठीण पडतें. स्मृति विशेष प्रबळ नसल्यामुळेंही मला फार त्रास पडतो. इतिहासाकडे लक्ष नसण्याचें हें एक कारण आहे. बहुविध माहिती असल्यामुळें मला आनंद होतो व हा आनंद गमाविण्यास मी केव्हांही तयार होणार नाहीं. पण जगांत एकाद्याला नांव करावयाचें झालें तर एका विषयांत तरी पारंगतता पाहिजे, मग इतर विषयांची फारशी माहिती नसली तरी चालते. जगांत नांव करणें हें ज्याचें ध्येय आहे (आणि हें ध्येय कांहीं वाईट नाहीं) त्यानें एका विषयांत पारंगतता मिळविण्याचा प्रयत्न करावा, इतर विषयांकडे मग दुर्लक्ष झालें तरी हरकत नाहीं. एकदां नांव झालें म्हणजे मग आपली हौस पुरवावी."

---

# प्रकरण पांचवें

## सामाजिक मतें

प्रो. वामनराव जोशी यांचीं सामाजिक बाबतींतलीं मतें क्रांतिकारक व प्रगतिप्रिय असल्याबद्दल 'भूमिके'त दिग्दर्शन केलेंच आहे. त्यांनीं आपल्या मतांचा आविष्कार ' बंधनाच्या पलीकडे ' या कादंबरीचें परीक्षण लिहिण्याच्या निमित्तानें केला आहे. त्यांत त्यांनीं स्पष्टच म्हटलें आहे कीं, " प्रस्तुत लेखांत ' बंधनाच्या पलीकडे ' जाऊं पहाणाऱ्या व क्रांति घडवून आणणाऱ्या एका लेखकाच्या पुस्तकाचें परीक्षण करून अनुषंगानें स्वतःचीं मतें दिग्दर्शित करण्याचें योजिलें आहे."

वामनराव जरी बऱ्याच बाबतींत कालाच्या प्रवाहाबरोबर वाहवत जाणारे असले तरी विवाहाच्या बाबतींत त्यांचीं मतें निश्चयात्मक आहेत. ते पुनर्विवाहाला व मिश्रविवाहाला देखील अनुकूल आहेत. तरुण स्त्रीपुरुषांचा परस्पर परिचय होऊन त्यांच्यामध्यें खरा प्रेमाविर्भाव झाला तर त्याबद्दल त्यांचा आक्षेप नाहीं. ते म्हणतात कीं, ' तरुण पुरुष व तरुण स्त्री हीं एकत्र बोललीं, चाललीं, हंसलीं, खेळलीं व त्यांचें उघड प्रेम असलें तरी तीं पापाचरण करतातच, असें मात्र मानण्याचें कारण नाहीं. खऱ्या प्रेमाला मात्र जातींच्या किंवा कशाच्याहि शृंखला असून उपयोगी नाहींत. कारण असल्या बंधनांपासून त्या व्यक्तीचा किंवा समाजाचा फायदा होत नाहीं. उलट जगांतील दुःखाची कहाणी मात्र त्यायोगें लांबते.' मात्र तरुण स्त्रीपुरुषांच्या खऱ्या व शुद्ध प्रेमाच्या अस्तित्वाबद्दल त्यांच्या मनांत संशयात्मता वास करीत आहे. विवाह आणि प्रेमाबद्दलचे त्यांचे विचार सदरहू परीक्षणांत प्रतिबिंबित झालेले आहेत. 'भूमिकेंत' निर्दिष्ट केलेल्या त्यांच्या विचारांचें या परीक्षणांत सहजगत्या उपबृंहण होत असल्यामुळें त्यांतील आवश्यक उतारे खालीं दिले आहेत:—

## शुद्ध प्रेम

" ' प्रेम प्रेम ' म्हणून आपण म्हणतों तें नेहमींच उच्च व शुद्ध असतें असें नाहीं. तरुण पुरुषाला आपल्या आवडत्या तरुणीच्या सान्नि-ध्यांत आनंद होतो—सात्त्विक आनंद होतो हें खरें आहे. पण स्त्रीपुरुषां-मध्यें कामरहित प्रेम असणें कठीण. निष्काम प्रेम ( Platonic love ) प्लेटोच्या संवादांत किंवा काव्यनाटकांत ठीक आहे, पण व्यवहारांत निष्काम प्रेम सांपडणें कठीण. सामान्यत: युवयुवतींच्या प्रेमाच्या मुळांशीं ज्ञात किंवा अज्ञात असें कामात्मक आकर्षण (Sexual attraction) असतें. कामात्मक आकर्षणाच्या जोडीला बौद्धिक व नैतिक आकर्षणें हीं असतात, आणि तीं असतात म्हणूनच माण-सांत माणुसकी आहे; पण तें आकर्षण नसतें असें नाहीं. या आकर्षणाचें प्रमाण अधिक असल्यास तें इतर आकर्षणांचें सोंग घेईल व आपलें स्वरूप झाकेल इतकें तें कलाकुशल व स्वार्थपरायण आहे ! दमयंती मिळावयाची असें ठरल्यावर इंद्रानें नलाचें जसें सोंग घेतलें तसेंच काम हा देखील हरतऱ्हेचीं सोंगें घेऊन आपली वासना सफल करूं पाहतो ! अर्थात् प्रेमाचे दास होण्यापूर्वी माणसानें पुष्कळच विचार केला पाहिजे व आपली आत्मवंचना तर होत नाहींना याबद्दल सावध राहिलें पाहिजे.

वरील सर्व गोष्टींचा पूर्ण व बरेच दिवस विचार करून एकाद्याला जर वाटलें कीं, अमुक एक स्त्रीच्या संगतींत आपल्याला उच्चतम आनंद होणार आहे, ती आपल्या सद्वृत्तींचें पोषण करील, सत्कर्मांना उत्तेजन देईल, पराक्रम करण्यास स्फुरण आणील, थोडक्यांत सांगाव-याचें म्हणजे आपला संसार सत्काव्याप्रमाणें रमणीय करील, तर मग तिच्या जातीकडे वगैरे न पहातां त्यानें तिच्याशीं विवाह करावा, असें मी म्हणेन व त्याचें अभिनंदन करीन. निष्काम प्रेमाच्या—(Platonic

love ) च्या नादीं लागून वर्षानुवर्षें एकत्र पण अविवाहित राहण्याच्या फंदांत मनुष्यानें पडूं नये. असलें प्रेम अशक्य नाहीं, असें मी म्हणूं शकेन. पण तें कठीण आहे हें कोणालाही कळण्यासारखें आहे.

## एक सूचना

" शुद्ध प्रेमाच्या भ्रमानें कोणाही सामान्य माणसानें तरुणीशीं एकान्त करूं नये; किंवा हस्तचुंबनादि व्यवहारांत पडूं नये. तसेंच कोणत्याही तरुणीनें असल्या प्रकारांना उत्तेजन देऊं नये. हृदयांत पापविचार नसेल व एकांतांतील प्रत्येक भेटींत पापाचरण होतेंच असें नाहीं. परंतु मनुष्याचें मन चंचल आहे. असल्या बाबतींत इंद्रियें आवरणें अत्यंत कठीण असतें. मोठे मोठे विद्वान् व सच्छील साधुपुरुष फसले आहेत, या गोष्टी ध्यानांत धरणें आवश्यक आहे. स्त्रिया एरवीं फार चांगल्या असतात, मनोहर असतात, कोमल असतात, सच्छील असतात, पुरुषांना मोह घालण्याची त्यांची इच्छा नसते, पण त्यांच्याशीं एकान्त केला असतां पुरुष वेडे होतात—मी मी म्हणविणारे वेडे होतात—तेव्हां शहाण्या माणसानें या फंदांत न पडलेलेंच बरें. पुरुषही वाईट नसतात, त्यांच्या मनांत पापविचार असतो असें नाहीं, पण काय होतें कोणास ठाऊक, स्त्रियांशीं एकान्त केला असतां ते भलतेंच कांहीं तरी करून जातात, हा जगाचा अनुभव अनेक लोकांनीं अनेक गोष्टी सांगून अनेकदां नमूद करून ठेवला आहे.

## विवाह

" विवाहकालीं प्रभाकराचें अभिनंदन करतांना त्याला मी कां दोष देतों याबद्दल आणखी थोडासा खुलासा केला पाहिजे. त्यानें जातिभेदाला व लोकमताला झुगारून वेश्येच्या कन्येशीं विवाह केला एवढेंच पाहिलें तर त्यानें फार चांगली गोष्ट केली असें मी म्हणेन. जातिभेद जितक्या लवकर नष्ट होईल तितका चांगला असें माझें मत

आहे. तसेंच आजापणज्यांच्या किंवा आईबापांच्या चुकीबद्दल किंवा पापाबद्दल मुलामुलींना शासन करण्यांत कांहीं अर्थ नाहीं असें म्हणणारा मी आहें. पण वेश्येच्या मुली वाईटच निघतील असा जरी नियम नसला तरी त्यांच्या गृहशिक्षणाकडे व एकंदर परिस्थितीकडे पहातां त्या चांगल्या निघणें कठीण हें मी कसें विसरूं ? माझ्या मुलाचें प्रभाकराप्रमाणें एखाद्या मैनेशीं लग्न झालें तर त्याला मी मरेपर्यंत हरकत करीत राहीन असें नाहीं. पण कुलीन मुलीशीं बोलण्याचालण्याची मी जितक्या आनंदानें त्याला परवानगी देईन तेवढया आनंदानें वेश्येच्या कन्येशीं बोलण्याचालण्याची परवानगी मला देतां येणार नाहीं. कॉलेजमध्यें, वर्गांत किंवा इतरत्र अगदीं साहजिकपणें ओळख झाली व साहजिक क्रमानें प्रेम उत्पन्न झालें तर धोक्याची सूचना देऊन व केवळ हृदयाच्या साक्षीवरच भिस्त न ठेवण्याची खबरदारी बाळगण्यास सांगून मी स्वतः चौकशी करीन व त्या मुलीशीं बोलेन चालेन व मग परवानगी द्यावयाची किंवा नाहीं हें ठरवीन. सामान्य परिस्थितींत देणारच नाहीं, अगदीं अपवादात्मक परिस्थितींतच देईन.

## एकेरी नांव

"नवऱ्याला 'अरे जारे' असें मैना म्हणते हेंही चमत्कारिक वाटतें. प्रभाकराला त्यांत कांहीं वाटत नाहीं, इतकेंच नव्हे तर 'अरे जारे' असेंच तिनें म्हणावें असा तो आग्रह धरतो. नवऱ्यानें बायकोला 'अग' म्हणून एकेरी हांक मारलेली मला चालते, पण बायकोनें नवऱ्याला 'अरे' म्हटलेलें मला ऐकवत नाहीं, हा माझ्या पुरुषपक्षपातित्वाचा दोष आहे असें कांहीं लोक म्हणतील. म्हणोत बिचारे. खरी गोष्ट अशी आहे कीं, हा केवळ संवईचा भाग आहे. पत्नीनें पतीला 'अरे' म्हटल्यानें त्याचा कांहीं अपमान होत नाहीं किंवा कोणाची हत्या होत नाहीं हें मी जाणून आहें. त्याप्रमाणेंच कांहीं

चांगल्या सुशिक्षित सच्छील स्त्रिया आपल्या पतीला ' अरे गणू, ' ' अरे दिनू, ' अशा रीतीनें संबोधतांना मी ऐकलें आहे. सामाजिक बंधनांच्या पलीकडे त्या गेल्या असतील असें म्हणावें तर गरीब बिचाऱ्या हिंदूंच्या चालीरीतींचें बंधन तोडण्यापुरतीच त्यांची बंडखोरी दिसून येते. यूरोपिअन Etiquette च्या बाबतींत मात्र त्यांची बंडखोरी थंडावते, हें जरा चमत्कारिकच खरें. पण हा प्रश्न विशेष महत्त्वाचा नसल्यामुळें येथेंच सोडूं या.

## आर्यस्त्री

" ' आर्यस्त्रियां 'ची ग्रंथकार चेष्टा करतो. (मीही कधीं कधीं उगाच चेष्टा करतों) पण आर्यस्त्रियांचें नांव घेतल्यावर लाज वाटण्याचें मला तरी खरोखर कारण दिसत नाहीं. त्यांचा भोळसटपणा, त्यांची अंधश्रद्धा, त्यांचा फाजील नम्रपणा, त्यांचें अज्ञान, ' पति हाच देव ' हें मानण्याची फाजील प्रवृत्ति इत्यादि दोष काढून टाकले पाहिजेत. शिक्षणाच्या प्रसाराबरोबर ते जातीलही. पण अज्ञानजन्य कां असेना, रूढिमूलक कां असेना, त्यांचें जें ध्येय आहे त्याला त्या चिकटून राहातात, त्याकरितां पाहिजे तो स्वार्थत्याग करतात, हा सद्गुण काय कमी योग्यतेचा आहे ? आर्यस्त्रियांची चेष्टा करणाऱ्या किती पुरुषांमध्यें हा सद्गुण सांपडेल ? आपल्या स्त्रियांचें अज्ञान दूर करा, त्यांचीं ध्येयें नवीन युगाला अनुरूप अशीं करा, तुम्हांला ज्या कांहीं सुधारणा करावयाच्या असतील त्या करा, पण त्यांची ध्येय-निष्ठा जी आहे ती कायम ठेवा, तिच्याबद्दल त्यांना व आपणांला जो अभिमान वाटतो तो वाटेनासा होईल असें कांहीं एक करूं नका."

ह्याप्रमाणें वामनरावांचे प्रेम व विवाह या विषयांसंबंधींचे विचार आहेत. वरील उतारे एका दृष्टीनें आत्मकथात्मक म्हणजे स्वमतप्रति-पादक असल्यामुळें आणि त्यांवरून त्यांच्या मतांचेंही यथायोग्य

आविष्करण होण्याजोगें असल्यामुळें ते मुद्दाम येथें घेतले आहेत. वामनरावांचीं सामाजिक विषयाच्या बाबतींतील आणखीं मतें नलिनी (पान १३३-३४, १७२-७३ इ.), आश्रमहरिणी (पान ७९–८१ इ.), सुशिलेचा देव ( पान ५०, ५७, ८५, ८९, ९५ इ. ), रागिणी (खंड २ १५१, ३३९, १५० इ.) या कादंबऱ्यांतून पात्रांच्या तोंडून त्यांनीं वदविलीं आहेत असें अनुमान करण्यास जागा आहे. त्या मतांच्या बद्दल त्यांनाच जबाबदार धरतां येणें अशक्य नाहीं. कारण तेच स्वतः आत्मविचारसंदर्शनाबद्दल 'बंधनाच्या पलीकडे' या कादंबरीच्या परीक्षणांत लिहितातः—

"लेखक या मतांविषयीं व वर्तनक्रमाविषयीं जें लिहितो व ज्या तऱ्हेनें लिहितो त्यावरून लेखकासंबंधानेंही अनुमान करणें शक्य आहे. हें चुकीचें असल्यास वाङ्मयात्मक कलेच्या दृष्टीनें त्याचें लेखन सदोष आहे असें म्हणावें लागेल. शेक्स्पिअर हा ऑयगो, ऑथेल्लो, हॅमलेट इत्यादिकांचीं स्वभावचित्रें काढतो, पण तो स्वतः त्या पात्रांहून भिन्न आहे, असें त्या नाटकांवरूनच आपणांस कळतें. स्वभावचित्रें उत्तम काढतां येण्याकरितां त्याचें पात्रांशीं एकाअर्थी तादात्म्य जरी झालें असलें, तरी दुसऱ्या दृष्टीनें पात्रांहून भिन्न असें आपलें एक वैशिष्ट्य आहे असें उत्तम लेखकाच्या कृतीवरूनच आपणांस दिसतें."

# प्रकरण सहावें

## ग्रंथकर्तृत्वाची हौस

" लहानपणापासून मला 'ग्रंथकर्ता' होण्याची महत्त्वाकांक्षा होती. अनुभवान्तीं आतां असें वाटूं लागलें आहे कीं, ग्रंथकर्तृत्व हें ध्येय असूं नये. फावल्या वेळांत हौशीनें करण्याचें हें एक काम असावें व याच्यावरच जर सगळी भिस्त ठेवली तर मनुष्य गोत्यांत येईल व ग्रंथकर्तृत्व हा हेतूही साध्य होणार नाहीं. जे "प्रतिभावान्" असतील त्यांची गोष्ट वेगळी, त्यांनीं पाहिजे तर या फंदांत पडावें. (व ते, कोणी कांहीं म्हटलें, कांहींही झालें तरी पडणारच.) पण सामान्य माणसासंबंधीं बोलावयाचें म्हणजे त्यानें आधीं उपजीविकेचें दुसरें एखादें साधन हातीं ठेवून मग वाङ्मयाच्या नादीं लागावें."

*　　*　　*

## उत्तम वाङ्मय

वाङ्मय हें उपजीविकेचें साधन झालें कीं, तें दूषित होण्याचा फार संभव आहे. चांगलें वाङ्मय हौशीनें उत्पन्न होतें, पैशानें नाहीं.

*　　*　　*

कवि, गद्यग्रंथकार व कलावंत लोक ह्यांची उत्तमोत्तम कलाकृति पैशाच्या आशेनें झालेली नाहीं.

*　　*　　*

चांगल्या वाङ्मयाचा एक विशेष सांगतों. मनाला जें योग्य वाटेल तेंच लिहावें. जनभीतीनें किंवा भिडेनें लिहिलेलें वाङ्मय बलहीन असतें. मनाला जें वाटतें, तेंच लिहिणारा मनुष्य अशिक्षित असला, तरी तो चांगलें वाङ्मय निर्माण करील.

*　　*　　*

' उत्तम वाङ्मय निर्माण करीन ' असें ध्येय असण्यापेक्षां मी उत्तम तऱ्हेचें वर्तन करीन ' असें ध्येय अधिक चांगलें. " वाङ्मयापेक्षां जीवित उच्चतर आहे " असें एक माझें आवडतें सूत्र आहे. वाङ्मय हें जीविताचें एक अंग आहे, जीविताची पूर्णता किंवा कृतार्थता वाङ्मयानें होणार नाहीं.

* * *

## लेखनविषयक अनुभव

" एखादा लेख लिहून झाल्यावर त्याची नक्कल करणें माझ्या जिवावर येतें. तो लेख हरवल्यावर पुनः लिहून काढणें तर फारच जिवावरचें संकट ! तरुण मंडळींनीं आपल्या लेखाची एक प्रत आपल्या जवळ ठेवण्याची सावधगिरी ठेवावी. माझ्या कांहीं छापील लेखांच्याही प्रति मजजवळ नाहींत. ज्या मासिकांत ते छापले गेले त्यांच्या चालकांना मासिकाचा एक अंक धाडला म्हणजे लेखकावर उपकार केल्यासारखें वाटतें; तरी या बाबतींत तरुण लेखकांनीं प्रथमपासूनच सावध राहून " लेखाच्या १० प्रती मला पाठवाव्यात अशी अपेक्षा आहे. तें शक्य नसल्यास लेख छापूं नये. " असें प्रथमपासूनच लिहून ठेवावें. मासिकाचे मालक एक प्रत पाठवितात, ती आपण कोणाला तरी वाचण्यास देतों. ( आपला लेख लोकांनीं वाचावा अशी इच्छा प्रत्येकाला असतेच. ) तो मनुष्य दुसऱ्या कोणाला तरी देतो व अशा रीतीनें तें मासिक आपल्या हातीं कांहीं परत येत नाहीं ! एका अर्थी ही आनंदाची गोष्ट आहे. कारण आपला लेख एवढ्या लोकांकडून वाचला जातो. पण शेवटीं आपला लेख आपल्याला पुनः लागला म्हणजे मात्र तो सांपडत नाहीं, व कोणत्या सालीं कोणत्या मासिकांत छापला गेला त्याची देखील आठवण राहात नाहीं, व

आठवण झाल्यास त्या मासिककाराकडे तो अंक मिळत नाहीं अशी स्थिति होते त्याची वाट काय ?

* * *

" मला लेखाला किंवा गोष्टीला आरंभ करणें कठीण पडतें. आरंभींचीं पहिलीं पानें दोन तीनदां लिहावीं लागतात. पुढें मात्र फार अडचण पडत नाहीं. आरंभ कसा करावयाचा हें माझें ठरलेलें नसतें, अंत कसा करावयाचा हेंही ठरलेलें नसतें. लिहितां लिहितां सगळ्या गोष्टी ठरतात. त्या विषयासंबंधीं आधीं केव्हां तरी पुष्कळ विचार झालेला असतो म्हणूनच त्या गोष्टी साध्य होतात, ' दिव्यस्फूर्ती ' मुळें नव्हे हेंही सांगून ठेविलें पाहिजे.

" शेजारीं गाणें चाललें असलें तरी मला लिहितां येतें. गोंगाटाचाही त्रास होत नाहीं. अर्थात् लिहिण्याची गाडी वेगांत सुरू झाली असली तर. गाणें मला समजत नसल्यामुळें माझें तिकडे लक्षही जात नाहीं, पण ज्यांना तें समजत असेल त्यांना त्रास होणें साहजिकच आहे. गाणें समजत नसलें तरी तें बरें वाटतें, यामुळें एकाग्रता सुलभ होत असावी अशी माझी कल्पना आहे.

* * *

" मी जे लेख लिहिले आहेत किंवा पुस्तकें लिहिलीं आहेत. तीं आतां पार बदलून टाकावींशीं वाटतात आणि संधि सांपडल्यास टाकीनही म्हणतों. "

* * *

" मागें पुढें पाहून डोळे उघडे ठेवून, सावधगिरीनें हजार धोरणें संभाळून लिहिलेल्या निबंधांत किंवा पुस्तकांत सुसंगति असेल, पण त्या सुसंगतीमुळें सत्य थोडेंसें दडपलें जातें असा माझा अनुभव आहे."

* * *

" अनेक इंद्रियांपैकीं ' वाक् ' हें एक इन्द्रिय आहे. त्याला फाजील महत्त्व देण्यांत अर्थ नाहीं. वाचेनें कार्यें होतात, सत्कार्यें होतात, आनंददायक कार्यें होतात, स्फूर्ति मिळते, इत्यादि सर्व गोष्टी खऱ्या; पण केवळ ' वाङ्मय ' व्यवहारपूर्ण समाधान देऊं शकत नाहीं. हा सर्व ' बोलाचाच भात व बोलाचीच कढी ' अशांतला तर प्रकार नाहीं ना, अशी स्वत:ची स्वत:लाच शंका कित्येक वेळां येऊं लागते व सन्मतीपेक्षां किंवा सदुक्तीपेक्षां सत्कृतीच श्रेयस्कर अशी भावना होऊं लागते. उत्साहाच्या भरांत तर असें वाटतें कीं, काव्यांतले प्रसंग वाचण्यापेक्षां स्वत:चें जीवनच काव्यात्मक करावें व मग दुसऱ्यांनीं वाटल्यास तत्संबंधीं काव्यें करावींत किंवा वाचावींत ! संशयस्थानांनीं परिपूर्ण असा इतिहास वाचण्यापेक्षां किंवा लिहिण्यापेक्षां आपल्या पराक्रमानें नवा इतिहास बनवला तर अधिक चांगलें."

* * *

## वाङ्मयविषयक विचार

प्रत्येक चांगल्या कादंबरींत ग्रंथकाराचें आत्मवृत्त व त्याची आत्मवृत्ति हीं अप्रत्यक्ष व अंधुक रीतीनें कां होईना, डोकावतातच.

* * *

ग्रंथकार जेव्हां प्रथमपुरुषी भाषा वापरूं लागून स्वानुभवकथन किंवा स्वभावनाविष्करण करतात, तेव्हां त्यांच्याविषयीं आपणांला एक प्रकारचें परिचितत्व वाटूं लागतें, किंबहुना त्यांचा आणि आपला घरोबा आहे असें वाटूं लागतें; आणि अर्थात् अशा थोर लोकांचें हृद्गत आपणांस कळतें, त्यांच्या आपण विश्वासांतले आहोंत, त्यांच्यामध्येंही आपल्यासारखे कांहीं कांहीं दोष आहेत, त्यांनाही आपल्यासारख्यांच्या सहानुभूतीची जरुरी आहे, अशा स्वाभिमानपोषक भावनेमुळें ( व दुसऱ्याही अनेक संमिश्र भावनांमुळें ) आपणांला एक प्रकारचा विशिष्ट

आनंद होत असतो. असा आनंद पर-वृत्त-कथानात्मक ग्रंथांपासून होत नाहीं.

*  *  *

काव्याची काय किंवा दुसऱ्या कोणत्याही मूर्त स्वरूप धारण केलेल्या सौंदर्याची काय, चर्चा करण्यापेक्षां किंवा त्याचें पृथक्करण करण्यापेक्षां त्याचा आस्वाद घेणें किंवा आस्वाद घेण्याची सुसंधी लोकांना आणून देणें किंवा निदान त्याचा आस्वाद घेण्याच्या आड तरी न येणें हेंच केव्हांही श्रेयस्कर.

*  *  *

कादंबरी ही बोलून चालून ' कादंबरी, ' कदंब पुष्पापासून केलेली किंवा तत्सम मदिरा. ही मदिरा प्राशन करण्यांत एक हेतु असा असतो कीं, कठोर व कुरूप वस्तुस्थितीचा आपणांस घटकाभर तरी विसर व्हावा, आणि आपण पेल्यांतल्या सुंदर व रंगीबेरंगी बुडबुड्यांवर तरंगणाऱ्या व कल्पनादेवी वाट दाखवील तिकडे वाहात जाणाऱ्या विमानांत बसून पृथ्वीतलावरील हरतऱ्हेचे खरेखोटे देखावे पहावेत आणि त्यांत रममाण व्हावें ! कधीं कधीं हे देखावे पहातांना त्यांतील सौंदर्यानें मन सुप्रसन्न होतें व कुरूपतेनें विषण्णही होतें. कधीं कधीं या देखाव्यांकडे पाहून तात्त्विक मनन करावेंसें वाटतें तर कधीं कधीं हे देखावे दाखविणारांचें कौशल्य किंवा अकौशल्य कितपत व कोठें कोठें दिसून येतें याचें परीक्षण करावेंसें वाटतें.

*  *  *

कथानकाला Incident (कृति) व Movement (गति) हीं पाहिजेत. म्हणजे मुख्य मुख्य पात्रांकडून विशिष्ट कार्यें घडवून आणण्याचे किंवा बिघडविण्याचे बरेचसे बुद्धिपुरःसर प्रयत्न केले गेले पाहिजेत. तत्कार्य-

पोषक किंवा कार्यविघातक प्रसंग किंवा घडामोडी त्यांत पाहिजेत, कथानकांत ओघ असावा व ते एकाच स्थितींत किंवा परिस्थितींत रेंगाळूं किंवा घुटमळूं नयेत.

*　　*　　*

कृति किंवा प्रसंग याचा अर्थ आकुंचित करण्यांत येऊं नये. संभाषण ही देखील एक कृतीच आहे; 'प्रसंग' हे शब्दमूल देखील असूं शकतात. कृतींवरून शील जसें दिसतें तसें मतांवरून किंवा विचारप्रवृत्तीं-वरूनही दिसूं शकतें, इत्यादि गोष्टीही आपण ध्यानांत धरल्या पाहिजेत.

*　　*　　*

परकायाप्रवेश करणें योग्यासच शक्य असेल, पण परमनःप्रवेश सहृदय ग्रंथकारांना करतां येतो व परानुभवाला स्वानुभव करून घेऊन भावनेच्या आणि कल्पनेच्या सामर्थ्यानें या स्वानुभवाला काव्यात्मक स्वरूप देतां येतें.

# भाग दुसरा

## आश्रमहरिणी

'आश्रमहरिणी'ची जन्मकथा पुढें एखाद्या वेळेस सांगण्याचें प्रो. वामनराव जोशी यांनीं ' अरुण ' मासिकांत (नोव्हेंबर १९२८) वाचकांना अभिवचन दिलें आहे, परंतु या मुग्धमधुर लघुकथेबद्दल त्यांनीं स्वतःच जे उद्गार काढले आहेत त्यांवरून ग्रंथकर्ता आपल्या कृतीकडे कशा आत्मीयतेनें आणि पक्षपाती दृष्टीनें पहात असतो आणि तो प्रतिपक्षाचें समाधान होण्यासारखें आत्मसमर्थन कसें करूं शकतो हें सहज दृष्टोत्पत्तीला येतें. हें जरी खरें असलें तरी ग्रंथ आणि ग्रंथकर्ता यांच्यामध्यें जो सूक्ष्म रहस्यमय पडदा असतो, तो या आत्मकथनानें दूर होतो, आणि ग्रंथाभोंवतालचें जें गूढरम्य वातावरण असतें तें नाहींसें होतें. तथापि टीकाकारांच्या स्वैर लेखणीला वहकूं न देण्याचें कार्य ह्या आत्मकथनाच्या द्वारें होत असतें. असो. प्रो. वामनराव ' अरुणां 'त लिहितात :—

"आतां एवढेंच सांगतों कीं, तिच्या अखेरीस टेनिसनच्या Enoch Arden सारखा जो प्रसंग आला आहे व एकंदरींत या दोन पुस्तकांत जें साम्य आहे, त्यामुळें या लहानशा पुस्तकाचें नुकसान झालें आहे. मी Enoch Arden वाचलें होतें व त्या पुस्तकानें माझ्या मनावर बराच परिणाम केलेला होता. पण 'आश्रमहरिणी' लिहितांना Enoch Arden मधील पानें मी विसरलों होतों. त्यांतील सामान्य रूपरेषेहून मला अधिक कशाचेंच स्मरण नव्हतें. आश्रमहरिणीची

कल्पना निराळ्याच प्रकारानें सुचली, तथापि तिचें Enoch Arden शीं जें निर्विवाद साम्य आहे त्यामुळें परपुष्टत्वाचा दोष आला. लोकांचे दागिने घेऊं नयेत, इतकेंच नव्हे, तर त्यांच्यासारखे दागिने घालूंही नयेत, नाहीं तर चोरीचा आरोप यावयाचा, असा एक अनुभव आला तो लोकांना सांगितला असतां त्यांना उपयोगी पडण्यासारखा आहे.

'आश्रमहरिणी' विषयीं आणखी बरेंच लिहितां येईल, पण सध्यां एवढेंच सांगतों कीं, मला आपली 'आश्रमहरिणीच' माझ्या सगळ्या पुस्तकांत अधिक आवडते. तिच्यांतले दोष मात्र मला ठाऊक आहेत. पण तिच्यांत माझ्या कांहीं अनुभवांचा अर्क 'रस'रूपानें उतरला आहे असें मला वाटतें, आणि या ग्रंथाच्या लेखनाच्या वेळीं मला 'ब्रह्मानंदसहोदर' म्हणून ज्याला म्हणतात त्या रसाचा जितका व जसा आस्वाद घेतां आला तितका आस्वाद इतर ग्रंथांच्या वेळीं सापेक्षतेनें क्वचित् प्रसंगींच घेतां आला."

ग्रंथकर्त्याला आपल्या सर्व कृतींत ही 'आश्रमहरिणी' अधिक आवडते, त्यावरून सामान्य वाचकांना सुद्धां ही कादंबरी आवडणार नाहीं अशी ग्वाही देतां येत नाहीं. परंतु तिच्यांतील सहृदयानंददायक भावरम्यता, सौंदर्यपूर्ण वर्णनोत्कटता व कलाविलासाची अव्याजमनोहरता ह्या तीन गोष्टींमुळें रसिक वाचकाचें चित्त तिच्याकडे आकर्षिलें जातें. तिच्यांत सर्वत्र वास करीत असलेलें ऋषिकालीन वातावरण, वर्णनांचें यथार्थत्व आणि रसानुकूल भाषा यांमुळें ही छोटी कादंबरी ऊर्फ लघुकथा परिणामकारक व वस्त्वादर्शी झाली आहे. स्त्रीधर्मविषयक प्रश्नांचा ऊहापोह करण्याच्या निमित्तानें ह्या लघुकथेची अवतारनिर्मिती झाली असली तरी तिच्यांत मानवी जीवित आणि त्यांतील दैवाधीन आनंद-दुःख, मनुष्यमात्राची स्वार्थपरायण व आत्मपर्याप्त बुद्धि, प्रियजनाविषयींची प्रेमोत्कटता, सात्त्विकता, 'आत्मनस्तु कामाय सर्वं प्रियं भवति।'

ह्या तत्त्वाचा आविष्कार आणि स्त्रीहृदयाचें मार्मिक आणि चित्रोपम शब्द-चित्र इत्यादि गोष्टींचें दर्शन झाल्यामुळें वाचक जसा कलाविलासानें मोहून जातो, तसा तो उद्‌बोधक तत्त्वमाधुर्यानें हर्षित होतो. लेखकाचें भाषासौष्ठव व वर्णनरम्यता यांच्या योगानें वाचकाला तत्कालीन वातावरणाशीं आणि कथेंतील प्रसंगाशीं समरस व तन्मय करण्याची इतकी प्रभावी शक्ति आहे कीं, त्याला केव्हांच आत्मविस्मृती पडते आणि तो कथानकाशीं एकरूप होऊन जातो. लेखकाची आत्मविस्मृति इतक्या थराला जाऊं शकते कीं एखादा वाचक पुनर्विवाह-प्रतिकूल असला तरी त्यालाहि कथानकांत कांहीं अनुचित व मनुष्य स्वभावदिग्दर्शनाच्या दृष्टीनें अप्रयोजक असें कांहीं आहे, असें वाटत नाहीं. आणि हीच कथेच्या श्रेष्ठत्वाची खूण होय असें म्हणण्यास हरकत नाहीं.

कथानकांत सर्वत्र दैवाधीनतेचें प्राबल्य दिसून येतें. धौम्य आणि गभस्तिगती हे दोघेहि सुलोचनेच्या ‘सुरूप-सद्गुण-मोहजालांत’ सांपडले आणि त्यावर आपल्या आत्मकथेंत धौम्य उद्गार काढतो—“आम्ही तिच्या सुकुमार सौंदर्यावर व सद्गुणांवर लुब्ध झालों यांत आमचा तरी काय दोष? हा दैवाचा दोष आहे, दुसरा कोणाचा नाहीं! नारदा, तूं कांहीं म्हण, पण दैव म्हणून कांहीं पदार्थ आहेच! दैव, दैव, दैव! हें दैव जगांत किती अनर्थ घडवून आणित आहे!” अशा प्रकारें सर्वत्र दैवयोगावरील श्रद्धेचा संचार दिसून येतो. “आश्रमहरिणींत कथानकाच्या साहाय्यानें श्री. वा. म. जोशी पुनर्विवाह व दैव—एक सामाजिक व दुसरा तत्त्वज्ञानपर, अशा या दोन प्रश्नांचा ऊहापोह करतात, या कथानकांत ध्येयात्मक व वास्तविक असे दोन प्रवाह स्पष्ट दिसून येतात.” (मराठी लघुकथा-‘रत्नाकर’—मासिक मार्च १९३०) कथानकांत उत्पन्न केलेल्या

विकट व चमत्कारिक परिस्थितींत पुनर्विवाहाची आवश्यकता प्रतिपादन करून पुनर्विवाहविन्मुख वाचकाची त्याविषयीं अनुकूलता मिळविणें हा एक ह्या लघुकथेचा प्रच्छन्न हेतु असावा असें वाटतें. परंतु त्याच्याही पेक्षां एकाच स्त्रीला एकाच वेळीं दोन प्रियकर पति असणें कां शक्य असूं नये असा एक अभिनव प्रश्न लेखकाला मांडावयाचा होता असें दिसतें—कारण लेखकानें कथानकाचा शेवट कृत्रिम केला आहे, हें हेय—आणि तो कां प्रश्न मांडला नाहीं हें लेखकानें आश्रमहरिणीविषयीं 'अरुणांत' लिहितांना स्पष्टच सांगितलें आहे. तेव्हां टीकाकाराच्या तर्कटीपणाचा व्यामोह बाजूस सारून आपण त्यांचेंच म्हणणें ऐकूं या. ते म्हणतात:—" आश्रमहरिणीचा शेवट जो केलेला आहे तो कृत्रिम झाला आहे, हें पूर्वींच मला कळलेलें होतें, पण मनाप्रमाणें शेवट करण्याचें त्या वेळीं धैर्य नव्हतें. पुनर्विवाहाला अनुकूल अशी लहान कादंबरी लिहिण्याचें धैर्य केलें, पण गोष्टीच्या ओघाप्रमाणें शेवटीं नायिकेच्या दोन्ही पतींचीं जेव्हां गांठ पडली तेव्हां दोन पतींची अपवादात्मक परिस्थितींत एक बायको असूं शकेल असें माझें जरी मत होतें ( द्रौपदीला तर पांच पति होते ! ) तरी हें मत उघडपणें सांगण्याचें त्या वेळीं मला धैर्य नव्हतें. अर्थात् त्या दोन पतींपैकीं एकाला सापाकडून चाववून मारविलें व मी मोकळा झालों. कला या दृष्टीनें गोष्टीचा अंत अर्थात् कृत्रिम झाला व लेखामध्यें ग्रंथकर्त्याचीं खरीं मतें यावींत हें जें लेखननीतीचें आद्य तत्त्व त्यालाही हरताळ फांसला गेला. एवढें कां, तर सांकेतिक नीतीच्या विरुद्ध थोडेसें जाण्याचें जरी धैर्य होतें तरी गोष्टींत देखील सोळा आणे खरें मत प्रदर्शित करण्याचें उच्चतम धैर्य नव्हतें. पुढच्या आवृत्तींत वर सुचविल्याप्रमाणें फरक करणार आहें. असा फरक करण्याचा ग्रंथकाराला अधिकार आहे किंवा नाहीं तें वाङ्मयविषयक टीका-

कारांनीं ठरवावें. मला संधि मिळाल्यास मी फरक करण्याचा बेत केला आहे, एवढेंच आतां सांगतों. "

ग्रंथकर्त्याला स्वतःच्या कृतींत लेखननीतीच्या दृष्टीनें इष्ट तो फरक करावयास केव्हांही अधिकार आहे. स्वतःचीं मतें प्रांजळपणें मांडायला त्याला पारंपरिक समाजनीतीनें कोलदांडा कां घालावा ? समाजानें तीं मतें स्वीकारलींच पाहिजेत असा लेखकाचा तरी कोठें अट्टाहास असतो ?

आश्रमहरिणींतील पुनर्विवाहासंबंधींचा एक सुंदर उतारा देण्याचा मोह आवरत नाहीं:—

" पत्नीला सुख व्हावें, तिची आत्मोन्नति व्हावी अशी जर पतीची इच्छा असेल, तर आपण मरण पावल्यावरही आपल्या अल्पवयस्क पत्नीनें त्या वयांतच सर्वसंगपरित्याग करावा, असें दयार्द्र अंतःकरणाच्या विवेकी पतीस तरी वाटूं नये. अन्य पति केल्यानें पातिव्रत्यभंगाचा दोष येतो हें मला ठाऊक आहे; पण कित्येक अबलांचें मन त्यांच्या स्वाधीन नसतें, त्यांनीं किती केलें तरी प्रबल व गीतेंत म्हटल्याप्रमाणें ' प्रमाथि ' असलेलीं इंद्रियें त्यांचें मन विकारवश करतात. विवेकानें त्या आपल्या कृतीचें नियमन करूं शकतात. पण मनाचें नियमन करणें अत्यंत दुर्घट. त्या कर्मानें शुद्ध राहूं शकतात; पण मनांत त्यांना विवाहेच्छा होतेच. जन्मभर त्यांचें शरीर शुद्ध, पण मन पापी असतें. मनाची पापवासनेकडे ओढ अनावर वाहूं लागली म्हणजे खुशाल पापें करावींत, असें मी म्हणत नाहीं; आणि कोण म्हणेल ? पण ' पाप ' कोणतें व कोणतें नाहीं, हें पाहिलें पाहिजे. पुनर्विवाह हा नित्य पापात्मक आहे, तो कधींही क्षम्य नाहीं, आपद्धर्म म्हणून सुद्धां तो समाजांत येऊं देण्यासारखा नाहीं, असें तुला वाटतें काय ? धौम्या, बाह्य शरीरशुद्धि अधिक कां खरी

अंत:शुद्धि ? अन्य पति केल्यानें अंत:शुद्धि होते. ज्याच्या समागमांत आपणांस पवित्र विचार सुचतात, ज्याचें उदार अंत:करण आपणांसहि उदार होण्यास प्रेमानें शिकवितें, ज्याची नि:स्वार्थ परहितबुद्धि आपल्या स्वार्थबुद्धीला लाजविते, ज्याचें ज्ञान आपलें अज्ञानपटल दूर करतें, ज्याची धर्मप्रकृति आपल्या उच्छृंखल मनास आवरून धरण्यास सांगते, अशा प्रेमपूर्ण सात्त्विक पुरुषाशीं विवाह करण्याचें एकाद्या कोमल स्वभावाच्या अज्ञान अबलेनें मनांत आणलें, तर तिला पापिणी म्हणण्यास मी तयार नाहीं."

---

## रागिणी

'रागिणी'ची जन्मकथा तिच्या जनकानें दिल्याप्रमाणें अशी आहे:--

" महादेव शिवराम गोळे यांच्या ' हिंदुधर्म व सुधारणा ' या पुस्तकानें माझ्या मनावर पुष्कळ परिणाम केलेला होता व असें एकादें पुस्तक लिहावें अशी माझ्या मनांत महत्त्वाकांक्षा उत्पन्न झाली होती. ही महत्त्वाकांक्षा बीजावस्थेमध्यें असतां सर आर्थर हेल्प्स ह्यांचें 'Friends in Council' हें पुस्तक माझ्या वाचण्यांत आलें व वरील आकांक्षा बलवत्तर झाली. पुस्तक लिहिण्यास घेतल्यावर तात्त्विक चर्चेपेक्षां कथानकाकडे व विशेषत: स्वभाववर्णनाकडे अधिक लक्ष जाऊं लागलें. तथापि तत्त्वचिन्तनपर प्रवृत्ति अगदींच थंडावली नाहीं. गोष्टींत आलेल्या कांहीं प्रसंगांचें वर्णन करण्याची इच्छा पुढील पुस्तकांतील कांहीं भागांवरून उत्पन्न झाली. फेनिपूर कूपर यांची Deerslayer ही कादंबरी व Sir Conan Doyle यांची एक कादंबरी ( हिचें नांव आठवत नाहीं ) या दोन कादंबऱ्या मी सिंधहैद्राबादमधील तुरुंगांत वाचल्या. या कादंबऱ्यांचा परिणाम स्थूल

दृष्टीनें पाहणाऱ्यांना कांहींच दिसणार नाहीं; पण सूक्ष्म दृष्टीनें पहाणाऱ्यांना दिसेल व कित्येकांना दिसलाही असेल. ( मी न सांगतां वरील गोष्ट ओळखणारा मला आतांपर्यंत एकच मनुष्य भेटला; पण इतरांनीं ती ओळखली असून त्यांची व माझी गांठ पडण्याचा किंवा याविषयीं बोलण्याचा योगायोग आला नसेल. ) ”

रागिणींत आतां कांहीं बदल करण्याचा आपला इरादा आहे काय? या प्रश्नाला वामनराव उत्तर देतात:–

“ रागिणींत जो कांहीं ठिकाणीं फाजील विस्तार झाला आहे तो काढला पाहिजे, असें कांहीं लोक मला सांगतात. पण कात्री कोठें लावावी हें मात्र मला समजत नाहीं. जें लिहिलें आहे तें लिहिलें आहे. आतां तें तसेंच राहूं द्यावें असें वाटतें. विचारान्तीं कांहीं भाग काढतां येईल असें वाटतें, पण स्वतःच्या हातानें ही शस्त्रक्रिया होणें कठीण आहे. ”

‘ रागिणी ’ ही इतक्या श्रेष्ठ दर्जाची कादंबरी आहे कीं, तिचें परीक्षण करणाराही तितक्याच श्रेष्ठ दर्जाचा आणि तिच्या योग्यतेचा असला पाहिजे. हा समीक्षक श्री. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांचेखेरीज दुसरा कोण असणार ! तेव्हां त्यांनीं जें रागिणीचें परीक्षण केलें आहे त्यांतीलच उतारे देणें औचित्याच्या दृष्टीनें अधिक इष्ट होईल. ( आणि हें सुंदर परीक्षण विविधज्ञानविस्तारांत १९१८ सालीं येऊन गेलें असल्यामुळें लोकांच्याही तितकेंसें नजरेसमोर नाहीं. तेव्हां तोही कार्यभाग अनायासें होईल. )

साहित्यसव्यसाची श्री. कृ. कोल्हटकर लिहितात:—

“रा. रा. वामनराव जोशी यांच्या सर्व लेखांतून त्यांची तत्त्वशोधनाची व वादविवादाची दांडगी हौस दृष्टीस पडते. त्यांजकडून तत्त्वज्ञान-विषयक व नीतिविषयक ग्रंथांचें मार्मिक परिशीलन झाल्यासारखें दिसतें.

आपण संपादिलेल्या ज्ञानाचा लाभ केवळ स्वतःसच न मिळतां बहुजन समाजासही मिळावा अशी त्यांची इच्छा असल्याचें त्यांनीं आपल्या कथांतूनही गोंविलेल्या तात्त्विक चर्चांवरून दिसतें.

" स्वयंप्रकाश (Original) कादंबऱ्यांच्या कर्त्यांच्या अंगीं मनुष्यस्वभावाचें मार्मिक ज्ञान, वर्ण्य व्यक्तीशीं तादात्म्य पावून त्यांच्या भिन्न भिन्न भावना रंगविण्याचें सामर्थ्य वाचकांस परिणामकारक वाटेल अशी कथानकाची हातोटी इत्यादि जे गुण इतर कादंबरीकारांस लागतात त्यांच्या जोडीस सृष्टींतील घडामोडींचा तिऱ्हाईत म्हणून निर्विकार मनानें विचार करण्याइतकी समतोल मनःप्रवृत्तीही असावी लागते. ते गुण अंगीं असावयास मनुष्य वैचित्र्यप्रिय असावा लागतो. त्याची बुद्धि बहिर्मुख असावी लागते; उलट ही मनःप्रवृत्ति अंगीं असावयास तो एकमार्गी असून त्याची दृष्टी अंतर्मुख असावी लागते. ते गुण व अंतःप्रवृति हीं एकाच मनुष्यांत एकवटलेलीं फारच क्वचित् दिसून येतात. त्या अपवादांतच रा. रा. वामनराव जोशी यांची गणना आहे. ज्याप्रमाणें व्यावहारिक कादंबरीच्या जनकत्वाचा मान रा. रा. हरिभाऊ आपटे यांजकडे निर्विवादपणें जातो त्याप्रमाणें तात्त्विक कादंबरीच्या जनकत्वावर रा. रा. वामनराव जोशी त्यांचाच निःसंशय हक्क पोहोंचत आहे.

\+ + +

सौंदर्यशास्त्रांतील वस्तुवाद (Realism) व कल्पनावाद (Idealism), समाजशास्त्रांतील समाजसत्तावाद (Socialism) व व्यक्तिस्वातंत्र्यवाद (Individualism), नीतिशास्त्रांतील चार्वाकवाद (Egoism) व बहुजनसुखवाद (Utilitarianism), तत्त्वज्ञानांतील अंतःस्फूर्तिवाद (Intuitionalism) व तर्कवाद (Rationalism) या वादांचा मनुष्याच्या मनःप्रवृत्तीशीं अर्थात् त्याच्या स्वभावाशीं निकट संबंध

असतो व त्याच्या भावना त्याच्या स्वभावाचाच परिणाम होत. भिन्न भिन्न मनुष्यांचे स्वभाव व त्यांच्या भावना हेच कादंबरीचे प्रामुख्यें-करून विषय असल्यामुळें उपयुक्त वादांशीं कादंबऱ्यांचाही संबंध येतो. खुद्द रागिणी कादंबरींतच अनेक वादविवादांच्या प्रसंगीं भिन्न भिन्न व्यक्तींनीं भिन्न भिन्न बाजू घेतल्यामुळें त्यांच्या स्वभावांवर चांगला प्रकाश पडला आहे. त्याशिवाय तत्त्वज्ञान व व्यवहार, अंतर्यामींची खळबळ व शांत विचार ह्यांचा फारच क्वचित् दिसून येणारा संगम पाहून तात्त्विक कादंबरीच्या वाचकांस तिच्या चमत्कृतिजनकत्वांत भर पडलेली वाटते. या दृष्टीनेंही उपयुक्त शास्त्रांचा कादंबरीशीं संबंध आहे. कादंबरीचा लेखनोद्देश जरी तत्त्वबोधाचा असला तरी कादंबरींत केलेल्या विवेचनाचीं अवयवीभूत प्रमेयें कादंबरी ज्या वाचकांकरितां लिहिली असेल त्यांना अज्ञात असतां कामा नयेत.

* * *

बुद्धि व श्रद्धा यांच्यामध्यें श्रेष्ठ कोण, मनुस्मृतींत स्त्रियांची निंदा केली आहे कीं स्तुति? धर्म खरा कीं भौतिक शास्त्रें खरीं? ब्रह्म निर्गुण कीं सगुण? सृष्टीचा नियम स्वार्थ आहे कीं स्वार्थत्याग आहे? जग आनंदमय व प्रेममय आहे कीं, दुःखमय व कलहमय आहे? संसार आनंददायक आहे किंवा दुःखदायक आहे? दुःख उत्पन्न कर-ण्यांत ईश्वराचा हेतु कोणता असावा? जगांत अन्यायाचें वास्तव्य आहे काय? याप्रमाणें कादंबरींतील तात्त्विक चर्चा कोरड्या नसून त्यास मनुष्यस्वभावाचा व भावनांचा ओलावा मिळाल्यामुळें त्या मनोरम वाटतात. कादंबरींतील पात्रांनीं हिमालयाच्या सन्निध बसून गूढ विषयांवर जी चर्चा केली आहे तिचीं उन्नत शृंगें त्या नग-राजाच्या शृंगांशींही स्पर्धा करीत असावींशीं वाटतात; व ती चर्चा कर-णाऱ्या मनुष्यांचे देह जरी त्या प्रचंड देखाव्याच्या मानानें अगदीं क्षुद्र

वाटले तरी त्यांची बुद्धि त्या देखाव्यास पूर्णपणें शोभण्यासारखी विशाल आहे, असा विचार क्षणभर मनांत आल्यावांचून रहात नाहीं.

*                    *                    *

मराठी ललित-वाङ्मयांत ज्या नायिकांनीं वाचकांचीं किंवा प्रेक्षकांचीं हृदयें काबीज केलीं आहेत त्यांपैकींच रागिणी ही एक आहे. तिनें भय्यासाहेबांशीं केलेलें प्रेमळ वर्तन, त्यांच्या विरहांत तिनें आचरलेलें कडक व्रत, तिनें आपल्या सासऱ्याच्या वाक्‌ताडनास न जुमानतां त्याची केलेली एकनिष्ठ सेवा, आनंदरावाबद्दल असलेलें तिचें निर्मळ प्रेम, उत्तरेबद्दलचा तिचा निर्व्याज स्नेहभाव, फार काय पण जनुभाऊसारख्या दुष्टासंबंधानें सुद्धां तिनें दाखविलेलें क्षमाशीलत्व—सारांश, तिच्या स्वभावाच्या कोणत्याही अंगाचा विचार केला तरी तें हृदयंगमच वाटतें.

*                    *                    *

उत्तरेचा मानी, कडक, कांहींसा गर्विष्ठ पण सरळ, मोकळा व प्रेमळ स्वभाव कर्त्यांनीं फार चातुर्यानें रेखाटला आहे.

*                    *                    *

वामनरावांची दृष्टि विशेषेंकरून अंतर्मुख असल्यामुळें बाह्य वस्तूंचें विशेष तपशिलवार वर्णन प्रस्तुत कादंबरींत फारसें दिसलें नाहीं. पण पात्रांच्या अंतरंगांचीं उत्तम शब्दचित्रें बरींच सांपडलीं.

रागिणी व आनंदराव यांचें परस्परांवर प्रेम आहे असा उत्तरेचा ग्रह होतो. तेव्हां ती त्या गोष्टीचें खापर एकट्या रागिणीच्याच डोक्यावर फोडते, आनंदराव तिच्या मोहजालास बळी पडले या पलीकडे तिला त्यांचा कांहींच दोष दिसत नाहीं, हें मानवी स्वभावांतील एका विलक्षण विरोधाचें प्रत्यंतर आहे व तो विरोध दाखविण्यांत कर्त्यांनीं मानवी स्वभावाचें मार्मिक ज्ञान प्रकट केलें आहे.

प्रस्तुत कादंबरींत कलेच्या दृष्टीनें आम्हांस एक मोठा दोष दिसतो, तो हा कीं, हिच्या प्रथम खंडानें हिच्यांतील प्रमुख पात्रांसंबंधानें जो अनुकूल ग्रह होतो तो पुढें पुढें नाहींसा होत जातो. भय्यासाहेबांची नीतिमत्ता पहिल्या खंडांत बऱ्याच उच्च प्रतीची असावीशी वाटते. पण पुढें त्यांचा स्वभाव चंचल, खोटा व निष्ठुर दिसून येऊन त्यांच्यासंबंधानें मन विटून जातें. रागिणीसंबंधानें फार अल्प प्रमाणावर कां होईना, असाच प्रकार घडला आहे. प्रथम खंडांत जीं पात्रें तत्त्वज्ञानाच्या मोठमोठ्या गप्पा मारतात तीं द्वितीय खंडांत असूयाक्रोधादि भावनांनीं बेभान व पोरकट झाल्यासारखीं दिसतात ! तृतीय खंडांत त्यांजवर संकट आलें असतां त्यांची मुक्तता किनरीसारख्या रानटी मुलीकडून व टिल्लूसारख्या अडाणी गड्याकडून होते ! तत्त्वज्ञानाचा व्यवहारांत कांहीं उपयोग नाहीं असें दाखविण्याचा प्रस्तुत तत्त्वज्ञानी ग्रंथकर्त्यांचा उद्देश असेल असें वाटत नाहीं. प्रस्तुत कादंबरींतील पात्रें तात्त्विक विचारांचीं असल्यामुळें तिचा प्रवाह अधिक शांतपणें चालावयास पाहिजे होता.

भय्यासाहेब केवळ स्वतःच्या सुखाची पर्वा बाळगून इतरांच्या सुखास लाथाडणाऱ्या, प्रथम एका कोमल मनाच्या अबलेच्या विवाहपाशानें मुसक्या बांधून नंतर तिला विरहाग्नींत होरपळावयास लावणाऱ्या, आपल्या पत्नीस व सोयऱ्याधायऱ्यांस आपल्या शोधार्थ वणवण करावयास लावून त्यांच्याशीं लपंडाव खेळणाऱ्या, सारांश, माणुसकीच्या साध्या तत्त्वांचीही ओळख नसलेल्या भय्यासाहेबांचा मोक्षावर कसा हक्क पोहोंचतो व त्याच्या साधनाकरितां त्यांनीं धडपड कां करावी, हें मुळींच कळण्यासारखें नाहीं. प्रस्तुत कादंबरींत जनुभाऊ व बोधस्वरूपस्वामी आहेत, म्हणून भय्यासाहेबांचा कांहीं तरी बोज राहिला आहे. ते नसते तर नीचपणांत त्यांचाच पहिला नंबर लागला असता.

भय्यासाहेबांचा स्वभाव कर्त्यांनीं इतका लहरी व बेपर्वा दाखविला आहे कीं, त्यांची परमार्थपर प्रवृत्ति पुन्हां उचल खाऊन तिला विरहांत ढकलणार नाहीं अशी हमी वाचकांस घेतां येत नाहीं. भय्यासाहेबांचा स्वभाव कर्त्यांनीं अधिक विश्वसनीय दाखविला असता तर वाचकांच्या मनांत हें किल्मिष रहाण्याचें कारण नव्हतें. बाकी दुःखपर्यवसायी कादंबऱ्यांच्या अंतीं त्यांतील प्रधान व्यक्तींच्या चरित्रां-बद्दल वाचकांची जी निश्चयात्मक भावना असते तशी आनंदपर्यव-सायी कादंबऱ्यांच्या शेवटीं असणें शक्य नाहीं; व पूर्वोक्त कादंबऱ्या कलेच्या दृष्टीनें उपरोक्त कादंबऱ्यांपेक्षां श्रेष्ठ मानण्यांत येतात याचें हें एक प्रमुख कारण आहे.

आनंदरावांस शोधाबद्दलच्या हौशीपेक्षां संकटांत पडण्याची व त्याचें प्रदर्शन करण्याची हौसच विशेष दिसते. या धाडसी वीराला उत्तरेच्या जिभेची मात्र इतकी भीति वाटते कीं, ते तिच्यापुढें फिक्के पडण्याच्या धास्तीनें तिच्याशीं लग्न करण्याचा विचारच अजिबात सोडून देतात ! ते स्वतःशीं म्हणतातः—‘ घरांत मी उत्तरेचें ऐकेन, फार काय, तिच्या पायांही पडेन; पण बाहेर तरी तिनें मला जरा भ्यायलें पाहिजे व माझ्या उत्तराला उत्तर देतां कामा नये. ’ घरांत बायकोच्या पायां पडून बाहेर लोकांदेखत तिजवर हुकमतीचें ढोंग करणाऱ्या या बहादरांना हंसावें कीं त्यांची कींव करावी हेंच कळत नाहीं.

रागिणी या कादंबरींतील नायिकेचें चित्र इतकें सुंदर झालें आहे कीं मराठी ललितवाङ्मयांतील नायकांत तिला अग्रस्थान द्यावें लागेल. या कादंबरींत कर्त्यानें मनुष्यस्वभावाचें बरेंच मार्मिक ज्ञान दाखविलें आहे. हिच्यांत हिमालयाचें व भागीरथीचें जसें दर्शन होतें, तत्त्वज्ञान व काव्य, गांभीर्य व विनोद यांचाही मनोहर संगम

पहावयास सांपडतो. या कादंबरीची भाषा प्रौढ पण सुगम, साधी पण सुंदर असून अर्थव्यक्तिक्षम आहे. कथानकाचा ओघ मधून मधून तात्त्विक चर्चारूप पाषाणांमुळें त्रुटित झाल्यासारखा जरी किंचित्काल वाटला तरी त्यामुळें त्या ओघास म्हणण्यासारखें विघ्न न होतां उलट त्यास वेगच आलेला आहे. जे वाचक ललितवाङ्मयांतील प्रत्येक कृतीपासून बोधाची अपेक्षा करितात त्यांस उपयुक्त बोध घेण्यासारखींही अनेक स्थळें या कादंबरींत आढळतील. सारांश, या कादंबरीच्या नायकानें लग्नापूर्वी नायिकेविषयीं जे उद्गार काढिले तेच प्रत्येक रसिक या कादंबरीचा रसास्वाद घेतल्यानंतरही काढील:—" रागिणीची संगति गंगेसारखी, साधुसंगतीसारखी, कविसंगतीसारखी मला पावन वाटते !"

रागिणीचा जो हिन्दी अनुवाद पं. हरिभाऊ उपाध्याय यांनीं केला आहे त्याच्या भूमिकेंतील एक सुंदर उतारा येथें दिल्यावांचून राहवत नाहीं:—

" इस उपन्यासमे आधुनिक शिक्षित–समाजका चित्र अंकीत किया है। उनमे सभी मुख्य पात्र सुशिक्षित है। सभीकी आकांक्षायें महत् है। उनके वादविवादसे उनकी ज्ञान–गरिमा प्रकट होती है। हम उनके एक स्त्री पात्र–उतारा–की प्रगल्भतासे चकित हो जाते है; परंतु इस शिक्षा और ज्ञान–गरिमाके भीतर हम मनुष्य-स्वभावकी दुर्बलता देखते है और तब हमें यह प्रकट हो जाता है कि पुरानेका पतन भले ही हो और उसके स्थानमें नयेका आगमन भी हो, परन्तु मनुष्य स्वभाव नहीं बदलता। ईर्षा, द्वेष, क्रोध और मोह मनुष्यके लिये उतने हो स्वाभाविक है जितने प्रेम, दया, दाक्षिण्य और सेवा। इन्हींके पारस्परिक द्वंद्वयुद्धसे मनुष्य-जीवनका विकास होता है। यही बात हम इस उपन्यासमें देखते है। ग्रन्थकारने जगह

जगह अपने पात्रोंसे बडी लम्बी--चौडी बातेंमी कहलायी है, परन्तु उनके दैनिक जीवनमें उनकी दुर्वलता प्रदर्शित कर दी है। यही उनकी निपुणता है। रागिणीको पढनेपर हमे सबसे अधिक प्रसन्नता यह देखकर हुई इसके सभी पात्रोंमें मनुष्यत्व है।"

---

## नलिनी

"नलिनी ही 'रागिणी'ची धाकटी बहीण आहे आणि ती नकटीही आहे असें कांहीं लोक म्हणतात, तेव्हां तिचें जीवित कठीण होण्याचा बराच संभव आहे. तेव्हां विनंति एवढीच कीं, केवळ लोकवार्तेवर रसिकवर्गानें विश्वसून 'नलिनी'ची अवहेलना करूं नये." अशी विनवणी कादंबरीकारांनीं रसिकवर्गास उद्देशून केली आहे. ती मनधरणी करण्याचा मूळ हेतु हाच कीं, सूर्यप्रकाशाच्या तेजोमय उज्ज्वलतेंत चंद्राची शीतल कौमुदी केव्हांही निस्तेज व निष्प्रभच वाटणार, या न्यायानें रागिणीच्या जोडीनें आणि तुलनेनें नलिनी ही फिक्कीच पडणार याबद्दल लेखकाचें आणि वाचकांचें दुमत नाहीं, परंतु नलिनीचें निरीक्षण स्वतंत्र आणि तिच्या पुरतेंच मर्यादित व्हावें, व त्याच दृष्टीनें तिची यथायोग्य किंमत ठरविण्यांत यावी. ज्यांनीं रागिणी वाचली आहे त्यांची नलिनीवरील टीका पूर्वग्रहदूषित असण्याचा कदाचित् संभव आहे. परंतु ती तशी असेलच असा ग्रह करून घेण्याचें कारण नाहीं. एखाद्या अष्टावधानी टीकाकाराला एकाद्या कादंबरीचें अगदीं तिच्यापुरतेंच संकुचित निरीक्षण करतां येणार नाहीं असें नाहीं. केवळ ग्रंथकर्त्यानें रसिकांस उद्देशून केलेल्या विनंतीचा अर्थविपर्यास होऊं नये म्हणून हें दिग्दर्शन करावें लागलें. असो.

नलिनी कादंबरींत १९०८ साल आणि त्याच्या दरम्यानच्या काळांतील प्रसंगांचें, मनोभावनांचें, खळबळीचें व आकांक्षांचें, चित्तवेधक शब्दचित्र रेखाटलें आहे. सबंध कादंबरींत एकाच विचाराचा एकच एक धागा अनुस्यूत आहे. ही गोष्ट सबंध कादंबरी संपविल्याखेरीज ध्यानांत येत नाहीं. सूत्र एक असलें तरी माण निरनिराळे असूं शकतात. त्याप्रमाणें येथें एकाच विचारप्रवाहांत निरानिराळ्या प्रसंगांचे भोंवरे निर्माण केले आहेत. पूर आलेल्या नदीच्या प्रवाहांत आरंभीं जरी पुष्कळ भोंवरे दिसले तरी ते वाढत वाढत जाऊन शेवटीं सर्व एकांतच विलीन होतात. त्याप्रमाणें ह्या कादंबरींतील सर्व प्रसंगांचें एकाच विचारप्रवाहांत एकीकरण झालें आहे. त्या विचारप्रवाहाचें स्वरूप कादंबरींतील शब्दांत असें सांगतां येईल:—

"रंगराव म्हणाले कीं, माझे आणि वसंताचे मनांत लहानपणापासून देशभक्तीचें वारें होतें. आणि त्यांत विनायकरावांच्या जहालपणाची भर पडल्यामुळें आमच्या जीविताचें तारूं भलतीकडेच वाहूं लागलें. स्वदेशाची सेवा करण्याच्या हेतूनें आम्ही घरांतल्याशिवाय दुसरें एक पिस्तुल मिळविलें, डोंगरावर जाऊन नेम धरण्यास शिकलों, वेळीं प्रसंगीं विद्या उपयोगी पडेल म्हणून रात्रीं अपरात्रीं डोंगरावरून धांवण्याचा अभ्यास केला. दोन दोन मैल समुद्रांत पोहण्याची संवय केली आणि याच प्रकारच्या अनेक बारीकसारीक गोष्टींत वाकबगार झालों." कार्याच्या ह्या दिशेवरून विचारसरणीची दिशा कोणती होती याचें अधिक स्पष्ट दिग्दर्शन करण्याचें कारण नाहीं.

ह्या कादबरींत अद्भुतरमणीयता, रहस्यप्रियता आणि सृष्टिवर्णनांचें मनोहारित्व या गोष्टी प्रामुख्यानें डोळ्यांपुढें येतात. पात्रांच्या संभाषणांच्या द्वारें कादंबरीचा विकास झालेला नसून प्रत्यक्ष क्रियेच्या

रूपानें तो दाखविण्यांत आलेला आहे. आणि प्रसंग जरी चार दोन निरनिराळे दाखविलेले असले तरी वाचकांचें कुतूहल पहिल्याच प्रमुख प्रसंगावर वेधलें जातें. गुप्त पोलिसांची अद्भुत सृष्टि, गूढ रहस्यांची पहिल्यापासून दाखविण्यांत आलेली धुमश्चक्री आणि एकंदर जिज्ञासा-संक्षोभक व रहस्यमय वातावरण यांमुळें या कादंबरीला जरी एकाद्या रहस्यकथेचें ( Detective Tale ) स्वरूप आल्याचें सकृद्दर्शनीं दिसत असलें तरी ही कादंबरी 'रहस्यकथा' नाहीं हें सांगणें आवश्यक आहे. गूढ वातावरण उत्पन्न केल्यामुळें तिच्या ठायीं रहस्यकथेचा आभास व्हावा ह्यांतच कादंबरीकाराची खरी कला व्यक्त होते. खून-पिस्तुलसारख्या 'डिटेक्टिव्ह टेल 'ला आवश्यक असणाऱ्या आधारांवर ह्या कादंबरीची उभारणी केली असली तरी गुप्त पोलिसांच्या चातुर्यानें एकदम रहस्यस्फोट करून वाचकांचा कुतूहलमेरु जमीनदोस्त करावयाचा, एवढ्याच गोष्टीच्या व्यामोहानें ग्रंथकर्त्यानें ह्या कादंबरीची रचना केलेली नाहीं. ग्रंथकाराचा १९०८ सालांतील तरुणांच्या अंतर्मनांत चाललेल्या राष्ट्रीय विचारतरंगांचा चित्रपट रंगविण्याचा हेतु असावा असें स्पष्ट दिसतें आणि कादंबरींतील एक दोन पात्रें प्रत्यक्ष सत्यसृष्टींतील जिवंत व्यक्ति आहेत ही गोष्ट लक्षांत घेतां वरील विधानाला दुजोराच मिळतो. यदृच्छया घडलेल्या प्रसंगांचा उपयोग मोठ्या कौशल्यानें कादंबरीकारांनीं केलेला पाहून त्यांच्या कलेबद्दल प्रशंसेचे उद्गार वाचकांच्या तोंडून सहजगत्या निघाल्यास नवल नाहीं.

ह्या कादंबरींत वर्णनांची विपुलता दृष्टीस पडते. लेखकाचा कल एकंदर वर्णनें कमी करण्याकडे जसा पुढील कादंबऱ्यांतून दिसून येतो तसा यांत मुळींच दिसून येत नाहीं. उलट भरपूर वर्णनें हें ह्या कादंबरीचें वैशिष्ट्यच होय असें म्हटलें असतां चालेल. कादंबरींतील सृष्टिवर्णनांची कुचेष्टा प्रो. जोशी यांनीं " सुशिलेचा देव " या

कादंबरींत दुसऱ्या प्रकरणाच्या सुरुवातीस केली आहे. नलिनींतील कांहीं कांहीं वर्णनें इतकीं वस्त्वादर्शी ( Realistic ) झालीं आहेत कीं, इतका ‘ निर्वस्त्र यथादर्शीपणा ’ किंवा ‘ अनावृत सत्यप्रदर्शन ’ ( Nude realism ) आपल्या वाङ्मयांत वास करूं लागणें सद्-भिरुचीला कसेंसेंच वाटतें. निरुपाधिक सौंदर्याकुलतेच्या रसोद्दीपनाच्या व कलोन्मेषाच्या भरांत कादंबरीलेखक आपला लेखनसंयम विसरून जाऊन यथार्थ वर्णनांच्या प्रवाहांत वाहवत जातो. ह्या गोष्टीबद्दल साहित्याचार्य श्री. कृ. कोल्हटकर यांनीं ‘रागिणी’च्या परीक्षणांत खालील मार्मिक उद्गार काढले आहेत:—

“ सौंदर्याचें अत्यंत मार्मिक ज्ञान असणाऱ्या ग्रंथकर्त्यांकडून असा एकादा प्रमाद होण्याचें कारण केवळ अमर्याद कल्पनेचा उच्छृंखलपणा एवढेंच देतां येईल. ”

इतर सामान्य कादंबऱ्यांपेक्षां ही कादंबरी निराळ्या प्रकारची आहे. तिच्यांतील एकंदर वातावरण भावनाप्रधान नाहीं, तर रागिणीप्रमाणें बुद्धिप्रधान आहे. वाचकांना आपलीं तत्त्वें भावनेनें पटवून न देतां बुद्धिवादानें तीं त्यांच्या गळीं उतरविणें ही ह्या ग्रंथकर्त्याची स्वयंनिर्मित लेखनसरणी आहे. त्यांच्या तिन्ही कादंबऱ्यांतून हाच अनुभव येतो. ‘ सुशिलेचा देव ’ ही कादंबरी तर उघडउघड Rationalism ( विवेकवाद )चा पुरस्कार करीत आहे. आणि रागिणीचें वैकल्पिक नांवही तीच गोष्ट सुचवितें. ह्या ध्येयदर्शी व तत्त्वप्रधान कादंबऱ्या सुशिक्षित, सुसंस्कृत व अभिजात वाचकवर्गासाठीं लिहिलेल्या असतात. प्रो. जोशी यांची कादंबरी सामान्य जनतेच्या पसंतीला न उतरल्यास नवल नाहीं. ह्या कादंबरींतील मांडणी कशीही असो. तिच्यांतील एकंदर ओघ त्यांच्या इतर कादंबऱ्यांप्रमाणें तत्त्वदर्शी आहे ही गोष्ट खरी.

कादंबरीचें पहिलें प्रकरण वाचतांना वाचक भांबावून जातो आणि त्यांतील कशाचाच उलगडा न झाल्यामुळें बुचकळ्यांत पडतो, तद्वतच शेवटचेंही प्रकरण त्याला गोंधळून टाकल्याशिवाय रहात नाहीं. पहिल्याचा संबंध जवळजवळ शेवटीं येतो, तेव्हां कोठें त्याचा उकल होतो. वाचकांच्या अपेक्षेप्रमाणें कादंबरीचा शेवट होत नाहीं. पण जो होतो तो अनपेक्षित व असमाधानकारक वाटतो. नलिनी पुढें आलेल्या परिस्थितीमुळें भांबावून जाते आणि देहभान विसरून कांहींच न करण्याचें ठरविते. आणि कशाचाच मनासारखा शेवट न झाल्यामुळें वाचकाचा विरस होतो. सूज्ञ वाचकांच्या बुद्धिमत्तेवर कादंबरींतील पात्रांचें भवितव्य सोंपविणें म्हणजे एक प्रकारें आपली ' निर्णयभीरुता' प्रकट करणें होय. कादंबरीकरानें स्वीकारलेली ही सहेतुक मुग्धता कलासंयमाच्या व सूचकतेच्या दृष्टीनें कदाचित् समुचित व न्याय्य ठरेल, परंतु व्यवहाराच्या आणि सामान्य वाचकांच्या दृष्टीनें ती दूषणीय ठरण्याचा संभव आहे. Common Reader हाच खरा परीक्षक असतो, असा एक सिद्धांत असल्यामुळें त्याचें मत उपेक्षितां येत नाहीं. ह्या कादंबरीचा हेतु काय असावा याचा ऊहापोह करतांना आमचे मित्र श्रीयुत लक्ष्मणदास माधवदास यांनीं जो मुद्दा मांडला आहे तो मननीय आहे. ते म्हणतात:—

"हें चित्र रेखाटण्यांत वामनरावजींचा काय हेतु व्यक्त होतो? क्रांतिकारक चळवळ ही फक्त कांहीं भावनाप्रधान तरुणांना कुमार्गास व अत्याचारास प्रवृत्त करते आणि अखेर तिचा देशास कांहीं एक उपयोग न होतां त्या तरुण लोकांच्या मौल्यवान् आयुष्याची व त्यांच्या घरादारांची राखरांगोळी होते, हेंच तत्त्व वामनरावांना शिकवावयाचें होतें कीं काय? विनायकराव, रंगराव व वसंतराव हे तिघेहि क्रांतीचे उपासक. परंतु बऱ्याच विचारांतीं या तिघांनींही ही चळवळ बंद

ठेवण्याचें ठरविलें. मग त्याचें कारण परिस्थिति प्रतिकूल झाली म्हणा अगर क्रांतिकारक मार्गाच्या यशस्वितेबद्दल त्यांचा विश्वास कमी झाला म्हणून म्हणा. कांहींही असलें तरी ग्रंथकारास क्रांतिकारक चळवळीचा ग्रंथ आटोपतां घेणें इष्ट आहे असेंच सांगावयाचें दिसतें. क्रांतिकारक चळवळीमुळें स्वतःचा व त्याबरोबर कुटुंबाचाही परिणामीं नाश होतो असें दाखवावयाचें आहे, असें गृहीत धरल्यास क्रांतिकारक पुत्राच्या हातून अगदीं चुकून आपल्या वडिलांचा खून करवून—त्यामुळें सर्व कुटुंबावर दुर्धर प्रसंग ओढवला, त्यापेक्षां एखाद्या 'गोऱ्या'चा प्रत्यक्ष खून करवून परिणामीं ही चळवळ कशी फोल ठरणार याचें चित्र दाखविलें असतें तर वामनरावजींचा प्रयत्न अधिक चित्ताकर्षक व उद्बोधक झाला असता." ['नलिनी'चें परीक्षण.]

परंतु 'खावयाचे दांत वेगळे आणि दाखवावयाचे वेगळे' या न्यायानें केवळ कलाविलासाच्या भरीं पडून वामनरावांनीं कादंबरीचा हेतु एक आणि स्वरूप दुसरेंच, असें जें दाखविलें आहे तो त्यांचा दोष नसून रचनावैशिष्ट्याचा एक गुणच आहे असें म्हणावें लागतें. कारण सामान्य वाचकाचा अपेक्षाभंग करणें हें तर कादंबरीकाराचें एक लक्षण आहे. नलिनींतील अप्पासाहेबांचा खून, किंवा त्या खुनाचा प्रकार, खुनी माणसाचें रहस्य, विनायकरावांच्या कारागृहवासाचा आकस्मिक प्रसंग वगैरे गोष्टी सामान्य वाचकाच्या दृष्टीनें अकल्पित व अनपेक्षित आणि म्हणूनच अगम्य असल्यामुळें ग्रंथकर्त्याचा त्यांच्यावर एक प्रकारें विजयच होतो. आणि ह्या विजयांतच कादंबरीकाराच्या कर्तृत्वाचें रहस्य सांठविलेलें असतें असें आपण कां म्हणूं नये ?

ज्या गोष्टींच्या योगानें नलिनी इतर सर्वसामान्य कादंबऱ्यांपेक्षां वरच्या प्रतीची आणि उच्च भूमिकेवरील वाटते त्या गोष्टी म्हणजे तिच्यांत उपस्थित केलेले दोन 'नैतिक लढे' या होत. पहिला लढा—लढा

म्हणण्यापेक्षां त्याला 'अंत:कलह' म्हणणें अधिक उचित होईल—आवडीच्या पुढें आलेल्या परिस्थितीनें उत्पन्न केला आहे. आवडीचा नवरा फरारी झाला असल्याची दाट वदंता असतांना तिची शारीरिक स्थिति संशयास्पद दिसूं लागते आणि त्याबाबत एक गुप्त पोलीस तिची जबानी घेतो. सबंध कादंबरींत हा प्रसंग वाचकाचें सर्व लक्ष वेधून घेणारा आणि त्यास विचारप्रवृत्त करणारा आहे. आवडीचा नवरा खरोखरच बेपत्ता झाला असला तर तिनें अविचार केला असें सिद्ध होतें. नसल्यास तिच्या नवऱ्याचा ठावठिकाणा तिला माहीत असला पाहिजे. पोलिस अधिकाऱ्याचा असा अंदाज कीं आपण तिच्यावर व्यभिचाराचा आरोप केला तर तिनें व्यभिचार केला असला आणि केला नसला तरीहि ती आर्यस्त्री नवऱ्याचेंच नांव सांगेल—"व्यभिचार करणें एका दृष्टीनें सोपें आहे, परंतु 'मी व्यभिचार केला' हें कबूल करणें ब्रह्मवेत्त्या स्थितप्रज्ञाला सुद्धां क्षणभर कठीणच वाटेल—" आणि त्या योगें विनायकरावाचा सहजच सुगावा लागेल. परंतु त्याची कल्पना चुकली. तिच्या मनांत नीति—अनीति, सत्यासत्य इत्यादि विरोधी विचारांचें काहूर माजतें, ती पवित्राचरणी व परमशुद्ध पतिव्रता होती तरी आपल्या नवऱ्याच्या रक्षणासाठीं स्वत:वर व्यभिचाराचा असत्यारोप ओढवून घेण्यास तिच्या मनांत मुळींच विकल्प येत नाहीं. तिच्या ह्या निर्णयधृष्टतेचें वाचकांस कौतुक वाटतें. असो.

दुसरा नैतिक लढा किंवा नीतिधैर्याचा प्रसंग कलंकितेशीं—भ्रष्ट कुमारिकेशीं विवाह करण्यासंबंधींचा आहे. परंतु ग्रंथकर्त्यानें रंगरावावर हा प्रसंगच (लोकापवादाच्या भयानेंच कीं काय?) येऊं दिला नाहीं. तेव्हां त्याबद्दल आपणालाही ऊहापोह करण्याचें कारण दिसत नाहीं.

कमलाबाईच्या अंत:करणांतील एक इच्छा वाचकांच्या पुढें विचारार्थ मांडून 'नलिनी'ची रजा घेऊं:—

"कादंबऱ्या वाचल्यामुळें आपल्या आयुष्यक्रमांत कांहींतरी धाडस, साहस, चमत्कृति किंवा काव्य असावें अशी तिला इच्छा होत होती. कौमार्य राखण्यांत भूषण केव्हां, तर कौमार्याचा भंग करण्याचा कोणीं प्रयत्न केला असून आपण तो सफळ होऊं दिला नाहीं तर, अशी तिची वेडगळ समजूत होती; आणि दोघां चौघांनीं आपणांला लग्न करण्याबद्दल विनंती करावी व एकदोघांनीं व्यभिचाराचाही प्रयत्न करावा पण तो आपण सफळ होऊं देऊं नये, अशी तिची इच्छा होती." (पान १२९–३०)

रागिणीप्रमाणें (भाग २–पान १५०) तिलाही आत्मप्रत्यय यावयाचा होता कीं काय ? पण तो आला नाहीं एवढेंच ध्यानांत ठेवण्यासारखें आहे.

---

## सुशीलेचा देव

ही कादंबरी वाचून परंपरेच्या प्रवाहांत पोहणाऱ्यांना विजेचा धक्का बसल्यासारखें वाटेल, लौकिक व्यवहारचक्रांत गुरफटलेल्यांना दिव्य दृष्टीचा लाभ होईल आणि युवकांच्या क्रांतिप्रिय अंत:करणांना चैतन्यमय तेजोदीप्ति हस्तगत झाल्यासारखें वाटेल. तिच्यांत कल्पनांचे ज्वालामुखी आहेत, विचारांचीं वादळें आहेत आणि नवजीवन देणारे स्फुल्लिंग आहेत. ही कादंबरी अगदीं नवीन प्रकारची, तेजस्वी आणि ध्येयदर्शी आहे. ती नवविचारप्रवर्तक असून मानवी ध्येयाचें प्रतिपादन करणारी आहे. 'क्रममार्ग' (Evolutionary process) त्याज्य ठरवून क्रांतिमार्गाचा उपदेश करणारी व मानवी जीवितांत नवचैतन्य उत्पन्न करणारी असें तिचें स्वरूप सांगतां येईल; व उद्बोधक, स्फूर्तिदायक आणि विचारसंक्षोभक असें तिचें वर्णन करतां येईल. मराठींत तत्त्वप्रतिपादक आणि ध्येयदर्शी कादंबऱ्या आधींच थोड्या; त्यांत 'रागिणी'सारख्या

अगदींच विरळा. ह्या कादंबरीचा परिवेष अगदीं निराळा असला तरी कलाविलासाच्या आणि ध्येयदिग्दर्शनाच्या दृष्टीनें ती ‘रागिणी’पेक्षां पुष्कळच सरस आहे. तिच्यांत मानवी जीविताचें अत्युच्च ध्येय काय असावें—मानवी प्रगतीची परिसीमा कोठपर्यंत—, त्याचें स्वरूप कसें असावें, आणि तें कोणत्या मार्गानें साध्य करून घेतां येईल, या गोष्टींची अत्यंत गंभीरपणें, व्यापक दृष्टीनें आणि उदात्त रीतीनें चर्चा केली आहे. कादंबरीच्या नांवावरून असें वाटतें कीं, तींत मुख्यत: ईश्वर-मीमांसा, आस्तिक्य व नास्तिक्य वादांचें विवेचन या गोष्टी असाव्या; आणि तेवढ्याच साठीं तिची रचना केली असावी. हा ग्रह जरी एका दृष्टीनें कादंबरी वाचल्यावर पूर्णपणें रहात नाहीं तरी त्या गोष्टींच्या ऊहापोहानें कादंबरीचा तीन चतुर्थांश भाग व्यापला आहे, ही गोष्ट खरी आहे. लेखकाला काय सांगावयाचें आहे, कोणतें नवीन तत्त्व प्रति-पादन करावयाचें आहे याचा उलगडा सुमारें पहिलीं तीस प्रकरणें झाल्यावर होतो. तोंपर्यंत लेखक निरीश्वरवादाची बाजू वाचकांच्या पुढें इतका बुद्धिवाद करून मांडीत आहेत कीं, वाचकाची आस्तिक्यबुद्धि (असल्यास) क्षणभर तरी डळमळल्याशिवाय रहात नाहीं. परंतु कादं-बरीच्या शेवटीं ह्या वादाचा मागमूसही रहात नाहीं आणि जो एक नवीन ध्येयवाद अकल्पितपणें उपस्थित होतो, त्या प्रवाहांत पहिला विचार-प्रवाह मिसळतो आणि दोन्ही प्रवाह एकरूप होतात. ‘समाजसत्तावाद आणि ईश्वर यांचा परस्परसंबंध हा’ ह्या कादंबरींतील एक वादस्तंभ (Problem) असावा असें दिसतें. त्याची चर्चा मागाहून करूं.

प्रथम ही कादंबरी क्रांतिकारक स्वरूपाची कशी आहे याचें थोडेंसें सोदाहरण दिग्दर्शन करूं:—

“मला तर असें वाटूं लागलें आहे कीं, सर्व समाज किड-लेला—सडलेला—rotten झालेला आहे. तो सुधारण्याला उपाय

म्हणजे पूर्वीची मूर्खपणाची धर्म' व्यवस्था ' व समाज' व्यवस्था ' मोडून टाकली पाहिजे. ( पान १५३)....हे धर्म कांहीं वाईट चाली-रीतींना व नामधारी समाजव्यवस्थेला पाठिंबा देऊन गरिबांच्या नाशाला कारणीभूत होत आहेत. " ( पान १४९ )

(२) " खाजगी मालमत्तेचीं, दिखाऊ धर्मश्रद्धेचीं आणि ढोंगी शिष्टाचारांचीं खुळें एकदां मोडलीं म्हणजे समाजाला सत्याची भाषा समजूं लागेल आणि ती भाषा तो वापरूं लागेल, आणि खऱ्या विचारविनिमयाचा, अन्योन्य साहाय्याचा आणि सात्विक उच्चतम आनंदोपभोगाचा मार्ग मोकळा होईल. " (सु. देव–' रत्नाकर '–पान ८०)

(३) " प्रथम-विवाहाला देखील मी व्यभिचारसंबंधीं म्हणेन,–जर तीं वधूवरें एकमेकांना अनुरूप नसतील, एकमेकांविषयीं त्यांना प्रेम किंवा आदर वाटत नसेल, तर !....ज्या स्त्रीपुरुषांना एकमेकांबद्दल अत्यंत तिटकारा आहे, एकमेकांची एकमेकांना अगदीं ओकारी येत आहे, त्यांनीं एकत्र राहून असल्या परिस्थितींत अपत्योत्पत्ति करणें म्हणजे तें पाप आहे, कारण तीं आपल्या वर्तनानें मुलांच्या जीविताची आणि नीतिमत्तेची राखरांखोळी करीत असतात. " ( पान १५६ )

(४) " देवपूजा ही देवाची मनधरणी आहे किंवा त्याला दिलेला लांच आहे. " ( पान ९४ ) " कागदाचा ताबूत किंवा मातीचा गणपति आपणच निर्माण करतों आणि मग पाण्यांत बुडवितों, त्याप्रमाणेंच आपण हरएक देव निर्माण केले आणि त्यांना आतां जलसमाधि देण्याची वेळ आली आहे. " ( पान १६९ )

कादंबरी चाळतां चाळतां सहज जे वेंचे सांपडले ते वर दिले आहेत. ह्या प्रकारचीं हवीं तेवढीं उदाहरणें सांपडतील. हीं मतें एका दृष्टीनें क्रांतिकारक नव्हेतच. आपणांला इष्ट असलेली सुधारणा कशी व्हावी याबद्दलचीं स्वतःचीं मतें सडेतोडपणें, बेदरकारपणें जर

एखाद्या विचारी मनुष्यानें मांडलीं तर त्या मतांना क्रांतिकारक म्हणतां येईल काय? लेखकाच्या मताचें प्रतिबिंब ह्या कादंबरींत स्पष्टपणें पडलें आहे हें सांगावयास नकोच.

कादंबरीच्या नायिकेची विचारक्रांति किंवा एक प्रकारें मनोविकास कसा झाला हें सूक्ष्मपणें अवलोकन केलें असतां विश्वकुटुंबवादाचा उदय अकल्पित झालेला नाहीं हें प्रत्ययास येतें. समाजसत्तावादाची (Socialism) मीमांसा अगदीं मुद्देसूद रीतीनें करण्यांत आली असून त्यावरील आक्षेपांना बरींच समाधानकारक उत्तरें देण्यांत आलीं आहेत. ही मीमांसा ह्या कादंबरीपेक्षां एखाद्या निबंधांत तीं अधिक खुलून दिसलीं असतीं असें म्हटल्यावांचून राहवत नाहीं. सर्वसाधारण वाचकांना आकलन होण्यास कठीण आणि पचण्यास जड अशा विषयांची चर्चा कादंबरींत यावी किंवा नाहीं हा वादाचाच प्रश्न आहे. रागिणींतील संवाद जरी पुष्कळसे तात्त्विक असले तरी ते ह्या कादंबरींतल्याप्रमाणें 'शास्त्रीय' नाहींत. कादंबरी हा अभिनयान्वेषी वाङ्मयाचा ललित प्रकार असल्यामुळें तींत असली शास्त्रशुध्द चर्चा रूक्ष व विरस करणारी वाटण्याचा संभव आहे. मात्र मधूनमधून सरस विनोदस्थळें आल्यामुळें रूक्षता बरीच कमी होते. जर ही चर्चा ह्या कादंबरींत समाविष्ट झाली नसती तर समाजसत्तावादावर मराठींत एका सुंदर पुस्तकाची भर पडली असती असें पुन्हां म्हणावेंसें वाटतें. मात्र ही चर्चा अत्यंत उद्बोधक आणि प्रत्ययोत्पादक अशी झाली आहे.

केवळ कादंबरी या दृष्टीनें तिच्या रचनेचें निरीक्षण करणें अधिक आनंददायक आहे. कारण ह्या कादंबरीची रचना अशी विलक्षण व निराळ्या धर्तीची आहे कीं, वाचक आश्चर्यानें स्तिमितच होऊन जातो. कादंबऱ्या लिहिण्याचे जे निरनिराळे प्रकार आहेत त्यांत एक आत्मचरित्र सांपडण्याचा बहाणा करून लेखक तें प्रकाशित करण्याचा

आव आणतो आणि स्वतः नामानिराळा राहून नुसता प्रकाशक म्हणून मिरवितो असा एक प्रकार आहे. ' सुशीलेचा देव ' ह्या कादंबरीची उभारणी ह्याच कल्पनेवर जरी प्रारंभीं केली असली तरी पुढें तींत पुष्कळ बदल होत जातो. सुशीलेनें आत्मचरित्र लिहिलें आहे असें लेखकाला ठाऊक असतें व तो तिच्याजवळ त्याची मागणी करितो. थोडे आढेवेढे घेतल्यावर ती त्याच्याकडून खरी हकीगत प्रसिद्ध करण्याचें अभिवचन घेऊन त्याला ती आत्मकथा देते. लेखक तिच्या चरित्राचा उपयोग करून घेऊन आपल्या कल्पनेनें तिच्या मानासिक स्थित्यंतरांचें चित्र काढण्याचा प्रयत्न करितो. तिच्या मनःस्थितीचें त्यानें केलेलें वर्णन जेव्हां तिच्या नजरेस पडतें, तेव्हां तिच्या दृष्टीनें त्यांतील कांहीं भाग चुकीचा व विपर्यासात्मक असल्यामुळें ती त्याला तो भाग रद्द करावयास लाविते. अशी कुचंबणा झाल्यावर लेखक निरुपायानें तिच्या आत्मचरित्रांतील उतारे देऊन स्वतःची बाजू सांवरतो. व तिचें सत्य चरित्र वाचकांना समजावें यासाठीं एवढा कमीपणा घ्यायला त्याला कांहीं विषाद वाटत नाहीं. उलट तिनें आत्मकथन केल्याबद्दल लेखक तिचे आभारच मानतो ( रत्ना. पान ८८ ). ग्रंथकार बरींच वर्षें तिच्या ओळखीचे आहेत. तिचें अलीकडील कांहीं वर्षांचें अंतरंग त्यांना चांगलें माहीत आहे. शिवाय सुशीलेच्या चरित्रांतील बऱ्याच भागाशीं लेखकांचा कांहीं प्रसंगीं संबंध आलेला आहे. लेखकांना कल्पनाशक्ति आहे तरी ते पुष्कळच घसरले आहेत असें खुद्द सुशीला उद्गार काढते. तिच्या आत्मकथेचा उपयोग करून घेऊन लेखक आपल्या कल्पनेप्रमाणें कथानक रंगवूं लागतो. सुशीला मधून मधून स्पष्टीकरणात्मक टीपाही जोडते. ( पा. ५४ व ८५ ) नंतर लेखक वर्तमानपत्रांतील उतारे देतो. तसेंच सुशीला वगैरेंचीं पत्रें जशींच्या तशीं देण्यांत लेखक सत्यकथाभास निर्माण करतो. आणि

आपली कथा कपोलकल्पित नाहीं हें दाखविण्याचा त्याचा प्रयत्न चालूंच असतो. आतापर्यंत लेखक अगदीं त्रयस्थाप्रमाणें दूर दूर राहून कथानक निवेदन करीत असतो. त्यांत जसा कांहीं त्याचा संबंध नाहीं असा तो तिऱ्हाईतपणाचा आव आणतो. पण अखेर त्याचा तटस्थपणाचा तोल सुटतो आणि तो कथानकाच्या प्रवाहांत बेभानपणें सांपडतो. सुशीलेचें व्याख्यान सुरू असतें आणि त्यांत ती ' ध्येय हाच देव ' हें प्रो. वा. म. जोशी यांनीं ' रत्नाकारां'त प्रतिपादन केलेलें तत्त्व लेखकाचा उल्लेख न करतां उच्चारते. त्यावर लेखकाचा उल्लेख कां नाहीं अशी एकच आरोळी उठते. त्यावर त्या सभेला कर्मधर्मसंयोगानें हजर असलेले वा. म. जोशी उठून सांगतात कीं, त्या लेखांतलीं मतें माझीं नसून, मी तीं सुशीलाबाईपासून कांहीं अंशीं घेतलीं आहेत. ( रत्नाकर--पान ८८ ) अशाप्रकारें लेखक स्वतःच उत्पन्न केलेल्या कादंबरीसृष्टींत एकरूप होतात. शेवटीं सुशीलेला विलायतेस जातांना निरोप द्यायलाही ते जातीनें हजर असतात; आणि तिचें ' शुभास्ते पंथानः ' असें अभीष्टचिंतन करून कादंबरीचा शेवट करतात. अशी ह्या कादंबरीची चमत्कृतिपूर्ण रचना आहे.

लेखक स्वयंनिर्मित कल्पनासृष्टीशीं तादात्म्य पावल्याचीं हजारों उदाहरणें सांपडतील, परंतु स्वतःच्या व्यक्तित्वाचा अलगपणा विसरून लेखक आपल्या कादंबरींत पात्ररूप झाल्याचें उदाहरण फारच क्वचित् पहावयास मिळेल.

ह्या कादंबरीच्या रचनेवरून दोन तीन सिद्धांत निघूं शकतातः——

( १ ) ही कादंबरी लेखकाचे स्वमताविष्करणाच्या दृष्टीनें अंशतः आत्मचरित्र आहे.

( २ ) सुशीलेचें नुसतें नांव पुढें केलें आहे, बाकी तिच्या तोंडीं घातलेलीं मतें लेखकाचींच आहेत; पण तीं त्याला सर्वतोपरी

मान्य नसल्याचा तो आविर्भाव करीत आहे (रत्ना.–पान ८९); सुशीला आणि लेखक यांच्यांत अभिन्नता आहे, आणि भिन्नता दाखविण्याचा लेखकाचा प्रयत्न फोल आहे; लेखकांनीं क्षणभर परकायाप्रवेश केला आहे.

( ३ ) लेखकाचा कादंबरीच्या रंगभूमीवर प्रत्यक्ष प्रवेश होण्यापूर्वीं तो दुसऱ्या कोणत्या तरी वेषांत वावरत असावा असें वाटतें. कारण त्याचा तोंडवळा कादंबरींतील एका पात्राशीं हुबेहूब जुळतो. त्याच्या स्वभावाचें सुशीलेच्या एका मित्राबरोबर साम्य असावें असा दाट संशय येतो. आणि वर उल्लेखिलेल्या दोन कारणांवरून ह्या शंकेला अधिकच पुष्टी मिळते.

ही कादंबरी लेखकाचें अंशत: आत्मचरित्र आहे, असें वर दिसून आलेंच आहे. तींत लेखकाच्या विचारप्रवृत्तीचा विद्युत्प्रवाह कोणत्या दिशेनें वाहत आहे हें स्पष्ट दिसतें. आपल्या ठायीं उदित झालेल्या नूतन सृष्टीची नवी दृष्टी वाचकांना देण्यासाठींच ही अवतरली असावी अशी शंका येते. या दृष्टीनें पहातां ‘सुशीला’ ही ‘रागिणी’चा ‘नवावतार’ असें वाटल्यावांचून रहात नाहीं.‘वाङ्मयांत उत्तमोत्तम म्हणून नांवाजलेलीं पुस्तकें बहुधा कर्त्याच्या सौंदर्यबुद्धीनें सुव्यवस्थित केलेलीं आत्मचरित्रेंच असतात.” असें जें श्रीपाद कृष्ण कोल्हटकर म्हणतात त्याचा येथें प्रत्यय येतो. लेखक आपल्या कादंबरींतील पात्रांचें स्वभावाविष्करण करतां करतां न कळत त्या पात्रांशीं तादात्म्य पावून आत्मस्वभाव दिग्दर्शन करून जातो आणि स्वत:चीं मतें व स्वत:चे विचार त्यांच्या तोंडीं घालतो. लेखकाला ही आत्मविस्मृति पडते याचें कारण स्वत:ची मतें प्रकट करण्याबद्दल त्याच्या अंतर्मनांत धडपड चाललेली असते. आणि तो कलाविलासाच्या मिषानें आत्मगूहन करावयास पहातो. ‘दुटप्पी कीं दुहेरी’, ‘प्रेम कीं लौकिक’, या कादंबऱ्यांतून त्या त्या

लेखकांचीं आत्मचरित्रें अप्रत्यक्षपणें समाविष्ट झालीं आहेत अशी ग्वाही प्रो. वामनराव जोशी त्या कादंबऱ्यांचें परीक्षण करतांना निःशंकपणें देतात. तर ह्या कादंबरींत आपलें आत्मचरित्र नाहीं हें दाखविण्याचा त्यांचा प्रयत्न कसा सफल होणार ? आणि त्यावर विश्वास कोण ठेवणार ?

सुशीलेच्या ' देवा 'संबंधींच्या कल्पनेचा विकास कसा झाला हें पाहणें मनोरंजक आहे. तिच्या अगदीं बाळपणापासूनच तिला ' देव-बाप्पा'चा धडा मिळतो. लहानपणापासूनच तिला देवाचें अस्तित्व पटूं लागतें ( पान ३१ ). तांबड्या दगडाला फुलें वाहण्यांत तिला खरी देवभक्ति वाटूं लागते. ( पान ५० ) ' पण ह्या दगडांत देव नव्हताच मुळीं ' असें बाळूच्या व सुनंदाच्या कुचेष्टेनें तिचें तिला वाटूं लागलें. तिला तें पटतें ( पान ५२ ). सुशीलेच्या मत-परिवर्तनाचें बीज येथें सांपडतें. तिच्या मंगळागौरीची, तुळशीला पाणी घालण्याची, जेव्हां गिरिधररावांकडून चेष्टा होऊं लागते तेव्हां ' झाडांत कसला आहे देव ? ' असें तिला वाटतें. ' देवपूजा ही देवाची मनधरणी आहे किंवा त्याला दिलेला लांच आहे ' हें त्यांचें म्हणणें तिला खरें वाटूं लागतें. ( पान ९४ ). माणसांसारखेच पण त्यांच्याहून उच्चतर कोटींतले आणि आकाशांत राहणारे असे लहान-पणचे देव जाऊन त्यांच्या जागीं ' पति हाच देव ' असें तिला वाटूं लागलें होतें ( रत्नाकर–पान ४५ ). पण पुढें हा देवही देव नव्हे असें तिच्या मनांत येऊं लागलें. तिच्या दृष्टीनें देव नाहींसेंच झाले आणि त्यांना जलसमाधी देण्यास ती तयार झाली ( रत्ना. ५८ ). आणि शेवटीं ' ध्येय हाच देव ' असे प्रतिपादन करूं लागली. आणि तिनें देवाच्या अस्तित्वाचें साधार खंडण केलें. ( रत्ना. ८८ ). ह्याप्रमाणें तिच्या देवविषयक कल्पनांचा विकास आहे.

देवाची कल्पना मनुष्यानें आपल्या समाधानाकरितां उत्पन्न केलेली आहे किंवा मनुष्यावरील आपत्तींनीच देवाला जन्म दिला असेंही म्हटलें असतां चालेल. ' विश्वकुटुंबी संस्था ईश्वरवादी नाहीं किंवा निरीश्वरवादीही नाहीं. ' ( रत्ना, ७७ ). कारण इश्वराची जरुरी काय ? गरजा नाहींत, आपत्ति नाहींत, किंवा निराशाही नाहीं. विश्वकुटुंबी लोक ध्येयपूजक आणि मनुष्यस्वभावाविषयीं अशावादी असतात, तेव्हां त्यांना देवाची आवश्यकता काय ? तो असला आणि नसला काय सारखाच. इतर लोक निराशावादी म्हणूनच देवावर विश्वास ठेवतात. मनुष्य कांहीं उच्चतम गोष्टी करणार नाहीं, देवानें त्या त्याच्याकरितां करावयाच्या, किंवा त्याच्याकडून करवावयाच्या असें त्यांचें तत्त्वज्ञान ! स्वतः कांहीं न करितां देवावर ओझें टाकण्याची परावलंबनाची वृत्ति ! विश्वकुटुंबी लोक मनुष्यप्रयत्नांवर विश्वास ठेवितात. इतकेंच नव्हे तर मनुष्य हा स्वप्रयत्नानें देव होऊं शकेल. पुढची पिढी हाच खरा देव—देवनिर्माण करणें आपल्या हातांत आहे——त्या पिढीला आतांपासूनच चांगलें वळण दिल्यास ती पूर्णत्वाला पोहोंचेल, म्हणजे देवस्वरूप पावेल. कारण पूर्णता म्हणजेच देव. पूर्वीच्या युगांत देव मनुष्यांवर अंमल चालवीत असें. आतां माणसें देव होऊं पहात आहेत. त्यांचीं तीच आत्मोन्नति करूं शकतील. असो.

' सुशीलेचा देव ' या कादंबरीनें जो संदेश दिला आहे. त्याचें मनन करून आपण तिची रजा घेऊं. तिचा संदेश :—

" समाज आणि व्यक्ति यांतलें द्वैत नष्ट झाल्यामुळें मालक आणि नोकर, माझं काम आणि तुझं काम, हा भेदच जेव्हां रहाणार नाहीं, सगळीं कामें आपलीं, जें कांहीं होत आहे तें आपलं असें प्रत्येकाला वाटायला लागेल, आणि जो तो जें येईल तें काम आपलं, असं समजून तें उत्तम रीतीनें, सुंदर रीतीनें करील ( आणि पुन्हां तें आनं-

दानें, हौसेनें करील ), तेव्हां समाजांतले विरोध, भांडणं, संप, मारामाऱ्या, युद्धें, महायुद्धें हीं संपतील."

---

## नवपुष्पकरंडक.

'नवपुष्पकरंडकां'त प्रो. वामनराव जोशी यांनीं मनोरंजन, चित्रमय जगत्, नवयुग, डेक्कन कॉलेज मॅगेझिन प्रभृति मासिक पुस्तकांतून लिहिलेल्या गोष्टींचा संग्रह केलेला आहे. "हा पुष्पकरंडक उघडून पाहिला म्हणजे काव्यशास्त्रविनोदांत रममाण होणाऱ्या वाचकवर्गाची बरीचशी निराशा झाल्यावांचून रहात नाहीं. रागिणीसारख्या कादंबऱ्यांतून मधून मधून प्रकट होणारा मार्मिक विनोद, सुंदर कोटिक्रम, विरोधगर्भ टीका, मर्मभेदी उपालंभ इत्यादि गोष्टींचा अनुभव हें पुस्तक वाचीत असतां मिळूं शकतो. त्यांच्या कादंबऱ्यांतून किंवा ग्रंथांतून दिसून येणाऱ्या तत्त्वचिंतनात्मक विचारसरणीचें व एखादा गंभीर विषय विनोदी परंतु अगदीं मार्मिक रीतीनें सांगण्याच्या हातोटीचें बीज या लघुकथांमधून चांगल्या रीतीनें दिसून येतें यांत शंका नाहीं."

लघुकथा या दृष्टीनें 'चारित्र्यक्रांति' व 'नांव बदलीन' ह्या गोष्टी विचार करण्यासारख्या आहेत. बाकीच्या कथा त्या सदरांत तितक्याशा पडूं शकतील कीं, नाहीं याची शंका आहे. 'बायकांना उजव्या डोळ्यानें दिसत नाहीं!' व 'अप्रकाश किरणांचा दिव्य प्रकाश' ही लेखकाच्या कविकल्पनेची व उत्कट प्रतिभाशक्तीची साक्ष पटविणारीं दोन स्वतंत्र प्रकरणें आहेत. 'वामाक्षी' या शब्दावर कोटी करून तदनुरोधानें विनोदात्मक रीतीनें संशोधन कसें करतां येतें, याची पहिली गोष्ट उत्तम नमुना आहे. दुसरीही गोष्ट ह्याच सदरांत पडण्यासारखी आहे. 'ही जरी

विनोदपूर्ण गोष्ट आहे, तरी तिची उभारणी दर्शनानुशासनशास्त्राच्या तत्त्वावर झाली आहे.' ह्यांत लेखकाची तार्किकता आणि अभिनवान्वेषी शक्ती या गोष्टीं विशेषेंकरून दिसून येतात. बाबूमहाशयांच्या ह्या शोधामुळें कोणत्या प्रकारची क्रांती झाली याचें चित्र उपरोधिक विनोदी भाषेंत रंगविलें आहे. अप्रकाश-आंगठीमुळें एकंदर झालेला अनर्थ व उलटापालट यांचें वर्णन करण्यांत लेखकानें मार्मिकतेबरोबर व्यंगचित्ररेखाकौशल्याचा उपयोग केला आहे.

" अहंकार या गोष्टीचा आरंभ फारच गंभीर स्वरूपांत करण्यांत आला आहे. अहंकारावरील प्रारंभीचें विवेचन वाचतांना हरदासाच्या पूर्वरंगाची आठवण झाल्याखेरीज रहात नाहीं. कस्तुरीमिश्रित शक्तिवर्धक गोळ्यां-प्रमाणें कवितामिश्र गद्यलेख लिहिणाऱ्या मेघराजाचें वर्णन फारच खोंच-दार व वस्तुस्थितिनिदर्शक झालें आहे. आधुनिक कवींनीं व प्रकाशकांनीं योग्य तो बोध घ्यावा. 'नाटकराव'मधील विनोदगर्भ टीका जशी वस्तु-स्थिति वर्णनात्मक नाटकें लिहूं इच्छिणाऱ्या नाटककारांवर आहे तशी ती हल्लींच्या समाजाच्या मृतवत् स्थितीवरही आहे हें विसरतां कामा नये. "

'चारित्र्यक्रांति या गोष्टीचा मतलब नासरखान नांवाचा एक मूर्ख बटलर आपल्या इंग्रज धनिणीशीं लघळपणा करून तिच्याकडून मान-खंडना झाली असतां तिचा सूड उगविण्याच्या हेतूनें तिजबद्दल तिच्या नवऱ्याचें मन कलुषित करतो, व अखेरीस त्याजपाशीं आपला अपराध कबूल करितो,' असा आहे. ' या कथेंतील कांहीं गोष्टी अस्वाभाविक वाटल्या तरी मनुष्यस्वभावाचें चित्र या दृष्टीनें ही गोष्ट चांगली आहे. " मानसशास्त्रदृष्ट्या विचार करतां वामनरावांनीं मेमसाहेब व विशेषत: नासरखान यांच्या मन:स्थितीचें पृथक्करण फार नाजूक व सूक्ष्म रीतीनें केलें आहे यांत शंका नाहीं. " ' नांव बदलीन ' ही

विनोदी गोष्ट गेल्या महायुद्धावर उभारलेली आहे. व ' त्या युद्धासंबंधानें एका मुलीनें केलेलें ' जलयुद्ध आतां शक्य नाहीं. झालें तर नांव बदलीन ! ' असें भाकीत अखेरीस खोटें ठरून तिला खरा भविष्यवादी ठरलेल्या गृहस्थाशीं लग्न करून खरोखरीस नांव बदलावें लागतें. ' असें त्या गोष्टीचें विनोदात्मक पर्यवसान आहे. ' नांव बदलीन ' यावरील मार्मिक कोटी धोंडोपंत व यमुना यांचें जेव्हां अखेर लग्न लागतें, तेव्हांच खरी ध्यानांत येते.

ह्याप्रमाणें नव पुष्पकरंडकाचें स्वरूप आहे. 'दोन स्वदेशींचा लढा' या लघुकथेसारख्या वामनरावांच्या उत्कृष्ट कथांचा समावेश 'करंडकांत' झाला नसल्यामुळें कलाप्रेमी वाचकांचा विरस होतो. परंतु ' दोन घटका करमणुकीबरोबर समाजांतील कांहीं गोष्टींवर विनोदी भाषेंत केलेली साभिप्राय व सहेतुक टीका मार्मिक वाचकांस बोधप्रद वाटल्याशिवाय रहात नाहीं.

---

## विचारविलास

"ह्या पुस्तकाचे दोन भाग असून पहिल्या भागांत ' विचारविलास ' या नांवाला अन्वर्थक अशा निबंधांचा व परीक्षणांचा संग्रह केला असून दुसऱ्या भागांत गोष्टी, नाट्यप्रवेश वगैरेंचा संग्रह आहे. अर्थात् ज्ञान व मनोरंजन हीं दोन्हीं या पुस्तकापासून प्राप्त होणारीं असल्यामुळें वामनरावांचा हा ग्रंथ सर्वांनाच आवडून ग्रंथकारांची जी इच्छा कीं, आपल्या ह्या ग्रंथाच्या वाचनानें ' लोक आनंदित झालेले पहावे व त्यांना आनंद होतो असें ऐकावें ' ती पूर्ण होईल याविषयीं आम्हांस संदेह वाटत नाहीं. प्रो. वामनराव जोशी हे आग्रहासाठीं लिहिणारे नाहींत, त्यांचें लेखन त्यांना स्वतःला आनंद होत असेल

तेंव्हांच होतें. वाचकांच्या हृदयाशीं लेखकाचें हृदय बोलूं लागतें. ही जी संवेदनाशक्ति वामनरावांच्या लेखांत असते ती याच कारणमुळें होय. वामनरावांनीं प्रकट केलेले विचार सर्वांनाच संमत होतात असें नाहीं. कोणाचा त्यांच्याशीं तीव्र मतभेदही होतो. परंतु त्यांचें लेखन प्रेमानें वाचावें, आदरानें त्याचा विचार करावा व कौतुकानें त्याच्यावर वादविवाद करावा असें मात्र प्रत्येकाला वाटतें. आणि म्हणूनच त्यांच्या नवीन ग्रंथाच्या प्रकाशनाची रसिक वाचक वाट पहात असतात." ( विविधज्ञानविस्तार )

'ज्ञान हें विष कीं अमृत ?' हा निबंध ग्रंथकर्त्यांची विद्वत्ता, बहुश्रुतता आणि त्यांचें निरनिराळ्या शास्त्रांचें अध्ययन यांची ओळख पटवितो. विषयाचा जो पूर्वपक्ष करण्यांत आला आहे तो उत्तरपक्षा-पेक्षां अधिक मार्मिक व अधिक प्रत्ययोत्पादक असून तात्त्विक कोटि-क्रमांनीं परिपूर्ण आहे. ज्ञानाची विषमयता आणि अनिष्टता इतक्या परिणामकारक रीतीनें वाचकांच्या मनावर बिंबविण्यांत आली आहे कीं उत्तरपक्ष वाचून सुद्धां वाचकाचें मत बदलत नाहीं, किंवा त्यांचें समाधानही होत नाहीं. प्रसिद्ध सिद्धांतांचें जें खंडण केलें आहे तें हेत्वाभासमूलक असलें तरी प्रतीतिकारक झालें आहे, ही गोष्ट खरी. विरोधकाची भूमिका घेण्याची क्रिया सिद्धांतपक्षाची बाजू मोडण्यापेक्षां अधिक सुलभ आहे. चिकित्सक आणि विद्वत्त्वदर्शक निबंधांत हा निबंध अग्रस्थान मंडित करील यांत शंका नाहीं.

'पक्षभेद आणि पक्षद्वेष' हा निबंध कोणत्याही पक्षाच्या किंवा पूर्व-ग्रहाच्या अभिनिवेशानें लिहिलेला नाहीं. लेखकाच्या न्यायप्रिय व समतोल-बुद्धीचा तो द्योतक आहे. ह्या लेखांत विचाराच्या पूर्व व पश्चिम दिशा दाखविण्यांत आल्या आहेत. लेखक खरेखोटेपणाचा कांटा कोणीकडे झुकतो हें दाखवीत नाहींत. तर एकाच विषयासंबंधानें विचारी माण-

त्यांचे विचार खरोखरच कसे भिन्न होतात. हें त्यांनीं त्या लेखांत दाखविलें आहे. त्यावरून जो निर्णय किंवा तथ्यांश निघण्यासारखा आहे, तो काढण्याचें कार्य लेखकांनीं वाचकांवर सोंपविलें आहे.

'योगक्षेम म्हणजे काय ' या लेखांत योगक्षेमाचा अर्थ ' संसारांतील नित्य निर्वाह' असा नसून ' आध्यात्मिक नित्य निर्वाह' ' पारमार्थिक कल्याण ' असा लेखकांनीं दिला आहे.

'दोन स्वदेशींचा लढा' ही गोष्ट लघुकथा या दृष्टीनें जरी थोडी मोठी असली तरी ती कलेच्या दृष्टीनें सुंदर आणि चित्तवेधक आहे. तिच्यांत दाखविलेला लढा नुसत्या युक्तिवादानें सुटत नाहीं. लेखकाला त्यासाठीं एका प्रसंगाचें साहाय्य घ्यावें लागतें. 'मित्रत्व-शत्रुत्वसौजन्य-दौर्जन्यावर अवलंबून आहे. गोलावर नाहीं....इंग्रजांमध्यें जे दुर्जन आहेत ते आमचे शत्रु, सज्जन इंग्रजांना कोण शत्रु म्हणेल ? ' हा त्या गोष्टीचा भावार्थ आहे. पतिपत्नींमध्यें केवळ स्वदेशप्रेमवशतेनें वितुष्ट येते ही कल्पना नाविन्यदर्शक असून मनोहर आहे.

स्वराज्यमेळा, लीलारहस्य वगैरे संवाद शाळांमधील मुलींच्या-साठीं रचलेले असले तरी लेखकाच्या मार्मिकतेची आणि चतुर-नाटयकौशल्याची साक्ष पटवितात.

वामनरावांच्या परीक्षणासंबंधानें एवढेंच म्हणता येईल कीं, तीं मार्मिक तर आहेतच, शिवाय तीं लेखकाच्या चतुरस्र बुद्धिवैभवाची निदर्शक आहेत. वामनरावांनीं एकाद्या पुस्तकाचें समीक्षण केलें म्हणजे त्या पुस्तकाची मराठी वाङ्मयांत मोठी योग्यता आहे असें ठरतें. आणि ज्या पुस्तकाचें ते परीक्षण करतात त्यालाही आपोआप उच्च दर्जा प्राप्त होतो. इतकें त्यांच्या परीक्षणाचें महत्त्व आहे.

'गांधींचा सत्याग्रहाश्रम' या सुंदर लेखांत एक महत्त्वाचें तत्त्व गोंविलें आहे:—"राष्ट्राच्या उन्नतीच्या आड राजा येवो, प्रजा येवो, कुटुंब येवो, कोणीही येवो न डगमगतां आपलें कर्तव्यकर्म करीत राहण्याचें बल जेव्हां पुढारी लोकांमध्यें येईल तेव्हांच राष्ट्रकार्य साधेल."

---

## नीतिशास्त्रप्रवेश

या अत्युत्तम आणि विद्वत्ताप्रचुर पुस्तकाची कल्पना येण्यासाठीं खालीं दोन उतारे देत आहे :—

"प्रो. वामनराव जोशी यांच्या या ग्रंथाची स्तुति करावी तेवढी थोडीच होणार आहे. त्यांचा तत्त्वज्ञानाचा अभ्यास, त्यांची लिहिण्याची शैली, ज्या गोष्टी व जे विचार आजपर्यंत मराठी भाषेंत प्रकट झाले नव्हते ते प्रकट करण्याची त्यांची हातोटी, या सर्व गोष्टींबद्दल ते सर्व लोकांच्या आदरास पात्र आहेत. नीतिशास्त्रावर मराठी भाषेंत फारसे ग्रंथ उपलब्ध नाहींत. त्यामुळें तर प्रस्तुतच्या पुस्तकास फारच महत्त्व आलें आहे." (प्रो. रा. द. रानडे ).

"रा. जोशी यांच्या पुस्तकांत एकंदर सोळा प्रकरणें आहेत. व शिवाय सात पुरवण्याही आहेत. त्या सर्वांमध्यें नीतिविषयक बहुतेक प्रश्नांचा ऊहापोह आलेला आहे. निरनिराळ्या मतांचा विचार करतांना व त्यांचें खंडनमंडन करतांना त्याचप्रमाणें पौरस्त्य विचार व पाश्चात्य विचार यांची तुलना करतांना व त्यांतील गुणदोष दाखवितांना रा. जोशी यांनीं समतोलपणा, निरभिमान व सत्यप्रीति दाखविली आहे. हीच खरी शास्त्रीय वृत्ति होय व त्यांचें एकंदर विवेचन विकारवशतेच्या किंवा दुरभिमानाच्या दोषापासून अलिप्त आहे. त्यांच्या पुस्तकांतील कांहीं कांहीं प्रकरणें अगदीं स्वतंत्रपणें लिहिलेलीं आहेत; उदाह-

रणार्थ, धर्मनिष्ठा व नीतिनिष्ठा, कार्याकार्य ठरविण्याची कसोटी, ' विकासवाद '. व नीतिशास्त्र हीं प्रकरणें चांगलीं साधलीं असून त्यांत रा. जोशी यांनीं आपलें स्वतःचें मत स्पष्टपणें सांगितलें आहे. त्यांत व विशेषतः विकासवाद यांत अगदीं आजतागाईतपर्यंतची माहिती व मतें यांचा संग्रह केला आहे. बाकी एकंदर पुस्तकच चांगलें झाल्यामुळें विशेष निवडानिवड करण्याचें काम कठीण आहे. रा. जोशी यांनीं मोठ्या मेहनतीनें हें नीतिविषयावरील मराठींतील पहिलें पुस्तक प्रसिद्ध केलें आहे त्याबद्दल मी त्यांचें अभिनंदन करितों. " ( प्रि. गो. चिं. भाटे ).

---

## साक्रेटीसाचे संवाद

लेखक आपल्या १९२१ सालीं जोडलेल्या प्रस्तावनेंत लिहितातः—

" सुमारें सहासात वर्षांपूर्वी वर्तमानपत्राच्या धंद्यांत असतां त्या धंद्याला आवश्यक असें जें लेखनवाचन करावें लागतें तें बहुधा क्षणमात्र महत्त्वाचें नसतें हें अनुभवास येऊन मनाला असमाधान वाटूं लागलें. व उच्चतर आणि अधिक महत्त्वाचें लेखनवाचन करण्याचे प्रयत्न पुष्कळ दिवसपर्यंत कालाच्या अभावामुळें व शारीरिक अस्वास्थ्यामुळें व स्वभावसिद्ध आलस्यामुळें व्यर्थ गेले. तथापि मनानें एकदां उचल करून ' गोल्डन ट्रेझरी सिरीज ' मधील ' साक्रेटिक डायलॉग्ज ' या पुस्तकाचें मराठींत भाषांतर करण्याचें काम माझ्या माथीं मारलें. तें हळूहळू संपून व पुष्कळ दिवस हस्तलिखित स्वरूपांतच रुमालांत पडून राहून आज छापील स्वरूपांत बाहेर पडत आहे. "

या पुस्तकांत प्लेटोनें लिहिलेल्या चार संवादाचें भाषांतर असून साक्रेटिसाच्या विचारपद्धतीविषयीं व संवादपद्धतीविषयीं त्यावरून

चांगली कल्पना होण्यासारखी आहे. ग्रंथाच्या उपोद्घातांत साक्रेटीसाचें चरित्र त्याचे गुणविशेष व त्याचें तत्त्वज्ञान हीं दिलीं आहेत. त्यामुळें तें उपयुक्त बोधप्रद व स्वाभिमानपोषक झालें आहे.

---

## कांहीं लेख

प्रो. वामनराव जोशी यांच्या ह्या भागांत निर्देशिलेल्या ग्रंथांशिवाय " A Gist of Gita Rahasya " ह्या लोकमान्य टिळकांच्या गीतारहस्याचा थोडक्यांत पण सुसंगत सारांश देणाऱ्या पुस्तकाचा उल्लेख केला पाहिजे. गीतारहस्याची थोरवी इंग्रजी वाचकांस पटवून देण्याची कामगिरी ह्या छोट्या पुस्तकानें उत्तम प्रकारें केली आहे.

वामनरावांनीं लिहिलेले लेख आणि परीक्षणें इतकीं बहुविध आणि विपुल आहेत कीं, सर्वांचा सहज जातां जातां निर्देशही करणें अशक्य आहे. त्यांचीं ' बंधनाच्या पलीकडे, ' 'परागंदा,' ' विरह-तरंग, ' इत्यादीं पुस्तकांचीं परीक्षणें प्रसिद्ध आहेत. त्यांनीं ' आमची दिवाळी ' ( प्रो. ना. म. पटवर्धन ), 'सुखस्वप्न' ( श्री. गो. बेडेकर ), ' झांकली मूठ ' (त्रि. वा. हडप), इत्यादि पुस्तकांस प्रस्तावना लिहिल्या आहेत. विविधज्ञानविस्ताराच्या ' निबंध-संग्रह ' ग्रंथांत त्यांचा ' धर्म आणि नीति ' हा नीतिविषयक लेख समाविष्ट झाला आहे. ' ध्येय हाच देव ' हा त्यांचा लेख त्यांचें तत्त्वज्ञान, त्यांची देवाविषयींची विचारसरणी, आणि त्यांची विश्वाकडे पहाण्याची दृष्टी, या दृष्टीनें अतिशय महत्त्वाचा आहे. वामनरावांनीं आपल्या ग्रंथांत प्रतिपादलेल्या प्रमेयांना आधारभूत असलेल्या तत्त्वरत्नांचा तो एक करंडक आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. या शिवाय वामनरावांनीं कित्येक लेख लिहिले आहेत. त्यांचा नुसता उल्लेखही करणें येथें अशक्य आहे. ह्याप्रमाणें वामनरावांच्या विविध वाङ्मयसेवेचें स्वरूप आहे.

## उपसंहार

श्रेष्ठ कादंबरीकार, व लघुकथालेखक, रसिक नीतिशास्त्रविशारद, विदग्ध पंडित, मार्मिक व अभियुक्त ग्रंथकार, समतोल व मर्मज्ञ टीकाकार आणि विद्वान् व बहुश्रुत कलाकोविद इत्यादि नात्यांनीं प्रो. वामन मल्हार जोशी महाराष्ट्र-साहित्याला ललामभूत झालेले असून आजकाल मराठी लेखकांत त्यांना तुल्यबल असे दोनच ग्रंथकार आहेत—एक श्री. श्रीपाद कृष्ण कोल्हाटकर आणि दुसरे श्री. नरसिंह चिंतामण केळकर. वामनरावांच्या लेखांतून त्यांची विदग्धता, त्यांचा निरनिराळ्या शास्त्रांशीं परिचय व त्या शास्त्रांतील प्रमेयें वाचकांना सुलभ रीतीनें पटवून देण्याची त्यांची हातोटी, त्यांचा उच्च प्रतीच्या वाङ्मयाचा व्यासंग, वक्तृत्वाचा रम्य व अस्खलित प्रवाह, सूक्ष्म व मार्मिक विवेचनशक्ति इत्यादि गोष्टीं सहजगत्या वाचकांच्या नजरेसमोर येतात. वामनरावांचे ग्रंथ थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे अभियुक्त ( Classical ) स्वरूपाचे आहेत. त्यांची भाषा प्रौढ, सहृदयाल्हादक व थोडक्यांत पुष्कळ आशय व्यक्त करणारी अशी असते. प्रो. वामनराव जोशी यांनीं श्री. कृ. कोल्हटकरांच्या भाषेविषयीं जे उद्गार काढले आहेत ते थोडा फरक त्यांच्याही करून भाषेला यथार्थपणें लागूं पडतात:—

'त्यांची भाषा चांगली म्हणजे लक्ष वेधणारी असते. ग्रंथांतील भाषेंत व्यवस्थितपणा व नीटनेटकेपणा तर आहेच, पण वैशिष्ट्य आणि असामान्यत्वही आहे; विद्वत्त्व आहे, पण क्लिष्टत्व व जडत्व नाहीं; शब्दार्थांमधील सूक्ष्म भेदाकडे, यथार्थत्वाकडे व समर्पकतेकडे बारीक लक्ष आहे; किंबहुना चोखंदळपणा आहे. पण त्यामुळें प्रवाहाला सहसा बाध येत नाहीं. सदभिरुचीला पटणार नाहीं अशी कृत्रिमता नाहीं. एकंदरींत ही भाषा वैशिष्ट्ययुक्त व सद्गुणमंडित असल्यामुळें प्रो. जोशी यांना ती

भूषणावह होईलच, पण वर्धिष्णु मराठी भाषेचें येथें जें सामर्थ्य प्रतित होतें तें लोकांच्या मनांत सकौतुक अभिमान उत्पन्न करील अशा योग्यतेची ही भाषा आहे. '

यंदाच्या गोंव्याच्या साहित्यसंमेलनानें त्यांना अध्यक्षपदाचा महनीय साहित्यमुकुट अर्पण करून त्यांचें असामान्य बुद्धिवैभव व प्रतिभाशालित्व यांजबद्दल आपली गुणग्राहकता व्यक्त केली व त्यांचा यथोचित गौरव व सन्मान केला ही गोष्ट विशेष अभिनंदनीय आहे. उत्तरोत्तर त्यांचें कीर्तिवैभव असेंच वाढत जाऊन जगांतील उत्कृष्ट ग्रंथकारांत त्यांचें स्थान चिरस्थायी होवो आणि त्यांना दीर्घकालपर्यंत आयुरारोग्याचा लाभ होवो अशी परमेश्वराजवळ प्रार्थना करून हें संक्षिप्त चरित्र पूर्ण करितों.

# आभार

हें पुस्तक लिहीत असतां अनेक हितचिंतक सज्जनांनीं आत्मियतेनें निरपेक्ष मदत केली त्यांचा कृतज्ञतापूर्वक व साभार उल्लेख करणें हें माझें कर्तव्य आहे. खालील सद्गृहस्थांच्या सहाय्याचा मला जो अमूल्य उपयोग झाला त्याबद्दल मी त्यांचा अंतःकरणपूर्वक आभारी आहें.

श्रीपाद कृष्ण कोल्हटकर–‘ रागिणी व तिचीं भावंडें ’ ( वि. ज्ञा. विस्तार )

रा. गो. कानडे—प्रो. विजापूरकर यांचें चरित्र

गं. दे. खानोलकर– ” ”

मो. स. मोने–मराठी भाषेचे व्याकरणकार.

लक्ष्मणदास माधवदास–‘ नलिनी ’ व ‘ नवपुष्पकरंजक ’ यांचें परीक्षण.

संपादक–‘ अरुण ’, ‘ विविधज्ञानविस्तार ’ ‘ विविधवृत्त ’ ‘ रत्नाकर ’ ‘ मनोरंजन ’.

गणेश महादेव कं. पुणें.

प्रो. ना. म. पटवर्धन, श्री. ना. म. भिडे, श्री. गं. गो. देशमुख, श्री. अ. स. गोखले, श्री. र. श. पारखी, इत्यादि.

लेखक.

# सूची

पृष्ठ

भूमिका 1

प्रकरण पहिलें—कुलवृत्तांत–डेक्कन कॉलेज–एक उतारा–अकृत्रिम बंधुप्रेम–कॉलेजमधील वातावरण–सिंहावलोकन ... ... ७

प्रकरण दुसरें—पुढें काय?–पोस्टल सुपरिंटेंडंट?–कलकत्ता कॉंग्रेस–समर्थविद्यालय–विश्ववृत्ताची–आहुती–विश्ववृत्तासंबंधीं खटला–'खुनास मदत कोणाचा खून?'–'इयं सा जातिः परित्यक्ता'–कारागृहवासांतील हकीगती–एक प्रसंग–'माझ्या तुरुंगांतील आठवणी'–सुटकेनंतरचा एक प्रसंग.... ... ... ... ... १६

प्रकरण तिसरें—पुन्हां पुढें काय? संपादक मंडळांत–मराठा कचेरींत–'मेसेज' ... ... ... ... ४५

प्रकरण चवथें—अध्यापनाचें ध्येय–अनाथ बालिकाश्रम–अध्यापन–स्त्रीशिक्षणासंबंधीं मतें–वाङ्मयविषयक माहिती–कौटुंबिक माहिती–स्वभाव चित्र–आवडी–निवडी.... ... ... ... ४९

प्रकरण पांचवें—सामाजिक मतें–शुद्ध प्रेम–एक सूचना–विवाह–एकेरी नांव–आर्यस्त्री. ... ... ... .. ५९

प्रकरण सहावें—ग्रंथकर्तृत्वाची हौस–उत्तम वाङ्मय–लेखनविषयक अनुभव–वाङ्मयविषयक–विचार. ... ... ... ६५

## भाग दुसरा

आश्रमहरिणी ... ... ... ... ७१

रागिणी ... ... ... ... ७६

नलिनी ... ... ... ... ८४

सांशिकेचा देव ... ... ... ... ९१

नवपुष्पकरंडक ... .... ... १००

विचारविलास ... ... ... ... १०२

नीतिशास्त्रप्रवेश... ... ... ... १०५

साक्रेटिसाचे संवाद ... ... ... १०६

कांहीं लेख ... ... ... ... १०७

उपसंहार ... ... ... ... १०८

आभार ... ... ... ... ११०

सूची ... ... ... ... १११

## एस्. टी. वैद्य आणि कंपनी

बुकसेलर्स अँड स्टेशनर्स,

हुजुरपागे समोर, १४ बुधवार, पुणें २

आम्ही शालोपयोगीं व इतर सर्व प्रकारचीं जुनीं पुस्तकें योग्य किंमतीस खरेदी करतों. शालोपयोगीं पुस्तकें व स्टेशनरी सामान विकतों. कॅटलाग मागवा.


# वंगनेता सुभाषचंद्र बोस

REFBK-0004128

किंमत ३॥ आणे चीं पो. तिकिटें पाठवा.


आर्यप्रकाशन-कार्यालय

३७५, सदाशिव पेठ, पुणें २.

जुनीं पुस्तकें मिळण्याचें एकच ठिकाण !

# दी न्यू पूना बुक डेपो

अप्पा बळवंत चौक, पुणें २.

ब्रँच :— सी. पी. टँक टर्मिनस, माधवबाग, मुंबई ४.

आम्ही सर्व प्रकारचीं शालोपयोगी, कॉलेजांस लागणारीं, वाचनीय

व

धार्मिक वगैरे उपयुक्त पुस्तकें योग्य भावानें विकतों.

सर्व प्रकारचीं उपयुक्त पुस्तकें जास्तींत जास्त

किंमत देऊन खरेदी करूं.

नव्या पुस्तकांवर १५ ते २० टक्के कमिशन देऊं

व

परगांवीं व्ही. पी.नें पाठवूं.

# कांहीं दुर्मीळ ग्रंथ

| | | | |
|---|---|---|---|
| तुर्कांचें साम्राज्य— वा. कृ. भावे | २ | ० | ० |
| प्रेसिडेंट विल्सन चरित्र— गद्रे | १ | ० | ० |
| ना. गोखले चरित्र— भावे | २ | ० | ० |
| हिंदुधर्म आणि सुधारणा— गोळे | ३ | ० | ० |
| अब्राहम लिंकन चरित्र— आपटे | ० | १० | ० |
| हरी आणि त्रिंबक— पारट | १ | ० | ० |
| सुवर्ण-चंपक— प्रो. चापेकर | १ | ० | ० |
| रुक्मिणीहरण-निरीक्षण— प्र. धों. कानिटकर | ० | ८ | ० |
| श्री. कृ. कोल्हटकर चरित्र— ( पुण्याचें साहित्य-संमेलनाचे निमित्त त्या वेळचे अध्यक्ष, साहित्य-बत्तीशी, सुदाम्याचे पोहे, दुटप्पी वा दुहेरी, मूकनायक, मतिविकार, सहचारिणी वगैरे नाटकांचे कर्ते, साहित्याचार्य कोल्हटकर यांचें प्रथमच प्रसिद्ध झालेलें चरित्र. ) | ० | ८ | ० |

याशिवाय सर्व प्रकारचीं नवीं व जुनीं पुस्तकें आमच्याकडे मिळतील.

(१) एन. भिडे अँन्ड को.,
११६ नारायण, पुणें २.

(२) महाराष्ट्र पब्लिशिंग हाउस लि.,
१२ बुधवार, पुणें २.